


१९३७-२०२६ ९० वर्ष

# कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

रायगड मंगळवार । दि. १३ ऑक्टोबर २०२६ । अंक १२७ । पृष्ठे ८ । किंमत ५ ₹

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in



**विकणे आहे**

अलिबाग ब्राह्मणआळी युनियन बँकेशेजारील नवीन इमारतीमधील ९५० स्क्वे. फूट क्षेत्रफळाचा व्यापारी गाळा विकणे आहे.

**मोहनिश जोग**
मो.9970666203

रजि. नं. : आर.जी.डी./ए.बी.जी./आर.एस.आर./सी.आर./३०८/९२

**कमळ नागरी सहकारी पतसंस्था मर्या., अलिबाग**

(ISO 9001 . 2015 मानांकन प्राप्त तसेच CBS सेवाप्रणाली असणारी रायगड जिल्ह्यातील पतसंस्था)

मुख्य कार्यालय :- कमळ भवन, शिवाजी चौक,अलिबाग,ता.अलिबाग,जि.रायगड ४०२२०१.दूरध्वनी क्र.:०२१४१-२२५७१५/२२७८५५

(ISO 9001 : 2015 मानांकन प्राप्त तसेच CBS सेवाप्रणाली असणारी रायगड जिल्ह्यातील अग्रेसर पतसंस्था)

शारदीय **नवरात्री उत्सव** निमित्त सर्वांना मंगलमय शुभेच्छा..!!

**सोनेतारण कर्ज योजना**

६ महिने कालावधी रु. १,१५,०००/- प्रति तोळा व व्याजदर द.सा.द.शे ११%

१२ महिने कालावधी रु. १,१०,०००/- प्रति तोळा व व्याजदर द.सा.द.शे १२%

प्रत्येक कुटुंबाची, कुटुंबातील प्रत्येकाची - कमळ पतसंस्था


# सरकार नमलं

## एमपीएससीचे आंदोलन स्थगित । मंत्री शिवेंद्रराजेंची मध्यस्ती

**। पुणे । प्रतिनिधी ।**

एमपीएससी परीक्षा पेपरफुटी प्रकरणी एमपीएससीच्या अध्यक्षांच्या राजीनाम्यासह अन्य मागण्यांसाठी गेल्या १२ दिवसांपासून पुण्यात आंदोलन सुरू होते. अखेर या आंदोलनाला मोठे यश मिळाले आहे. मंत्री शिवेंद्रराजे यांनी विद्यार्थ्यांशी चर्चा केल्यानंतर हे आंदोलन मागे घेण्यात आले आहे. तसेच, चौकशी समिती स्थापन करण्यात आली असून, त्या समितीच्या अहवालानुसार पुढील कारवाई करण्यात येईल, असे आश्वासनही शिवेंद्र राजेंनी दिले आहे. तसेच, या चौकशी समितीच्या सचिवपदी तुकाराम मुंढे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

एमपीएससी'चे अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्यासह विविध मागण्यांसाठी आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या आंदोलनाच्या ठिकाणी राज्याचे सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी रविवारी (दि.११) सायंकाळी उशिरा भेट देऊन सरकारची भूमिका स्पष्ट केली. ''विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर कायदा आणि राज्यघटनेच्या चौकटीत कार्यवाही केली जाईल,'' असे सांगून त्यांनी आंदोलन स्थगित करण्याचे आवाहन केले. दरम्यान, या आयोगाचे कामकाज सुरू असेपर्यंत 'एमपीएससी'चे अध्यक्ष विवेक भीमनवार यांना पदावरून दूर करण्याची मागणी आमदार रोहित पवार यांनी केली. •➤पान २ वर



### कोणत्या मागण्या मान्य ?

सरकारने विद्यार्थ्यांची काही मागणी मान्य केल्या आहेत. त्यात भरती प्रक्रिया वर्षभरात पूर्ण करणार, सर्व पदाची परीक्षा ऑफलाइन होणार, वन कार्ड योजना मान्य, शुल्क निश्चिती व्ही.राधा समिती करेल, ३०० रुपयांच्या आत फी असेल, चालू घडामोडी प्रश्नांची कालमर्यादा निश्चित करणे, शासकीय जागांचा आकृतीबंध दरवर्षी प्रसिद्ध करण्यात येईल. या मागण्यांसह राज्य सरकार पुढील ३ वर्षांत ७० हजार जागा असे रिक्त सर्व पदे भरणार असल्याची घोषणा केली आहे. यासोबत २०२७ मध्ये होणाऱ्या गट क परीक्षेच्या पदांमध्ये दुप्पटीने वाढ करण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.

### समितीच्या सचिवपदी तुकाराम मुंढे

एमपीएससी पेपरफुटी प्रकरणाच्या चौकशीसाठी आणि एमपीएससीमधील सुधारण्यासाठी चौकशी समितीची निर्मिती करण्यात आल्याचे राज्य शासनातर्फे मंत्री शिवेंद्रराजे यांनी सांगितले. या समितीत तुकाराम मुंढे यांची समितीच्या सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच, बी.डी नाईक आणि गणेश पाटील या प्रशासकीय अधिकाऱ्यांना समाविष्ट करण्यात आले आहे. तर, लखमी गौतम या पोलीस अधिकाऱ्यांसह उच्च न्यायालयाचे न्यायाधीश दिलीप भोसले यांचे देखील नाव चौकशी समितीत घेण्यात आले आहे.

## वेधक

### राहुल गांधींना पोलिसांनी अडवले

**नवी दिल्ली :** मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीवरून आणि मतदार यादीतील कथित घोटाळ्याविरोधात विरोधी पक्षांचा रस्ता रोको आणि आंदोलन अधिकच तीव्र झाले आहे. सोमवारी (दि.१२) बाराखंभा ते थेट सुप्रीम कोर्टाकडे मोर्चा नेणाऱ्या काँग्रेस नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी तसेच काँग्रेस सरचिटणीस प्रियंका गांधी यांना दिल्ली पोलिसांनी भगवान दास रोडवर बॅरिकेड्स लावून रोखले. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून या भागात दिल्ली पोलिसांसह पॅरामिलिट्री फोर्सेस आणि यूपी पोलिसांचा प्रचंड बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. मोर्चा रोखल्यानंतर प्रसिद्धी माध्यमांशी बोलताना राहुल गांधी यांनी केंद्र सरकारवर आणि निवडणूक आयोगावर जोरदार हल्लाबोल केला.

### तरूणासह नातेवाईकांना मारहाण

**रसायनी :** पनवेल तालुक्यातील घोसाळवाडी येथील यश सुर्वे (१९) हा तरुण शनिवारी (दि.१०) रात्री दुचाकीवरून जात होता. भोकरपाडा स्टॉपजवळ त्याच्या पुढे टँकर जात असल्याने त्याला ओव्हरटेक करण्यासाठी यशने हॉर्न दिला. यावेळी पुढे जाणाऱ्या दुसऱ्या वाहनातील चार जणांनी यशची स्कुटी अडवली. त्यानंतर जगदीश पाटील याने यशची कॉलर पकडून कानाखाली मारल्या. या घटनेची यशच्या नातेवाईकांना माहिती मिळाली. त्यांनी समजूत काढल्यानंतर यश घरी जाण्यास निघाला. मात्र, हिरानंदानी गेटजवळ त्याचे वडील ज्ञानेश्वर सुर्वे भेटले असता ते चौघे पुन्हा तेथे आले आणि यशसह नातेवाईकांना शिवीगाळ करून हाताबुक्क्यांनी मारहाण केली. यावेळी यशचे मामा मंदार गोपाळे पुढे आले असता, त्यांनाही शिवीगाळ व दमदाटी करण्यात आली. तसेच, चायनीज दुकानातील चॉपरने त्यांच्या डोक्यात वार करून दुखापत केली.

### सराईत चोरट्याच्या मुसक्या आवळल्या

**पेण :** पेण शहरात मोटारसायकल चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी पेण पोलिसांनी महत्त्वपूर्ण कारवाई केली असून, मोटारसायकल चोरी करणाऱ्या सराईत आरोपीला अटक करण्यात आली आहे. पेण पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या मोटारसायकल चोरीच्या गुन्ह्याचा तपास करताना पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची पाहणी केली. तसेच, गोपनीय माहिती आणि तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे तपासाची चक्रे वेगाने फिरवली. या तपासातून आरोपीचा माग काढण्यात पोलिसांना यश आले. या प्रकरणी शंकर सांकुखे ऊर्फ पाटील (२०) याला अटक करण्यात आली आहे. त्याच्याकडून अंदाजे २० हजार रुपये किंमतीची स्कूटी हस्तगत करण्यात आली आहे.

# पनवेल पालिकेत टँकर खरेदीवरून वाद

## लतीफ शेख यांचा आर्थिक अनियमिततेचा आरोप

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेल महानगरपालिकेच्या विकासकामांतील निधीवाटप आणि टँकर खरेदीच्या प्रस्तावावरून नवा वाद निर्माण झाला आहे. टँकर खरेदीसाठी प्रस्तावित खर्च आणि शासकीय पोर्टलवरील दरांमध्ये मोठी तफावत असल्याचा आरोप नगरसेवक लतीफ शेख यांनी केला आहे. तसेच, ४० कोटी रुपयांपेक्षा अधिक निधी खर्च होऊनही संबंधित कामांचा तपशीलवार हिशोब आणि पुरावे प्रशासनाकडे आहेत का, असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.




नगरसेवक लतीफ शेख यांनी दिलेल्या माहितीनुसार, पनवेल महापालिकेकडून २० पाण्याच्या टँकरच्या खरेदीसाठी प्रति टँकर ४७ ते ४८ लाख रुपये खर्चाचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. दुसरीकडे, शासकीय पोर्टलवर १,००० ते १०,००० लिटर क्षमतेचे टँकर सुमारे २३ ते २५ लाख रुपयांच्या दरम्यान उपलब्ध असल्याचा त्यांचा दावा आहे. या दोन दरांची तुलना करता प्रति टँकर २२ ते २५ लाख रुपयांपर्यंत तफावत असल्याचे शेख यांनी निदर्शनास आणले. मात्र, टँकरची क्षमता, तांत्रिक वैशिष्ट्ये, उपकरणे, कर आणि देखभाल यांसारख्या बाबींची तुलना केल्यानंतरच प्रत्यक्ष दरातील तफावत स्पष्ट होऊ शकते. त्यामुळे या खरेदी प्रस्तावाची तांत्रिक व आर्थिक तपासणी करण्याची मागणी त्यांनी केली आहे. तसेच, महापालिकेच्या विकासकामांवर ४० कोटी रु.पेक्षा •➤पान २ वर

### जंजिरा किल्ला बुधवारपासून खुला

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरुड तालुक्यातील राजपुरी येथील ऐतिहासिक जंजिरा किल्ला गेल्या दीड महिन्यांपासून पर्यटकांसाठी बंद ठेवण्यात आला आहे. त्यामुळे देश-विदेशातून किल्ला पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांमध्ये नाराजी व्यक्त होत होती. दरम्यान, पुरातत्त्व विभागाचे सहाय्यक संवर्धक अधिकारी बजरंग येलीकर यांना किल्ला सुरू करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानंतर जंजिरा किल्ला •➤पान २ वर

# मधु कांबीकर यांचे निधन

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मराठी मनोरंजनसृष्टीतून एक दु:खद बातमी समोर येत आहे. ज्येष्ठ अभिनेत्री आणि लावणी कलावंत मधु कांबीकर यांचे निधन झाले आहे. वयाच्या ७३ व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. गेल्या अनेक वर्षांपासून अभिनेत्री आजाराशी झुंज देत होत्या. अखेर सोमवारी (दि.१२) त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या निधनानंतर मराठी सिनेसृष्टीत दु:खाचा डोंगर कोसळला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, २८ जुलै १९५३ साली मधु कांबीकर यांचा जन्म बीड जिल्ह्यातील माळेगाव खुर्द येथे झाला. तमाशाच्या फडातून त्यांच्या कारकिर्दीला सुरुवात झाली. तमाशानंतर त्यांनी रुपेरी पडद्यावर पाऊल ठेवले. चित्रपट, लोकनाट्य, व्यावसायिक रंगभूमी ते दूरदर्शन मालिकांमध्ये त्यांनी महत्त्वाच्या भूमिका साकारल्या आहेत. ज्येष्ठ दिग्दर्शक राजदत्त यांच्या 'शापित' या •➤पान २ वर

# वाद्य वाटप वादाच्या भोवऱ्यात

## जिल्हा परिषदेवर पडणार आर्थिक भार

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

जिल्हा परिषदेकडून देण्यात आलेल्या वाद्यांचा दर्जा चांगला नसल्याचा वाद निर्माण होत असताना वाद्य वाटप वादाच्या भोवऱ्यात सापडले आहे. निवडलेल्या लाभार्थ्यांपैकी वाद्य कोणाला दिले, याची माहितीच घेण्यास जिल्हा परिषद उदासीन ठरले असल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे जिल्हा परिषदेवर वाद्य खरेदीचा अतिरिक्त भार पडल्याची माहिती समोर आली आहे.



भजनी मंडळाला प्रोत्साहन देण्यासाठी रायगड जिल्हा परिषदेने जिल्ह्यातील भजनी मंडळासाठी वाद्य देण्याचा निर्णय घेतला होता. अर्थसंकल्पात त्यासाठी २ कोटी ४० लाख रुपयांची तरतूद केली होती. त्यानुसार रायगड जिल्ह्यातील भजनी मंडळांची माहिती घेण्यात आली. एकूण १ हजार २०० लाभार्थ्यांना लाभ देण्याचा निर्णय घेण्यात आला. सोलापूरमधील एजन्सीला वाद्य पुरवठ्याचा ठेका देण्यात आला. विधानसभा मतदार संघ स्तरावर वाद्य वाटपाचा कार्यक्रम जिल्हा परिषदेकडून करण्यात आला. मात्र, हे वाद्य दर्जाहीन असल्याचा आरोप अनेकांनी केला. त्यामुळे हा वाद मोठ्या प्रमाणात निर्माण झाला होता. हा वाद •➤पान २ वर

> रायगड जिल्ह्यातील १ हजार २०० लाभार्थ्यांना वाद्य देण्याची तरतूद करण्यात आली होती. पनवेलमध्ये झालेल्या कार्यक्रमात कोणाला वाद्य किती दिले, याची पोहच घेतली नाही. त्यामुळे ढोलकी वाद्य अधिक गेल्याची माहिती समोर आली. ढोलक्यांचा तुटवडा कमी झाल्याने शंभर ढोलक्या एजन्सीकडून अधिक मागविण्यात आल्या. त्याच्या खर्चाचा अहवाल अद्याप प्राप्त झाला नाही.
>
> – विशाल तनपूरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग

# नवगावशी जिव्हाळ्याचे नाते



**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

नवगाव हे माझे आवडते गाव आहे. ग्रामस्थांना दिलेला शब्द पूर्ण करून दाखवणे ही माझी भूमिका आहे, अशा शब्दांत शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी नवगावशी असलेले आपले भावनिक नाते व्यक्त केले. मंदिर, रस्ते किंवा अन्य विकासकामे असोत, ग्रामस्थांच्या मागण्या मार्गी लावण्यासाठी आपण प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले. नवगाव येथील भवानी माता मंदिराच्या जीर्णोद्धार व उद्घाटन सोहळ्याचे आयोजन सोमवारी (दि.१२) करण्यात आले होते. त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी शेकापचे ज्येष्ठ नेते शंकरराव म्हात्रे, शेकापच्या महाराष्ट्र राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, तालुका चिटणीस सुरेश घरत, कामगार आघाडीचे नेते प्रदीप नाईक, उद्योजिका व दानशूर व्यक्तिमत्त्व कविता सिंह, प्रमोद घासे, अरुण कवळे, सरपंच अंकिता जैतू, उपसरपंच तथा मंडळाचे उपाध्यक्ष निखिल कवळे, मंडळाचे अध्यक्ष मधुकर घासे, सचिव समीर राऊत यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य, पदाधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**भवानी माता मंदिराच्या उद्घाटन सोहळ्यात जयंत पाटील यांचे प्रतिपादन**

अलिबाग तालुक्यातील नवगाव येथे शिवज्योती मित्र व महिला मंडळाच्या पुढाकारातून भवानी माता मंदिराचा जीर्णोद्धार, प्राणप्रतिष्ठा आणि उद्घाटन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. जयंत पाटील यांच्या हस्ते फीत कापून मंदिराचे उद्घाटन करण्यात आले. •➤पान २ वर

**औरंगजेबाच्या बलाढ्य सत्तेला आव्हान** | **स्वराज्याचा लढा जिवंत ठेवणारी शूर राज्यकर्ती**

# स्वराज्याच्या शौर्यतेजाची लखलखती तलवार : रणदुर्गा ताराराणी

**मिलिंद मधुकर जाधव**




औरंगजेबाच्या बलाढ्य सत्तेला आव्हान देत स्वराज्याचा लढा जिवंत ठेवणारी शूर, धाडसी आणि कुशल राज्यकर्ती! स्वराज्याचे तिसरे छत्रपती राजाराम महाराजांच्या अकाली मृत्यूनंतर स्वत: औरंगजेब हिंदवी स्वराज्यावर चालून आला. सर्वांना वाटलं आता स्वराज्य संपलं. पण ऐन तारुण्यात वैधव्य आलेल्या पंचवीस वर्षांच्या ताराराणींनी चार वर्षांचं लेकरू पदरात असताना स्वराज्याचं नेतृत्त्व करण्याचा अनपेक्षित आणि तेवढाच धाडसी निर्णय घेतला.

शत्रूची ताकद आणि भौगोलिक परिस्थितीचा अचूक अंदाज घेत सर्व सरदारांना एकत्र करून त्यांनी गनिमी काव्याच्या युद्धकौशल्याची रणनीती आखली. औरंगजेब स्वराज्यावर चालून आला त्यावेळी ताराराणींनी त्याला युद्ध थांबवून वाटाघाटी करण्याची विनंती केली. पण हिंदवी स्वराज्य जिंकून आलमगीर होण्याची ख्वाईश बाळगणाऱ्या उन्मत्त औरंगजेबाने ती धुडकावून लावली.शेवटी त्याच ताराराणींनी महाराष्ट्राच्या दऱ्याखोऱ्यात त्याला झुंजत ठेवून नामोहरम केल्यावर, तोच औरंगजेब ताराराणींसमोर समेट करायला तयार झाला. याच वेळी या रणदुर्गेची गर्जना आसमंतात घुमली ''आता समेट नाही, तुझा खात्माच होईल!'' त्यावेळी आपलं अर्ध्यापेक्षा जास्त स्वराज्य औरंगजेबाच्या ताब्यात होतं.

एकेक किल्ल्ल सहा-सात महिने लढवून, पावसाळा जवळ येताच मुघलांकडून मोठी खंडणी घेऊन तो त्यांच्या हवाली करायचा. ही ताराराणींची कूटनीती होती. एकेक किल्ल्यासाठी दोन-दोन वर्ष लढण्यापेक्षा खंडणी देऊन किल्ले ताब्यात आल्यामुळे औरंगजेब आणि त्याचं सैन्य निर्धास्त असायचं. प्रत्येक किल्ल्यावर पावसाळभर पुरेल इतकी शिबंदी आणि धनधान्य भरलं जायचं. मात्र, मोक्याच्या क्षणी गाफील असलेल्या मुघल सैन्यावर निकराचा हल्ला चढवून तेच किल्ले शिबंदीसह मराठे पुन्हा ताब्यात घेऊ लागले. ताराराणींच्या नेतृत्त्वात किल्ल्याचा प्रत्येक चिरा नेटाने लढू लागला.

औरंगजेबाने सहा महिने लढून जिंकलेला सिंहगड मराठ्यांनी पुन्हा अवघ्या दोन तासांत काबीज केला.पन्हाळ्याचा किल्ला तर औरंगजेबाने सात लाखांची खंडणी देऊन ताब्यात घेतला, मात्र दोन महिन्यात धनाजी जाधव यांनी तो पुन्हा जिंकला. त्यांच्या या कल्पक रणनीतीने एकामागून एक किल्ले स्वराज्यात येऊ लागले, दुसरीकडे औरंगजेबाचा खजिना रीता होऊ लागला. या रणनीतीनुसार औरंगजेबाला •➤पान २ वर

# जंतर मंतर आंदोलन स्थळांतून वगळले

**। नवी दिल्ली । प्रतिनिधी ।**

गृह मंत्रालयाने मोठा निर्णय घेतला असून, दिल्लीतील आंदोलनाच्या ठिकाणांबाबत मोठे बदल करण्यात आले आहेत. यावेळी जंतरमंतर येथील आंदोलनाच्या स्थळाबाबत एक महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. गृह मंत्रालयाच्या निर्णयानंतर दिल्ली पोलिसांनी सुरक्षेचे कारण देत आंदोलनासाठी तीन नवीन ठिकाणे निश्चित केली आहेत. त्यामध्ये रामलीला मैदान, बुराडी मैदान आणि सीबीडी ग्राउंड यांचा समावेश आहे. या निर्णयावर कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दीपके यांनी प्रतिक्रिया दिली आहे. यावर त्यांनी संताप व्यक्त केला आहे. तसेच, या निर्णयावर सीजेपीच्या अन्य नेत्यांनीही प्रतिक्रिया दिली आहे. जंतर मंतरला आंदोलनाच्या निश्चित स्थळांच्या यादीतून वगळल्याबद्दल टीका करताना अभिजीत दीपके म्हणाले की, ते आता निदर्शनांचे ठिकाण राहिलेले नाही. कारण त्या भ्याड हुकूमशहाने त्याचे युद्धक्षेत्रात रूपांतर केले होते. आता संपूर्ण देश जंतर मंतर बनेल, असे त्यांनी सांगितले आहे. आंदोलनांच्या बदलत्या ठिकाणांवरून सुरू असलेल्या राजकीय आणि सार्वजनिक चर्चेच्या पार्श्वभूमीवर त्यांचे हे वक्तव्य आले आहे.

# न्यायाच्या प्रतीक्षेत कामगारांची फरफट

## ■ अमोल सांगळे यांचा तीव्र निषेध; २५ ऑक्टोबरपासून आमरण उपोषणाचा इशारा



**। रसायनी । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागातील प्रलंबित प्रकरणाच्या सुनावणीसाठी वारंवार तारखा देण्यात येत असूनही न्यायप्रक्रिया पूर्ण होत नसल्याने खालापूर तालुक्यातील वासांबे मोहोपाडा येथील अमोल सांगळे यांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. सोमवारी (दि.१२) सुनावणीची तारीख निश्चित असतानाही जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) महारुद्र नाळे उपस्थित राहत नसल्याचा आरोप सांगळे यांनी केला आहे. त्यामुळे न्यायाच्या अपेक्षेने कार्यालयात येणाऱ्या कामगारांना वारंवार हेलपाटे मारावे लागत असून त्यांचा वेळ, पैसा आणि श्रम वाया जात असल्याची व्यथा त्यांनी मांडली आहे.

या प्रकरणी अमोल सांगळे यांनी जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद रायगड, अलिबाग यांना अंतिम निवेदन सादर केले आहे. या प्रकरणाची सुनावणी विनाकारण लांबणीवर पडत असल्याचा आरोप करत त्यांनी प्रशासनाकडून तातडीने अंतिम निर्णय घेण्याची मागणी केली आहे.

सांगळे यांच्या म्हणण्यानुसार, दि. १५ जून रोजी झालेल्या सुनावणीवेळी प्रतिवादी पक्षाने मुदतवाढ मागितली होती. त्यानंतर दि.२२ जून रोजीची सुनावणी प्रकृती अस्वास्थ्याचे कारण देत पुढे ढकलण्यात आली. तक्रारदार म्हणून त्यांनी १५, २२ आणि २३ जून रोजी सुनावणीसाठी उपस्थिती लावली. त्यानंतर १३ जुलै, २४ ऑगस्ट आणि १२ ऑक्टोबर अशा तारखा निश्चित होऊनही प्रकरणाचा अंतिम निर्णय झालेला नसल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे. सुनावणीच्या तारखा देणे हेच प्रशासनाचे काम आहे की नागरिकांना न्याय देणेही प्रशासनाची जबाबदारी आहे? असा सवाल सांगळे यांनी उपस्थित केला आहे. प्रत्येक सुनावणीसाठी स्वतःचा वेळ आणि पैसा खर्च करून उपस्थित राहावे लागत असल्याने आर्थिकदृष्ट्या दुर्बल तक्रारदारावर अतिरिक्त आर्थिक भार पडत असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.त्यामुळे या प्रकरणातील सुनावणी वारंवार पुढे ढकलण्याची कारणे लेखी स्वरूपात स्पष्ट करावीत, यापूर्वी झालेल्या व न झालेल्या सुनावण्यांची अधिकृत नोंद उपलब्ध करून द्यावी, तसेच दोन्ही पक्षांना न्याय्य संधी देऊन निश्चित कालमर्यादेत सुनावणी पूर्ण करावी, अशा प्रमुख मागण्या त्यांनी केल्या आहेत. संबंधित कागदपत्रे, यापूर्वीचे आदेश आणि कायदेशीर बाबींचा विचार करून नियमानुसार, निष्पक्ष व कारणांसहित लेखी निर्णय द्यावा, अशीही त्यांची मागणी आहे. वारंवार होणाऱ्या विलंबामुळे प्रशासनाच्या कार्यपद्धतीच्या पारदर्शकतेबाबत प्रश्न निर्माण होत असल्याचे सांगळे यांनी नमूद केले. तथापि, कोणत्याही व्यक्तीवर किंवा अधिकाऱ्यावर पुराव्याविना आरोप करण्याचा आपला हेतू नसल्याचे स्पष्ट करत, विलंबाची कारणे आणि जबाबदारी निश्चित करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

वारंवार सुनावणीच्या तारखा निश्चित होऊनही निर्णय होत नसेल, तर सामान्य तक्रारदाराने न्यायासाठी आणखी किती काळ प्रतीक्षा करायची? हा प्रश्न या निमित्ताने उपस्थित झाला आहे. आता जिल्हा शिक्षण विभाग या प्रकरणाची दखल घेऊन सुनावणी पूर्ण करतो आणि अंतिम निर्णय देतो का, याकडे संबंधित कामगारांचे लक्ष लागले आहे.

### तातडीने निपटारा करावा

प्रशासनाने या अंतिम निवेदनाची गांभीर्याने दखल घेऊन प्रकरणाचा तातडीने निपटारा करावा; अन्यथा रविवार, दि. २५ ऑक्टोबरपासून जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), रायगड यांच्या कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू करण्यात येईल, असा इशारा अमोल किसन सांगळे यांनी दिला आहे.



# डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाचे यश

**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाच्या प्राजक्ता सागवेकर या विद्यार्थीनीने मराठी विभाग महाराष्ट्र शासन, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व मराठी विभाग पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ सोलापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय काव्य वाचन स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावत घवघवीत यश संपादन केले आहे. ही राज्यस्तरीय स्वरचित काव्यवाचन स्पर्धा आभासी अर्थात ऑनलाईन पद्धतीने अभिजात मराठी भाषा दिनानिमित्त आयोजित करण्यात आली होती. यावेळी ''माझी मराठी'' हा विषय देण्यात आला होता. या स्पर्धेत महाराष्ट्रातील ७० कवींनी सहभाग घेतला होता. प्राजक्ताच्या या घवघवीत यशाबद्दल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था कोल्हापूरचे कार्याध्यक्ष अभय कुमार साळुंखे, मुख्य कार्यकारी अधिकारी कौस्तुभ गावडे, डॉ. मुरलीधर वाघ यांनी अभिनंदन केले आहे.



# सुखा दुष्काळ जाहीर करण्याची मागणी

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

अतिवृष्टीमुळे भाताचे रोप (राब) खराब झाल्याने शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागली. त्यानंतर ऑगस्टपासून पावसाने दडी मारल्याने भातपिकाला मोठा फटका बसला आहे. पाण्याअभावी भाताचे दाणे भरण्यापूर्वीच पीक कोलमडले असून, काही ठिकाणी पळींज व खोडकिडीचा प्रादुर्भाव झाला आहे. तर काही ठिकाणी भाताचे पीक अद्याप बाहेर आलेले नाही. त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले असून, तालुक्यात सुखा दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी वरद विनायक शेतकरी सामाजिक संस्था, खानाव च्या वतीने करण्यात आली आहे. संस्थेच्या खजिनदारांनी यासंदर्भात नायब तहसीलदारांना निवेदन दिले.

यंदा भाताचे उत्पादन घटण्याची शक्यता असल्याने लागवडीसाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड करणे शेतकऱ्यांना अशक्य झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची कर्जमाफी करावी, तसेच तालुक्यातील प्रलंबित पीक पाहणी तातडीने पूर्ण करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच, अनेक शेतकऱ्यांच्या फार्मर आयडीमध्ये महसुली गावांची नोंद होत नसल्याने त्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळण्यात अडचणी येत आहेत. ज्याचे दोन महसूल गावात जमीनी आहेत. परंतु फार्मर आयडी एकच गावा येतो. त्यामुळे ही त्रुटी दूर करण्याचीही मागणी करण्यात आली आहे. दुष्काळामुळे जनावरांच्या चाऱ्याची तीव्र टंचाई निर्माण होण्याची शक्यता असून, चारा उपलब्ध करून द्यावा. तसेच, नुकसानभरपाईसाठी बंद असलेली केवायसी प्रणाली तातडीने सुरू करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे.

# जनजागृती, नोंदणी शिबिराचे आयोजन

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

खालापूर महावितरण उपविभागातर्फे तहसील कार्यालयात सौर ऊर्जा जनजागृती व नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी नागरिकांना सौर ऊर्जा योजना, अनुदान आणि बँक कर्ज प्रक्रियेची माहिती देण्यात येत आहे. पीएम सूर्य घर मुफ्त बिजली या योजनेअंतर्गत घरगुती वापरासाठी सौर ऊर्जा पॅनल बसवण्याबाबत सविस्तर माहिती देऊन नोंदणी करण्यात आली. त्याच बरोबर स्मार्ट सोलार योजना व्यावसायिक व इतर ग्राहकांसाठी उपयुक्त सौर योजना, अनुदान व कर्ज सुविधा सोलार पॅनलसाठी मिळणारे शासकीय अनुदान आणि बँकेकडून कर्ज मिळविण्याची प्रक्रिया व आवश्यक कागदपत्रे, शिबिरात सोलार एजन्सीचे प्रतिनिधी आणि बँक अधिकारी यांनी थेट मार्गदर्शन केले जात आहे.




# दुष्काळ परिस्थितीबाबत अलिबागमध्ये बैठक

## ■ पाणी जपून वापरण्याचे भरत गोगावलेंचे आवाहन

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

जिल्ह्यात सध्या धरणांमध्ये जलसाठा मुबलक आहे. मात्र, अपेक्षीत पाऊस नसल्याने पाणी टंचाईची समस्या निर्माण होणार आहे. पाणी साठविण्यासाठी वन बंधारे बांधण्यासह धरणांमधील गाळ काढण्यासाठी प्रयत्न केला जाईल. त्यासाठी कंपन्यांसह शासनाची मदत घेतली जाईल. आरओ प्लांटमधील वाया जाणारे पाणी साठवण करण्याचाही प्रयत्न राहणार आहे. पाणी टंचाई रोखण्यासाठी आतापासूनच सर्वांनी पाणी जपून वापरावे, असे आवाहन पालकमंत्री भरत गोगावले यांनी केले. रायगड जिल्ह्यातील दुष्काळ परिस्थितीबाबत आढावा बैठक जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात आयोजित करण्यात आली. त्यावेळी ते बोलते होते.

या बैठकीला जिल्हाधिकारी किशन जावळे, जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर, शिक्षण सभापती चंद्रकांत कळंबे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, वेगवेगळ्या विभागातील अधिकारी उपस्थित होते. यावेळी पालकमंत्री म्हणाले की, सध्या जिल्ह्यात पाण्याचा प्रश्न नाही. मात्र, आगामी काळात पाण्याचा प्रचंड प्रश्न निर्माण होणार आहे. त्यानुसार, पाण्याचे नियोजन करणे गरजेचे आहे. गट विकास अधिकारी, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी यांनी टंचाईकृती आराखडा तयार करणे, जलसंधारण स्त्रोतांचे बळकटीकरण करणे, पिण्यासाठी राखीव पाणी ठेवणे, पाणी आरक्षण करणे, पिण्याचे पाणी साठवणाला प्राधान्य देणे, त्यानंतर जनावरांना व कंपन्यांना पाणी पुरवठा करणे आवश्यक आहे. जिल्ह्यात वनराई बंधारे बाधून पाणी साठवून ठेवण्याची सुरुवात आतापासून करणे आवश्यक आहे. तसेच, जिल्ह्यातील धरणांमधील गाळ काढण्यासाठी प्रयत्न केले जाईल. त्याची तयारी आतापासूनच करावी, असे आवाहन पालकमंत्री भरत गोगावले यांनी केले.

### अन्यथा होणार अधिकारी निलंबित

पाण्याचा दुष्काळ कमी करण्यासाठी जिल्ह्यात आतापासून वनराई बंधारे बांधण्याचे नियोजन आहे. त्यासाठी लागणारे साधन सामुग्री उपलब्ध केली जाईल. वनराई बंधारे बांधण्याबाबत काही अधिकाऱ्यांनी टाळाटाळ केल्याची तक्रार मागील वर्षी आली होती. यावेळेला टाळाटाळ सहन केली जाणार नाही. बंधारे बांधण्यासाठी टाळाटाळ केल्यास त्या अधिकाऱ्यांना निलंबीत केले जाईल, असा सज्जड दम पालकमंत्री गोगावले यांनी दिला.

## पान १ वरुन

### सरकार नमलं

त्यावर पाच सदस्यीय चौकशी समिती स्थापन करण्यात आली असून, चौकशी होईपर्यंत भीमनवार यांना सक्तीच्या रजेवर पाठविण्यात येणार असल्याची माहिती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिली. तसेच, तुकाराम मुंढे या चौकशी आयोगाचे नवे सचिव असल्याची मोठी घोषणा देखील त्यांनी केली. रात्री १ वाजून २४ मिनिटांनी आयोगाचे भीमनवार यांनी ट्विटरवर पोस्ट करत, ''एमपीएससी पेपरफुटी प्रकरणात राज्य सरकारने न्यायालयीन चौकशीची घोषणा केली. मी माझ्या संपूर्ण आयुष्यात नैतिकतेला कायम प्राधान्य दिले. त्यामुळे ही चौकशी पूर्ण होईस्तोवर पदावर कार्यरत न राहता या कालावधीत रजेवर जाण्याचा निर्णय घेतला आहे,'' असे त्यांनी म्हटले. त्यामुळे एमपीएससी विद्यार्थ्यांनी जल्लोष करत आंदोलन स्थगित केले.

दरम्यान, एमपीएससी आंदोलनाचा चेहरा बनललेल्या विवेकानंद पाटीलने आंदोलन इतके दिवस चालले त्यात सरकारकडूनच चर्चेला उशीर झाल्याचे म्हटले. सरकार पहिल्या दिवशी चर्चेला आले असते तर दुसऱ्याच दिवशी आंदोलन संपले असते. सरकारकडून १० दिवसांनी जाग येते हे आमचे दुर्दैव आहे. चौकशी पारदर्शक व्हावी यासाठी तुकाराम मुंढे यांची चौकशी समिती सचिव पदी मागणी विद्यार्थ्यांनी केली होती. ही मागणी सरकारने मान्य केली आहे. आता हे आंदोलन थांबत नाही, तर तत्वता थांबवत आहे, असे म्हणत विवेकानंद पाटील यांनी आंदोलन थांबवल्याची घोषणा केली. तसेच, भीमनवार हे चौकशीत दोषी आढळले तर त्यांना जेलमध्ये टाका. अभय वाघला संरक्षण देऊ नये. तेच पेपरफुटीचे सूत्रधार होते. ६० दिवसांत चौकशी पूर्ण व्हावी. मी तसेही करिअर दावणीला लावले आहे. अन्यथा ६१व्या दिवशी पुन्हा रस्त्यावर येईन, असा इशाराही देण्यात आला आहे.

### वाद्य वाटप वादाच्या भोवऱ्यात

संपण्याच्या वाटेवर असताना आता वाद्य वाटप करताना लाभार्थ्यांची माहितीच घेण्यास जिल्हा परिषद उदासीन ठरले. त्यामुळे कोणाला वाद्य दिले याची माहितीच जिल्हा परिषदेकडे उपलब्ध झाली नाही. त्याचा परिणाम वाद्यांचा तुटवडा निर्माण झाला. त्यामुळे जिल्हा परिषदेला साधारणपणे शंभरहुन अधिक वाद्य ठेकेदाराकडून मागविण्याची वेळ आली. पनवेल, उरण इत्यादी तालुक्यातील साडेतीनशे मंडळांना वाद्य देण्याचा कार्यक्रम घेण्यात आला. मात्र, हे वाद्य देताना त्याची पोहच घेण्यास प्रशासन उदासीन ठरले. त्यामुळे शंभर भजनी मंडळाला वाद्य देण्यासाठी जिल्हा परिषदेवर वाद्य खरेदीचा अतिरिक्त भार पडल्याची माहिती समोर आली आहे. अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आलेल्या निधी पेक्षा अधिक वाद्य खरेदीचा खर्च जिल्हा परिषदेवर पडणार आहे. सोलापूर येथील एजन्सीकडून अद्याप खर्चाचा अहवाल दिला नाही. त्यामुळे किती अधिक भार पडणार हे त्यानंतर स्पष्ट होणार असल्याची माहिती जिल्हा परिषदेकडून मिळाली आहे. रायगड जिल्हा परिषद गेल्या अनेक दिवसांपासून वादाच्या भोवऱ्यात सापडत आहे. याच जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांच्या स्विय सहाय्यकाने बदलीच्या कामासाठी लाच मागितली होती. याप्रकरणी त्या स्विय सहाय्यकाला रायगडच्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ पकडले होते. तसेच, भजनी मंडळाला देण्यात आलेले वाद्य दर्जाहीन असल्याचा वाद निर्माण झाला होता. मात्र, वाद्य खरेदी करण्यापुर्वी जाणकार मंडळीचा अभिप्राय घेण्यात आला, असे सांगून जिल्हा परिषदेने या वादावर पांघरून घातले. त्यानंतर आता वाद वाटप करताना भोंगळ कारभार पनवेलमध्ये झाल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे जिल्हा परिषद मागील अनेक दिवसांपासून वादाच्या भोवऱ्यात सापडत आहे.

### स्वराज्याच्या शौर्यतेजाची लखलखती तलवार : रणदुर्गा ताराराणी

महाराष्ट्रात अडकवून, ताराराणींनी मुघलांची सत्ता असलेल्या गुजरात, खानदेश, माळवा, बुऱ्हाणपूर या प्रांतात धुमाकूळ घालून त्याला जेरीस आणलं.

सन १७०० ते १७०७ या सात वर्षांच्या कालखंडात एका महिलेने आपल्याला नामोहरम केल्याचं शल्य उराशी कवटाळून त्याला मरावं लागलं. त्यावेळी मराठ्यांचं सैन्य ताराराणींच्या नेतृत्वाखाली त्याच्याच प्रांतात धुमाकूळ घालत होतं. ताराराणींचा आणि एकंदरीत मराठ्यांच्या रुद्रावताराचा धसका घेऊन मरणं, हा नियतीने त्याच्यावर उगवलेला सूड होता. सुमारे दीडशे ते दोनशे वर्षांची कुतुबशाही आणि आदिलशाही अवघ्या दीड-दोन वर्षांत औरंगजेबाने संपवली. पण सत्तावीस वर्षे संघर्ष करूनही मराठ्यांचं हिंदवी स्वराज्य त्याला संपवता आलं नाही. अखेर महाराष्ट्राने त्याला याच मातीत गाडलं. महाराष्ट्रातली त्याची कबर क्रूरता आणि धर्मांधतेची लक्तरं लपेटून एकाकी पडली आहे. मात्र, हिंदवी स्वराज्याचा अचाट, अफाट पराक्रम आजही सर्वांना प्रेरणा देत आहे.

शत्रूच्या सामर्थ्याचा मुकाबला करताना पराक्रमाला बुद्धिमत्तेची आणि धैर्याला दूरदृष्टीची जोड देणारी स्वराज्यनिष्ठ वीरांगना, रणदुर्गा ताराराणी यांच्या चरणी नवरात्रीची तिसरी माळ कृतज्ञतापूर्वक अर्पण.

### पनवेल पालिकेत टँकर खरेदीवरून वाद

अधिक निधी खर्च झाला असतानाही कोणत्या कामासाठी किती रक्कम खर्च करण्यात आली, याचा ठोस हिशोब प्रशासनाकडे उपलब्ध नसल्याचा आरोप शेख यांनी केला. महापालिकेतील सत्ताधारी आणि प्रशासन या दोघांनीही नागरिकांच्या पैशांच्या खर्चाबाबत पारदर्शकता ठेवून जनतेला उत्तर द्यावे, अशी मागणी त्यांनी केली.

### जंजिरा किल्ला बुधवारपासून खुला

बुधवारी (दि.१४) पर्यटकांसाठी खुला करण्यात येईल, असे आश्वासन अधिकाऱ्यांकडून देण्यात आले आहे. सुमारे २२ एकर क्षेत्रावर पसरलेला आणि सुमारे ४० फूट उंच तटबंदीने वेढलेला जंजिरा किल्ला हे रायगड जिल्ह्यातील प्रमुख ऐतिहासिक पर्यटनस्थळ आहे. दरवर्षी लाखो पर्यटक या किल्ल्याला भेट देत असतात. पावसाळ्यात पर्यटकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने शासनाकडून हा किल्ला बंद ठेवण्यात येतो. या कालावधीत किल्ल्याच्या आतील परिसरात तसेच तटबंदीच्या आजूबाजूला पाच ते सहा फूट उंच गवत आणि झाडेझुडपे वाढल्याने सरपटणाऱ्या प्राण्यांचा धोका निर्माण होण्याची शक्यता असते. त्यामुळे पर्यटकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत पुरातत्त्व विभागाने किल्ल्याचे दरवाजे बंद ठेवून चारही बाजूंना कामगार लावून स्वच्छतेचे काम सुरू केले. मात्र, गेल्या दीड महिन्यांपासून हे काम सुरू असल्याने किल्ला पर्यटकांसाठी खुला होण्यास विलंब होत होता. त्यामुळे पर्यटकांमधून नाराजी व्यक्त होत होती. दरम्यान, लोकप्रतिनिधी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी पर्यटकांची होणारी गैरसोय पुरातत्त्व विभागाचे सहाय्यक संवर्धक अधिकारी बजरंग येलीकर यांच्या निदर्शनास आणून देताच त्यांनी बुधवार, १४ ऑक्टोबर रोजी ऐतिहासिक जंजिरा किल्ला पर्यटकांसाठी खुला करण्यात येईल, असे सांगितले. त्यामुळे दीड महिन्यांपासून किल्ला सुरू होण्याची प्रतीक्षा करणाऱ्या पर्यटकांना आता दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

### नवगावशी जिव्हाळ्याचे नाते

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना त्यांनी नवगावशी असलेले आपले जिव्हाळ्याचे नाते अधोरेखित केले.

यापुढे मार्गदर्शन करताना जयंत पाटील यांनी नवगावच्या ग्रामस्थांची आपली कामे मार्गी लावून घेण्याची हातोटी वेगळीच असल्याचे सांगत ग्रामस्थांच्या एकजुटीचे कौतुक केले. ग्रामस्थांनी एकत्र येऊन एखादे काम हाती घेतले, तर ते यशस्वीपणे पूर्ण करण्याची ताकद त्यांच्यात आहे, असेही त्यांनी नमूद केले. ग्रामस्थांच्या योगदानातून भव्य, दिव्य आणि सुसज्ज मंदिराची वास्तू उभी राहणे ही अभिमानाची बाब असल्याचे सांगून त्यांनी सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, शिवज्योती मित्र व महिला मंडळाचे सदस्य, ग्रामस्थ आणि दानशूर व्यक्तींच्या योगदानाचे कौतुक केले. गावाच्या विकासासाठी तसेच धार्मिक आणि सामाजिक कार्यासाठी सर्वांनी एकजुटीने पुढाकार घेण्याचे आवाहनही त्यांनी केले.

### मधु कांबीकर यांचे निधन

चित्रपटातून मधू कांबीकर यांच्या अभिनयाची विशेष दखल घेतली गेली. 'हेच माझं माहेर', 'राघुमैना', 'एक होता विदूषक', 'झपाटलेला', 'डेबू' आणि 'येऊ का घरात' यांसारख्या सिनेमामधील त्यांच्या भूमिका प्रेक्षकांच्या स्मरणात राहिल्या आहेत. त्यांनी मराठी सिनेमांमध्ये विविध भूमिका साकारुन प्रेक्षकांचे मनोरंजन केले. विशेषत: त्यांनी अनेक चित्रपटांत लक्ष्याच्या आईची भूमिका साकारलेली आहे. २०१६ रोजी मधु कांबीकर यांच्या एका कार्यक्रमादरम्यान त्यांची प्रकृती खालावली. तरी देखील त्यांनी जिद्दीने नृत्य सादर केले. त्यानंतर त्यांना पक्षाघाताचा झटका आला. त्यांचा उजवा हात बधीर झाला असल्याची माहिती आहे. आपल्या आजारपणामुळे मधु कांबीकर यांना अभिनय क्षेत्रापासून दूर राहावे लागले. २०१८ साली त्यांना झी चित्र गौरव पुरस्कार सोहळ्यात जीवनगौरव पुरस्कार जाहीर करण्यात आला.

### ''कर्जतला दुष्काळग्रस्त जाहीर करा''

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात भाताची शेती पावसाने परतीचा प्रवास सुरू केल्याने धोक्यात आली आहे. पाहिजे तसा पाऊस पडलानसल्या मुळे भाताचे पीक तयार होऊ शकले नाही. अशी परिस्थिती लक्षात घेता शासनाने कर्जत तालुका दुष्काळग्रस्त जाहीर करावा, अशी मागणी कर्जत तालुका आगरी समाज संघटनेने केली आहे. कर्जत तालुका भाताचे कोठार म्हणून ओळखला जातो. या तालुक्यात यंदा कमी पाऊस झाला असून, भाताची शेती करणाऱ्या शेतकऱ्यांच्या शेतात भाताचे पीक तयार झालेले नाही. दि.१५ सप्टेंबर नंतर तालुक्यात पाऊस न पडल्यामुळे भाताचे पीक आज शेतात करपू लागले आहे. भाताची शेती करणाऱ्या शेतकऱ्यांकडे पावसाची वाट पाहण्याशिवाय कोणताही पर्याय नाही.



# वक्तृत्व, चित्रकला स्पर्धा उत्साहात

**। खरोशी । प्रतिनिधी ।**

पेण एज्युकेशन सोसायटीच्या नाना टिळक प्राथमिक विद्यालय वावोशी येथे शालेय विद्यार्थ्यांच्या चित्रकला आणि वक्तृत्व स्पर्धा घेण्यात आल्या. अतिशय सुंदर व समर्पक चित्र रेखाटन करून विकसित भारताचे स्वप्न चित्रा द्वारे साकारण्यात आले. विद्यार्थ्यांनी अतिशय सुंदर सुरेख आणि आपल्या शैलीमध्ये वक्तृत्व स्पर्धेत ''विकसित भारताचे स्वप्न कसे साकार करता येईल'' आणि ''माझ्या स्वप्नातील भारत कसा आहे'' याविषयी चांगले विचार व्यक्त करून उपस्थितांची वाहवा मिळवली.

या चित्रकला स्पर्धेत प्रथम क्रमांक कैवल्य आढावकर, द्वितीय क्रमांक प्रिन्स केंद्रे, तृतीय क्रमांक पूर्वीजा मोरे यांनी मिळवले. तर, वक्तृत्व स्पर्धेमध्ये ऋतिका यादव प्रथम क्रमांक, उर्मी वालम द्वितीय क्रमांक आणि अथर्व सावंत व काव्यामुंढे तृतीय क्रमांक पटकावला. या विद्यार्थ्यांनी रोख रक्कम देऊन मान्यवरांनी त्यांचा गुणगौरव केला.


सिडको
शहरांचे शिल्पकार

## नोटीस-१

साडेबावीस टक्के योजनेअंतर्गत वाटप भूखंडाचे हस्तांतरण "ना हरकत पत्र" मागणी अर्जानुसार नोटीस श्रीमती. इंदुबाई विष्णू काशिद व राजू बारकु चौधरी, राहणार बी-१५०१, भूखंड क्र. १२, सेक्टर-११, घणसोली, नवी मुंबई- ४०० ७०१ (अर्जदार).

ज्याअर्थी उपरोक्त अर्जदारांनी खाली उल्लेखीत २२.५% योजनेअंतर्गत त्यांना वाटप करण्यात आलेल्या भूखंडाचे मे. महाविर लक्स लिव्हिंग एलएलपी तर्फे भागीदार १) नितेश लक्ष्मणलाल सिंघवी २) नरेंद्र कोठारी ३) सुरेश दफ्तारी ४) ललीत दफ्तारी ५) इंदुबाई विष्णू काशिद ६) राजू बारकु चौधरी यांचे नावे हस्तांतरण करण्याकरीता "ना हरकत प्रमाणपत्रासाठी" मागणी अर्ज केला आहे. त्यामधील समाविष्ट भूखंडाचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| हस्तांतरण अर्ज क्रमांक | अर्जाचा दिनांक | हस्तांतरण करावयाच्या मालमत्तेचा तपशील | | | | वाटप दिनांक | भाडेपट्टा करारनामा तथा भाडेपट्टा करारनामा नोंदणी दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नोड | सेक्टर | भूखंड क्रमांक | क्षेत्र (चौ.मी.) | | |
| ४२६९ | ११/०९/२०२६ | पुष्पक नोड | २६ | ३४४ | ५४०.०० चौ.मी. | ६/७/२०२३ | १०/०७/२०२३ |

या नोटीसद्वारे सदर हस्तांतरणाबाबत कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीस / संस्थेस हरकत / तक्रार नोंदवण्याची असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या मुदतीमध्ये लेखी स्वरूपात आवश्यक त्या पुराव्यासहीत **मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन), १ ला मजला, सिडको भवन, सी.बी.डी. बेलापूर** यांचे कार्यालयात सादर करण्यात यावी. उक्त १५ दिवसांच्या मुदतीमध्ये कोणतीही हरकत लेखी स्वरूपात या कार्यालयात प्राप्त न झाल्यास, सदर ''ना हरकत प्रमाणपत्र'' देणेस कोणत्याही प्रकारची हरकत नाही असे गृहीत धरण्यात येईल व हस्तांतरणाची पुढील कार्यवाही करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

**मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (भूसंपादन)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in

सिडको/जनसंपर्क/२४९/२०२६-२७

## निवडक



### हरवलेल्या बालकाचा दोन तासात शोध

**नेरळ :** नेरळ पोलिसांची कौतुकास्पद कामगिरी केली असून ११ वर्षाच्या बेपत्ता बालकाची शोध अवघ्या दोन तासांत लावला आहे. पोलिसांच्या सतर्कतेमुळे त्या बालकाची सुखरूप सुटका झाली असून पालकांच्या स्वाधीन करण्यात आला. नेरळ पोलीस स्टेशन हद्दीतील खांडा-नेरळ गावातून बेपत्ता झालेला ११ वर्षाचा मुलगा नेरळ पोलिसांच्या तत्परतेमुळे अवघ्या काही तासांत सुखरूप पालकांच्या ताब्यात मिळाला आहे. वडिलांच्या रोषाला सामोरे जावे लागेल या भीतीपोटी हा बालक घराबाहेर थांबला होता. पोलीस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, नेरळ जवळील खांडा येथील रहिवासी मेहरुनमिसा उस्मान शेख यांनी त्यांचा ११ वर्षाचा मुलगा मोहम्मद इमरान बेपत्ता झाल्याची नोंद केली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन नेरळ पोलीस ठाण्यातील गुन्हे प्रकटीकरण पथकांनी या गुन्ह्याचा तपास करण्यास सुरुवात केली. पोलीस अंमलदार केकाण, आशु बेंद्रे, कनके, कनकुटे, डाखोरे, महाकाल यांच्या पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन शोधकार्यासाठी तीन वेगवेगळ्या टीम्स तयार केल्या. पथकाने तातडीने तेथे जाऊन तो सुरक्षित मिळून आला. चौकशीत दरम्यान वडील रागवतील या भीतीपोटी तो जुन्या घराच्या जवळ येऊन थांबला होता. पोलिसांनी घाबरलेल्या बालकाची समजूत काढून त्याला सुखरूप त्याच्या पालकांच्या ताब्यात दिले.



### २०० किलो धान्य वृद्धाश्रमाला भेट

**नवीन पनवेल :** गणपती बाप्पा समोर जमा झालेले धान्य पनवेल तालुक्यातील शांतीवनातील वृद्धाश्रम, आधारघर, भोजनालयास भेट देण्यात आले. कुष्ठरोग निवारण समिती शांतीवनच्या कोषाध्यक्ष रेखा देखणे यांच्या घरच्या गणपतीला शंभर सव्वाशे वर्षाची परंपरा आहे. साधारणपणे २०० ते २५० गणेश भक्तांच्या घरी दर्शनासाठी येत असतात. गणपती उत्सवाचे निमंत्रण देतानाच येणाऱ्या निमंत्रितांना प्रसादा ऐवजी धान्य देवासमोर ठेवण्यास सुचवले. म्हणजे त्या वस्तू समाज उपयोगी संस्थांना देता येतील अशी कल्पना त्यांनी मांडली. या कल्पनेला गणेशभक्तांनी मोठा प्रतिसाद दिला. दरवर्षी २०० किलो पेक्षा जास्त धान्य जमा होत आहे. कुष्ठरोग निवारण समिती शांतीव पनवेल तसेच विविध विभागात हे धान्य जमा करण्यात आले. गणेशभक्तांकडून दरवर्षी जेवढे धान्य जमा होते, तेवढेच धान्य अथवा पैसे त्यांची मुलगी व जावई स्वतः देणगी म्हणून देतात. यावर्षी जवळजवळ १९ प्रकारचे धान्य ५०० किलो धान्य संस्थेच्या वृद्धाश्रम, आधारघर भोजनालय, पेशंट, भोजनालय अशा विविध विभागांना देण्यासाठी संस्थेचे प्रमुख कार्यवाह अजय शिर्के, प्रिया रोडपालकर, बाळाराम रोडपालकर, बाबुराव महाजन यांच्याकडे सुपूर्द केले. संस्थेचे कार्याध्यक्ष ॲड.प्रमोद ठाकूर यांनी या स्तुत्य उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे.



### मुरुड-विहूर रस्त्याची खोदाई

**कोर्लई :** राष्ट्रीय रस्ते विकास महामंडळातर्फे साळाव-मुरुड रस्त्यावरील काँक्रिटिकरणात विहूर रस्त्यावरील वळणावर दोन्ही बाजूंनी सुरू असलेल्या खोदकामामुळे प्रवास खडतर होत असून वाहनचालक प्रवासी, ग्रामस्थांतून तीव्र नाराजी व्यक्त केली जात असून प्रशासन व संबंधित अधिकारी वर्गाने तातडीने योग्य ती कार्यवाही करण्याची मागणी केली जात आहे. मुंबई, पुणे अन्य ठिकाणाहून कोकणात पर्यटक तसेच आजूबाजूच्या परिसरातून याठिकाणी सातत्याने मोठ्या प्रमाणावर वर्दळ असते. राष्ट्रीय रस्ते विकास महामंडळातर्फे साळाव-मुरुड रस्त्यावरील काँक्रिटिकरणात काशिद, दांडा, नांदगाव, विहूर रस्त्यावरील दोन्ही बाजूंनी सुरू असलेल्या खोदाईमुळे प्रवास खडतर होणार होण्याची भिती व्यक्त केली जात आहे. वेळप्रसंगी अपघाताला सामोरे जावे लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. यात जिवित व वित्त हानी झाल्यास याला जबाबदार कोण? राष्ट्रीय रस्ते विकास महामंडळ संबंधित अधिकारी व प्रशासनाने याची तातडीने दखल घेऊन घ्यावी अशी मागणी वाहनचालक प्रवासी ग्रामस्थांकडून केली जात आहे.

# चायनीजच्या नादात आरोग्य धोक्यात



■ टपरीवरील चमचमीत खाण्याने पालकांच्या चिंतेत भर

■ 'जिभेचे चोचले की आरोग्याचा बट्ट्याबोळ?'

**। उरण । प्रतिनिधी ।**

घरात आईने प्रेमाने बनवलेले गरमागरम, पौष्टिक जेवण नको आणि रस्त्याच्याकडेला असलेल्या चायनीजच्या गाड्या, टपऱ्या अन् फास्ट फूड सेंटरवर ताव मारायचा, अशी विचित्र फॅशन सध्या तरुणाईत बोकाळली आहे. जिभेचे चोचले पुरविण्याच्या नादात आरोग्याची मात्र, अक्षरशः वाट लागण्याची भीती निर्माण झाली असून, मुलांच्या या सवयीने पालकांची डोकेदुखी वाढली आहे.

दिवसभर उन्हातान्हात राबायचे, घाम गाळायचा, स्वतःच्या गरजा बाजूला ठेवायच्या आणि मुलांच्या हातात पैसे द्यायचे. मुलांनी चांगले खावे, शिकावे आणि आयुष्यात मोठे व्हावे, ही आई-वडिलांची अपेक्षा. मात्र, हातात पडलेला पैसा पौष्टिक अन्नाऐवजी चायनीज, बर्गर, पिझ्झा, थंडपेये आणि आईस्क्रीमवर उधळला जात असल्याची खंत अनेक पालक व्यक्त करीत आहेत.

घरात आई जेवण वाढून मुलाची वाट पाहत बसते; पण साहेब बाहेरच पोट भरून घरी येतात! आईच्या हातच्या जेवणाला नकार आणि टपरीवरील खाण्याला होकार, या उलट्या संस्कृतीने पालकही हैराण झाले आहेत. 'आम्ही राबायचे कुणासाठी?' हा पालकांचा सवाल आता संतापात बदलू लागला आहे.

उघड्यावर तयार होणाऱ्या खाद्यपदार्थांची स्वच्छता, वापरलेले तेल, पाण्याची गुणवत्ता, खाद्यपदार्थांची साठवणूक आणि हाताळणी याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. अन्नसुरक्षा नियमांचे पालन न झाल्यास दूषित अन्नामुळे विविध आजारांचा धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे केवळ ग्राहकांनी सावध राहणे पुरेसे नाही, तर संबंधित यंत्रणांनीही खाद्यविक्रेत्यांच्या स्वच्छतेची नियमित तपासणी करण्याची गरज आहे.

चटकदार खाण्याची सवय आणि शारीरिक हालचालींचा अभाव यामुळे वजन वाढणे आणि इतर आरोग्यविषयक समस्या निर्माण होण्याचा धोका वाढू शकतो. त्यात थंडपेयांचा आणि अतिसाखरयुक्त पदार्थांचा अतिरेक झाला तर परिस्थिती आणखी गंभीर होऊ शकते. मोबाईल एका हातात, चायनीजची प्लेट दुसर्या हातात आणि मैदान मात्र, ओसाड, असे चित्र विदारक वास्तव दाखवत आहे.

आजच्या तरुणाईने जिभेपेक्षा आरोग्याला महत्त्व देण्याची वेळ आली आहे. मैदानी खेळ, व्यायाम, घरचे ताजे अन्न आणि संतुलित आहार याकडे पुन्हा वळण्याची गरज आहे. पालकांनीही मुलांच्या खाण्याच्या सवयींकडे दुर्लक्ष न करता त्यांच्याशी संवाद साधणे आवश्यक आहे.

प्रशासनानेही आता केवळ पाहत बसण्याची भूमिका सोडावी. शहरातील चायनीज गाड्या, फास्ट फूड सेंटर आणि उघड्यावरील खाद्यविक्री केंद्रांची नियमित तपासणी करावी. स्वच्छता व अन्नसुरक्षा नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर नियमानुसार कठोर कारवाई करावी.खाद्यपदार्थ तयार करण्यासाठी वापरले जाणारे पाणी, तेल, कच्चा माल आणि स्वच्छतेची स्थिती तपासावी.

**नियम मोडणाऱ्यांवर कारवाईची मागणी**

नियम मोडणाऱ्यांना केवळ नोटीस देऊन सोडण्याऐवजी कायद्यानुसार ठोस कारवाई करावी. जिभेच्या चोचल्यासाठी आरोग्याची किंमत मोजायची का? हा प्रश्न आता प्रत्येक पालकाने आणि प्रत्येक तरुणाने स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे. आजची चटक उद्याचा आजार ठरू नये, एवढीच अपेक्षा आहे.

## 'कर्जत तालुक्यात दुष्काळ जाहीर करा'

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यात भाताची शेती पावसाने परतीचा प्रवास सुरू केल्याने धोक्यात आली आहे. गेल्या महिन्यापासून पाऊस पडल नाही. त्यामुळे भाताचे पीक तयार होऊ शकले नाही. अशी परिस्थिती लक्षात घेता शासनाने कर्जत तालुका दुष्काळ ग्रस्त जाहीर करावा अशी मागणी कर्जत तालुका आगरी समाज संघटनेने केली.

१५ सप्टेंबर नंतर पाऊस झालेला नासल्यामुळे भाताचे पीक करपू लागले आहे. शेतकऱ्यांकडे पावसाची वाट पाहण्याशिवाय कोणताही पर्याय नाही. शेतकरी आर्थिक संकटात आला असून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा अशी मागणी कर्जत तालुका आगरी समाज संघटनेने केली. या प्रतीचे निवेदन आ. महेंद्र थोरवे, प्रांत अधिकारी प्रकाश संकपाळ, तहसीलदार डॉ. धनंजय जाधव, पंचायत समिती सभापती नमिता घारे आणि तालुका कृषी अधिकाऱ्यांना दिले.

यावेळी तालुका आगरी समाज संघटना अध्यक्ष संतोष पेरणे, भगवान धुळे, शिवाजी कराळे, सूर्यकांत चंचे, रामचंद्र खरमरे, अविनाश भगत, दशरथ मुने, रामदास माळी, देविदास कोळंबे, ॲड सूर्यकांत मसणे, हेमंत कोंडिलकर, महेश भगत आदी उपस्थित होते.



■ मुरूड खारआंबोळी परिसरात भातशेती हिरवी होत आहे. खूप दिवसाने पाऊस थांबल्याने आकाश निळेशार झाले आहे. शेतात भाताचा लोंब लागला आहे. भात शेतीसाठी अजून पाण्याची आवश्यकता दिसून येत आहे. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

## खालापूर पंचायत समिती राज्यात द्वितीय

■ जिल्ह्याच्या शिरपेचात रोवला तुरा



**। रसायनी । प्रतिनिधी ।**

ग्रामीण विकास, सुशासन आणि लोकसहभागाच्या माध्यमातून गावांच्या सर्वांगीण विकासाला चालना देणाऱ्या 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियाना'मध्ये रायगड जिल्ह्याने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या अभियानात खालापूर पंचायत समितीने राज्यस्तरावर द्वितीय क्रमांक पटकावून जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. नाशिक येथे आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळ्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या सोहळ्यात जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी विशाल तनपुरे, खालापूर पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संदीप कराड यांनी पुरस्कार स्वीकारला. यावेळी उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या चौक व वडवळ ग्रामपंचायतींचे सरपंच तसेच ग्रामपंचायत अधिकारी उपस्थित होते.

या अभियानात जिल्ह्यातील तब्बल १६३ ग्रामपंचायतींनी सहभाग नोंदवला होता. त्यामध्ये खालापूर तालुक्यातील नऊ ग्रामपंचायतींचा समावेश होता.

अभियानातील निर्धारित निकषांनुसार कामांचे नियोजन, विविध विकासकामांची प्रभावी अंमलबजावणी, प्रशासनातील समन्वय आणि नागरिकांचा सक्रिय सहभाग या बाबींमुळे खालापूर पंचायत समितीला राज्यात द्वितीय क्रमांकाचा बहुमान मिळाल्याचे सांगण्यात आले.

दरम्यान, पहिल्या टप्प्यातील यशानंतर 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान-२' या पुढील टप्प्याला सुरुवात झाली आहे.

या अभियानात जलसंधारण, स्वच्छता, ग्रामविकास आणि लोकसहभागाला विशेष प्राधान्य दिले जाणार आहे. ग्रामपंचायत, पंचायत समिती आणि जिल्हा परिषद या तिन्ही स्तरांवर उत्कृष्ट कामगिरी करून पुरस्कार मिळविण्यासाठी प्रयत्न केले जातील, असा निर्धार रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले यांनी व्यक्त केला.

## देवीची दानपेटीही झाली डिजिटल




**। पनवेल ग्रामीण । प्रतिनिधी ।**

नवरात्रोत्सवात देवीच्या दर्शनासाठी भाविकांची गर्दी होत असतानाच देवीसमोरील दानपेटीवर लावण्यात आलेला क्यूआर कोड लक्षवेधी ठरत आहे. डिजिटल व्यवहारांच्या वाढत्या वापराचे प्रतिबिंब आता धार्मिक स्थळांवरील दानपद्धतीतही दिसू लागले आहे. रोख रक्कम जवळ नसली, तरी मोबाईलवरून क्यूआर कोड स्कॅन करून देणगी देण्याची सुविधा उपलब्ध झाल्याने दानपेटीलाही आधुनिक तंत्रज्ञानाची जोड मिळाली आहे. नवरात्रोत्सवात देवीची पूजा, आरती आणि दर्शनासाठी येणारे भाविक श्रद्धेने दान करतात. आतापर्यंत दानपेटीत नाणी आणि नोटा टाकण्याची पारंपरिक पद्धत प्रचलित होती. मात्र, बदलत्या काळानुसार आता डिजिटल पेमेंटचा पर्यायही स्वीकारला जात आहे. देवीसमोरील दानपेटीवर क्यूआर कोड लावल्याने भाविकांना यूपीआयच्या माध्यमातून देणगी देता येणे शक्य झाले आहे. विशेष म्हणजे, धार्मिक परंपरा कायम ठेवत तंत्रज्ञानाचा स्वीकार करण्याचा हा प्रयत्न नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर चर्चेचा विषय ठरत आहे. डिजिटल व्यवहारांचा वाढता प्रभाव आता बाजारपेठांपुरता मर्यादित न राहता धार्मिक स्थळांपर्यंत पोहोचल्याचे यानिमित्ताने दिसून येत आहे.

## कोलाड रेल्वे स्टेशनसमोर बेशिस्त पार्किंगचा विळखा




**। कोलाड । प्रतिनिधी ।**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग ६६ वरील कोलाड रेल्वे स्टेशनसमोरील सर्व्हिस रोडवर बेशिस्त पार्किंगचा प्रश्न ऐरणीवर आला असून या बेशिस्त पार्किंगमुळे नागरिक, वाहनचालक आणि रुग्णवाहिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याची तक्रार नागरिकांकडून करण्यात येत आहे. सर्व्हिस रोडवर वाहने उभी केली जात असल्याने रस्त्यावरील वाहतुकीला अडथळा निर्माण होत असून, या परिस्थितीमुळे सर्वसामान्य नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

महामार्गालगत असलेले सर्व्हिस रोड हे स्थानिक वाहतुकीसाठी तसेच नागरिकांना ये-जा करण्यासाठी महत्त्वाचे असतात. मात्र, कोलाड रेल्वे स्टेशनसमोरील सर्व्हिस रोडवर बेशिस्त पार्किंगमुळे रस्त्याचा वापर वाहतुकीपेक्षा वाहनांच्या पार्किंगसाठी होत असल्याचे चित्र पहावयास मिळत असल्यामुळे सर्व्हिस रोड नेमके पार्किंगसाठी आहेत की वाहतुकीसाठी? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित करण्यात येत आहे. दुकानदारांना व्यवसाय करण्यासाठी रस्त्यावर अतिक्रमण किंवा वाहतुकीला अडथळा होईल अशा पद्धतीने वाहने उभी करण्याची मुभा आहे काय?असा प्रश्नही नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

महामार्गावरील कोलाड रेल्वे स्टेशन समोर असणाऱ्या बेशिस्त पार्किंगमुळे घाई घाईने कोलाड रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या प्रवाशी नागरिकांच्या जिवाला धोका निर्माण होऊ शकतो यामुळे संबंधितांनी याकडे लक्ष देऊन बेशिस्त पार्किंग हटवून रस्ता मोकळा करावा अशी मागणी प्रवाशी

## 'दिवाळीपर्यंत तोडक कारवाई थांबवा'

■ पनवेल व्यापारी महासंघाची आयुक्तांकडे मागणी

**। पनवेल ग्रामीण । प्रतिनिधी ।**

दिवाळीचा सण जवळ आल्याने पनवेल महापालिका क्षेत्रातील व्यापाऱ्यांवर सुरू असलेली तोडक कारवाई दिवाळीपर्यंत थांबवावी, अशी मागणी पनवेल व्यापारी महासंघाने महापालिका आयुक्तांकडे निवेदनाद्वारे केली आहे. सणासुदीच्या काळात व्यापारी आणि ग्राहकांची गैरसोय होऊ नये, यासाठी कारवाईला तात्पुरती स्थगिती देण्याची विनंती महासंघाने केली आहे.

महापालिका क्षेत्रात दुकानांसमोरील शटरपासून तीन फुटांपेक्षा अधिक जागेचा वापर तसेच पावसापासून संरक्षणासाठी उभारण्यात आलेल्या छपरांवर महापालिकेकडून तोडक कारवाई सुरू आहे. ही कारवाई योग्य असून त्याला आपली हरकत नसल्याचे व्यापारी महासंघाने निवेदनात स्पष्ट केले आहे. मात्र, दिवाळीच्या काळात बाजारपेठांमध्ये खरेदीसाठी मोठ्या संख्येने ग्राहक येत असल्याने व्यापाऱ्यांना व्यवसायासाठी पुरेसा वेळ मिळावा, अशी भूमिका महासंघाने मांडली आहे.

दिवाळी संपल्यानंतर व्यापारी स्वतःहून छप्पर आणि दुकानासमोरील अतिरिक्त व्यापलेली जागा हटवून ती मोकळी करून देतील, असे आश्वासनही निवेदनात देण्यात आले आहे. महापालिका प्रशासनाने प्रत्यक्ष पाहणी करून परिस्थितीची खात्री करावी, अशी तयारी व्यापाऱ्यांनी दर्शवली आहे.

पनवेल, नवीन पनवेल, खांदा कॉलनी, कामोठे, कळंबोली आणि खारघर येथील बाजारपेठांमधील तोडक कारवाई दिवाळीपर्यंत थांबवावी, अशी मागणी पनवेल व्यापारी महासंघाचे अध्यक्ष नारायण ठाकूर यांनी केली आहे. आता या मागणीवर महापालिका प्रशासन काय निर्णय घेते, याकडे व्यापाऱ्यांचे लक्ष लागले आहे.

मुरुडमध्ये भव्य स्मारक उभारण्याची मागणी | पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्याचे आवाहन

## नाना पाटेकर यांच्या स्मृतींना उजाळा




**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनाने कलाविश्वासह सामाजिक क्षेत्राची मोठी हानी झाली आहे. त्यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी मुरुड येथे आयोजित शोकसभेत खा. सुनील तटकरे भावूक झाले. नाना पाटेकर यांच्या अभिनय, राष्ट्रभक्ती आणि समाजसेवेतील योगदानाचा गौरव करताना, केंद्र सरकारने त्यांना पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करावे, तसेच मुरुडमध्ये त्यांच्या जीवनकार्यावर आधारित भव्य स्मारक उभारावे, अशी मागणी त्यांनी केली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यानंतर उपस्थितांनी नाना पाटेकरांना पुष्प गुलाब अर्पण करून भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली.

अभिनयासोबत माणुसकीचा वारसा मनोगत व्यक्त करताना तटकरे म्हणाले की, पाटेकर हे केवळ अभिनेते नव्हते, तर अभिनय, स्पष्टवक्तेपणा, राष्ट्रभक्ती आणि माणुसकी यांचा अनोखा संगम असलेले बहुआयामी व्यक्तीमत्त्व होते.

नानांशी असलेल्या मैत्रीच्या आठवणी सांगताना तटकरे भावूक झाले. पाहुण्यांचे स्वतः स्वागत करणे, जेवण वाढणे आणि दरवर्षी गणपतीची सजावट स्वतः करणे, अशा साध्या कृतींतून त्यांच्यातील जिव्हाळा आणि संवेदनशीलता दिसून येत असे, असे त्यांनी सांगितले. प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता गरजूंच्या मदतीसाठी धावून जाणे, हीच त्यांच्या व्यक्तीमत्त्वाची खरी ओळख होती.

नानांच्या जीवनप्रवासाची माहिती भावी पिढ्यांना मिळावी आणि तरुणांना प्रेरणा मिळावी, यासाठी मुरुडमध्ये भव्य स्मारक उभारण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. पद्मश्री पुरस्काराने गौरविण्यात आलेल्या नाना पाटेकर यांना पद्मभूषण मिळावे, यासाठी राज्य आणि केंद्र सरकारकडे पाठपुरावा करण्याचा निर्धारही त्यांनी व्यक्त केला.

या शोकसभेला नगराध्यक्षा आराधना दांडेकर, मंगेश दांडेकर, मनोहर बैले, श्रीकांत सुर्वे, वासंती उमरोटकर, संजय गुंजाळ आदी उपस्थित होते.

**रंगभूमीवर अभिनयाचा ठसा**

मराठी-हिंदी चित्रपटसृष्टी आणि रंगभूमीवर त्यांनी आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला. कारगिल युद्धाच्या काळात मराठा रेजिमेंटमध्ये सेवा बजावण्याची इच्छा व्यक्त करणाऱ्या नानांच्या देशप्रेमाचाही त्यांनी उल्लेख केला.

## अनधिकृत टपऱ्यांवर नगरपालिकेचा हातोडा



**। पेण । प्रतिनिधी ।**

पेण शहरातील अतिक्रमणांविरोधात नगरपालिकेने धडक कारवाई सुरू केली आहे. पेण-अंतोरा रोडवरील नरदास चाळ आणि एसटी स्टँडमागील रस्त्यावरील अनधिकृत टपऱ्या व हातगाड्या हटविण्याची मोहीम आज सकाळपासून अतिक्रमण विभागप्रमुख महेश वडके यांच्या उपस्थितीत राबविण्यात आली. याच परिसरातील अतिधोकादायक आशीर्वाद इमारतीच्या तळमजल्यावरील गाळ्यांत सुरू असलेली फळ व भाजी विक्रेत्यांची दुकानेही तातडीने खाली करण्यात आली. रुंदीकरणानंतर अवघ्या दीड महिन्यातच रस्त्यावर पुन्हा अतिक्रमण झाल्याने प्रशासनाने ही कारवाई केली. येत्या आठवडाभरात चिंचपाडा रोड आणि सरकारी दवाखान्यामागील रस्त्यावरही अतिक्रमण हटविण्यात येणार असल्याची माहिती महेश वडके यांनी दिली.

# सरकारचे दिवस भरले

गेले चार दिवस देशभरात चालू असलेल्या आंदोलनामध्ये जी अभूतपूर्व दडपशाही सुरु आहे त्यावरून सरकारी तंबू में घबराट आहे हे तर स्पष्टच आहे. या निमित्ताने पोलिसांची भूमिका काय असा मुद्दाही समोर आला आहे. शेतकरी कामगार पक्षाच्या मुंबईतील तरुण, तडफदार कार्यकर्त्या साम्या कोरडे यांना मुंबई पोलिसांनी दोन दिवस अक्षरशः नजरकैदेत ठेवले होते. साम्या यांच्या हालचालींवर नजर ठेवण्यात आली होती. त्यासाठी त्यांच्या इमारतीच्या बाहेर तर पोलिसांच्या गाड्या तैनात होत्याच. शिवाय त्यांच्या इमारतीच्या जिन्यांवरही पोलिस उभे होते. ही सर्व तयारी पाहून इथे बॉंब वगैरे तयार केले जातात की काय असे कोणाला वाटले असते. साम्या किंवा शेकापचे सर्वच कार्यकर्ते हे शांततेने लढणारे कार्यकर्ते आहेत. त्यांच्या भूमिका स्पष्ट आहेत. त्यांनी त्या वेळोवेळी मांडल्या आहेत. त्यात कोणताही छुपेपणा नाही. त्यांनी केलेली आंदोलने हीदेखील कायद्याच्या चौकटीत राहूनच केलेली आहेत. तरीही एखाद्या संशयित गुन्हेगाराप्रमाणे त्यांना वागणूक दिली जावी याचा निषेध करावा तितका थोडा आहे. दिल्लीतही याच रीतीने कॉकरोच जनता पार्टीच्या नेत्यांना विमानातून ताब्यात घेण्यात आले. यूट्यूबवर प्रचंड लोकप्रिय असणारे ध्रुव राठी यांनाही भल्या सकाळी त्यांच्या घरात घुसून फरफटत बाहेर नेण्यात आले व वीस तास बेकायदेशीर रीतीने बसवून ठेवण्यात आले. अशा रीतीने एकेका नेत्या व कार्यकर्त्यांना अडकवून ठेवण्यासाठी मुंबई किंवा देशभरातील कोणत्याही पोलिसांची शक्ती वापरली जात असेल तर सरकारचे डोके ठिकाणावर राहिलेले नाही असेच म्हणावे लागेल. याचा अर्थ स्पष्ट आहे. हे सरकार आंदोलकांसमोर हरले आहे. आणि आपण हरलो आहोत हे त्याला कळून चुकले आहे. तो पराभव जनतेपासून लपवण्यासाठी आणि सत्ता सोडावी लागू नये म्हणून ही दडपशाही सुरू आहे. सरकारचे नोकर असलेल्या पोलिसांनाही हा पराभव दिसत आहे. सर्वोच्च न्यायालयाने म्हटल्याप्रमाणे माशी मारण्यासाठी हातोड्याचा वापर केला जात आहे. पोलिस दल म्हणून यांनी आजवर हजारो आंदोलने पाहिली व हाताळली आहेत. त्यामुळे आंदोलन होताच कामा नये हा या सरकारचा आटापिटा पोलिसांनाही केविलवाणा वाटत असेल. एकेका आंदोलकाला घराबाहेरही पडू द्यायचे नाही असा दबाव येऊ लागला त्याअर्थी या सरकारचे दिवस आता भरले आहेत हे पोलिसांनाही कळू लागले असेल.

## पोलिसांच्या मदतीला गुंड

मुंबईत नाही, पण दिल्लीतील आंदोलनादरम्यान दिसलेली आणखी एक गोष्ट चक्रावून टाकणारी आहे. एकीकडे निव्वळ आंदोलक असल्याच्या संशयावरून हरेक तरुणाला शनिवारी हटकले जात होते.कामावर किंवा रुग्णालयात जाणारे लोक, पत्रकार, महिला यांना पकडून पोलिसांच्या गाडीत बसवून ठेवण्यात आले. काही जणांना भटक्या कुत्र्यांना सोडतात तसे दिल्लीच्या बाहेर नेऊन सोडून देण्यात आले. पूर्वी बॅरिकेड्सची उंची पाच फूट होती. आता ती सामान्य माणसांहूनही उंच आठ फूट करण्यात आली. अनेक ठिकाणी रस्त्यांवर काटेरी ठोकळे टाकण्यात आले. कोणत्याही रस्त्यांवर दोन जणांना जमू द्यायला परवानगी दिली जात नव्हती. एकही माणूस सुटून जाऊ नये म्हणून पक्की नाकाबंदी करण्यात आली होती. एकीकडे असा बंदोबस्त असताना दुसरीकडे याच पोलिसांच्या सोबत साध्या वेशातले लाठ्याकाठ्या घेतलेले गुंड इतस्ततः फिरत होते. दिल्ली पोलिसांचा विजय असो अशा चमत्कारिक घोषणा ते देत होते. स्वतंत्र भारताच्या इतिहासात अशा घोषणा कधीही कोणी ऐकलेल्या नाहीत. दिल्ली पोलिसांच्या आणि पंतप्रधान मोदींच्या विरोधात कोणीही काही बोलले तर आम्ही त्याला मारू असे ते जाहीरपणे सांगत होते. कहर म्हणजे अनेक ठिकाणी पोलिसांच्या देखतच ते संभाव्य आंदोलक समजून तरुण मुलांना मारहाण करीत होते. कहर म्हणजे या गुंडांच्या मारहाणीतून महिला आंदोलकही सुटल्या नाहीत. तरुणींना मारहाण केल्याचे काही व्हिडिओ व्हायरल झाले असून हे गुंड कोण्या हिंदू संघटनेचे कार्यकर्ते आहेत असे निष्पन्न झाले आहे. हे प्रकरण अंगाशी येईल असे लक्षात येताच यातील चार-पाच जणांना दिल्ली पोलिसांनी अटक केल्याचे दाखवले असले तरी हेच लोक दिवसाढवळ्या निरपराध व निःशस्त्र लोकांना मारहाण करीत होते तेव्हा शेकडोंच्या संख्येने उपस्थित असलेले पोलिस वा निमलष्करी दलाचे जवान स्वस्थ बसून ते पाहत होते हे लक्षात ठेवायला हवे.

## सर्वोच्च न्यायालयाची जबाबदारी

वाट्टेल ती कारवाई करण्याचे अधिकार, वर्दी, शस्त्रे इत्यादी असूनही दिल्ली पोलिसांना या तथाकथित हिंदुत्ववादी गुंडांची मदत घेऊन आंदोलकांवर हल्ला चढवावा लागावा हे पाहता या देशात फॅसिझम अवतरलेला आहे असे म्हणावे लागेल. यापूर्वी वीस जुलैच्या संसदेवरील मोर्चातही कॉकरोचच्या कार्यकर्त्यांना साध्या वेशातील गुंडांनी असे पिटले होते. आपल्या विरोधकांवर जरब बसवण्यासाठी पोलिस अधिक पाळलेले गुंड अशांच्या ताकदीचा वापर केला जाणे हेच बहुदा मोदी आणि शहा यांच्या विकसित भारताचे लक्षण आहे. दुर्दैवाने वीस जुलैच्या मोर्चाच्या वेळीही सर्वोच्च न्यायालयाने या घटनेची म्हणावी तशी दखल घेतली नव्हती. यावेळी तरी न्यायालयाला त्याविषयी सजग होईल अशी अपेक्षा आहे. रविवारी झालेल्या विशेष सुनावणीदरम्यान न्यायालयाने मेट्रो स्टेशन्स बंद करू नका, विनाकारण लोकांना ताब्यात घेऊ नका अशा सूचना केल्या. पण तोवर खूप उशीर झालेला होता. हजारो आंदोलकांना ताब्यात घेऊन झाले होते. आणखी कित्येक हजारांना दिल्लीपर्यंत पोचताच येणार नाही याची व्यवस्था झाली होती. रेल्वेने तब्बल २४५ गाड्या रद्द केल्या. यावरून केंद्र सरकारच्या त्वेषाची कल्पना येईल. आता तरी न्यायालयाने या एकूण प्रकरणाबाबत अधिक जागरुकपणे व संवेदनशीलतेने वेगाने निर्णय द्यावेत. निवडणूक आयोगाने फॉर्म सहा परस्पर आणि बेकायदेशीरपणे बदलला हे उघड झाले आहे. आयोगाचे अनेक निर्णय, जे बेकायदेशीर आहेत असे ज्ञानेश यांच्याशिवायच्या दोन आयुक्तांनी लिखित स्वरुपात कळवले होते, त्यांची कडक तपासणी न्यायालयाने करायला हवी. ज्ञानेश यांना त्यांच्या पदावरून हाकलायलाच हवे. पण ज्ञानेश यांना पुढे करून निवडणूक आयोगाच्या कामात हस्तक्षेप करणाऱ्या आणि मतदारयाद्यांमध्ये हवे तसे बदल करून घेणाऱ्या सरकारचा मुखवटाही फाडण्याची गरज आहे. हा केवळ एका व्यक्तीला शिक्षा करण्याचा प्रश्न नसून लोकशाही यंत्रणा बळकावून त्याच्या आडून हुकमशाही सत्ता राबवणाऱ्यांचे कारस्थान उघडे पाडले जायला हवे. तरच बहुसंख्य जनतेचे डोळे उघडू शकतील. हे केवळ सर्वोच्च न्यायालयच करू शकते. नव्हे त्याची ती ऐतिहासिक जबाबदारी आहे. पुढच्या काळात दिल्लीतील आंदोलनाबाबत, निवडणूक आयोगाबाबत तसेच बंगालमधील मतदारयाद्यांबाबत सुनावण्या होणार आहेत. दिल्लीचे कालपरवाचे आंदोलन ज्या रीतीने दडपण्यात आले त्याविरुध्दही आवाज उठवला जाईलच. या सर्वांच्या सुनावण्यांमधून सर्वोच्च न्यायालयाने एक ठळक संदेश देण्याची गरज आहे. तो हा की, आंदोलनाला जाणाऱ्या कार्यकर्त्यांवर पाळत ठेवणे किंवा त्यांचे अपहरण करणे म्हणजे या देशातील लोकशाही संस्थांचे अपहरण आहे. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला दिलेल्या राज्यघटनेला पोलिसांनी ताब्यात घेऊन स्थानबद्ध करण्यासारखे आहे. हे होऊ दिले जाणार नाही हे न्यायालयाने ठणकवायला हवे. तसे झाले नाही तर मात्र जनता तिच्या पध्दतीने या प्रश्नाचा निकाल लावेल.

**विचार**

# रशियन तेलामुळे भारताच्या ऊर्जासुरक्षेची कसोटी

***रशियाकडून कच्चे तेल खरेदी करणाऱ्या देशांवर अमेरिका शंभर टक्क्यांपर्यंत शुल्क लावणार आहे. या निर्णयाचा मोठाच नकारात्मक परिणाम भारतावर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे भारतासमोर केवळ रशियाकडून तेल खरेदी सुरू ठेवायची की नाही, एवढाच प्रश्न नाही, तर ऊर्जासुरक्षेचे रक्षण, स्वस्त इंधनाची उपलब्धता, अमेरिकेशी व्यापारसंबंध आणि परराष्ट्र धोरणातील स्वायत्तता यांचा समतोल साधण्याचीही कसोटी आहे.***



**प्रा.जयसिंग यादव**

अमेरिकेने रशियावर आर्थिक दबाव वाढवण्याच्या उद्देशाने 'लिंडसे ओ. ग्रॅहम सॅंक्शनिंग रशिया अँड इराण अॅक्ट ऑफ २०२६' हा कायदा केला आहे. रशियाच्या ऊर्जा आणि संरक्षण क्षेत्रांवर निर्बंध अधिक कडक करण्याबरोबरच रशियन तेल आणि नैसर्गिक वायूची मोठ्या प्रमाणावर खरेदी करणाऱ्या देशांवर अतिरिक्त शुल्क लावण्याचे अधिकार या कायद्यामध्ये आहेत. १८ सप्टेंबरला ट्रम्प यांनी त्यावर स्वाक्षरी केली आणि त्यामुळे हा कायदा लागू झाला. या निर्णयाचे सर्वाधिक थेट परिणाम भारत आणि चीनसारख्या देशांवर होऊ शकतात. भारत सध्या रशियन कच्च्या तेलाचा जगातील प्रमुख आयातदार आहे. त्यामुळे अमेरिकेने शुल्काचा पर्याय प्रत्यक्षात वापरल्यास भारताच्या व्यापारावर आणि विशेषतः अमेरिकेला निर्यात करणाऱ्या उद्योगांवर परिणाम होण्याची शक्यता आहे; मात्र सध्याच्या स्थितीत 'भारतावर शंभर टक्के शुल्क लागू झाले' असे म्हणणे अचूक ठरणार नाही. कायदा असे शुल्क लावण्याचा अधिकार देतो. प्रत्यक्ष निर्णय अमेरिकी प्रशासनाकडून होणे बाकी आहे. याच ठिकाणी भारताची भूमिका महत्त्वाची ठरते. भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने स्पष्ट केले आहे, की देशाच्या १.४ अब्ज लोकांची ऊर्जा सुरक्षा ही सर्वोच्च प्राथमिकता आहे. बदलत्या बाजारपेठेच्या परिस्थितीनुसार आणि विविध स्रोतांमधून ऊर्जा मिळवण्याच्या धोरणानुसार भारत आपली ऊर्जा गरज भागवत राहील, अशी भूमिका सरकारने मांडली आहे. या भूमिकेकडे केवळ राजकीय विधान म्हणून पाहता येणार नाही.

भारत आपल्या कच्च्या तेलाच्या गरजेचा मोठा हिस्सा आयात करतो. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाच्या किमती वाढल्या, पुरवठा विस्कळीत झाला किंवा एखाद्या एका देशाकडून तेल घेण्यावर निर्बंध आले, तर त्याचा परिणाम थेट भारतीय अर्थव्यवस्थेवर होतो. पेट्रोल-डिझेलच्या किमतीपासून वाहतूक खर्चापर्यंत आणि उत्पादन खर्चापासून महागाईपर्यंत अनेक घटकांवर त्याचे पडसाद उमटतात. युक्रेन युद्धानंतर रशियावरील पाश्चात्त्य निर्बंधांच्या पार्श्वभूमीवर भारताने रशियन तेलाची खरेदी मोठ्या प्रमाणावर वाढवली. त्यामागे केवळ राजकीय जवळीक हा घटक नव्हता. उपलब्धता, किंमत, बाजारातील परिस्थिती आणि व्यावसायिक व्यवहार्यता हेही घटक होते, असे भारतीय अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. भारताने त्याच वेळी मध्यपूर्व, आफ्रिका, लॅटिन अमेरिका, युरेशिया आणि अमेरिकेसह विविध भागीदारांकडून ऊर्जा खरेदी करण्याचे धोरण कायम ठेवले आहे. म्हणूनच अमेरिकी दबावाला भारताने भावनिक प्रतिक्रिया देण्यापेक्षा आर्थिक आणि सामरिक गणितातून उत्तर देणे आवश्यक आहे. ऊर्जा पुरवठ्यासाठी कोणत्याही एका देशावर अवलंबून राहणे धोकादायक आहे; परंतु केवळ दबावाखाली स्वस्त आणि उपलब्ध ऊर्जा स्रोत सोडणेही भारतीय अर्थव्यवस्थेसाठी सहज पचणारे ठरणार नाही. ऊर्जा बाजार हा भावनांवर नव्हे, तर किंमत, पुरवठा, वाहतूक, विमा, चलन आणि दीर्घकालीन करार यांसारख्या घटकांवर चालतो.

अमेरिकेच्या नव्या कायद्यामागील उद्देशही समजून घ्यावा लागेल. रशियाला मिळणाऱ्या ऊर्जा उत्पन्नावर दबाव आणून युक्रेनमधील युद्धासाठी उपलब्ध आर्थिक साधने कमी करणे हा या निर्बंधांचा व्यापक उद्देश आहे. कायद्यामध्ये रशियन अधिकारी, बँका, ऊर्जा आणि संरक्षण क्षेत्रांवर निर्बंध तसेच निर्बंध टाळण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या 'शॅडो फ्लीट'वरील कारवाईचाही समावेश आहे; मात्र रशियावर दबाव आणताना भारतासारख्या मोठ्या अर्थव्यवस्थेवर शुल्काचा दबाव आणण्याचे व्यापक परिणामही होऊ शकतात. भारत हा केवळ रशियाकडून तेल घेणारा देश नाही. तो अमेरिकेसाठी मोठी बाजारपेठ आणि महत्त्वाचा व्यापार भागीदारही आहे. त्यामुळे ऊर्जा व्यापार आणि द्विपक्षीय व्यापार याकडे एकाच चौकटीत पाहिल्यास प्रश्न अधिक गुंतागुंतीचा होतो. अमेरिकेतील काही विश्लेषकांनीही अशा शुल्काच्या संभाव्य परिणामांबाबत चिंता व्यक्त केली आहे. काहीजणांच्या मते, मोठ्या प्रमाणावर शुल्क लावल्याचा फटका केवळ भारताला किंवा चीनला बसणार नाही. जागतिक ऊर्जा बाजार, अमेरिकी ग्राहक आणि व्यापार संबंधांवरही परिणाम होऊ शकतो. त्यामुळे निर्बंधांचे राजकीय उद्दिष्ट आणि त्याचे आर्थिक परिणाम यांच्यातील अंतर लक्षात घेणे आवश्यक आहे. गेल्या काही दशकांमध्ये संरक्षण, तंत्रज्ञान, व्यापार, इंडो-पॅसिफिक आणि चीनसंबंधी धोरण अशा अनेक क्षेत्रांमध्ये दोन्ही देशांमध्ये सहकार्य वाढले आहे. त्यामुळे एका मुद्द्यावर निर्माण झालेला तणाव संपूर्ण संबंधांवर परिणाम करणार नाही, यासाठी दोन्ही बाजूंना मुत्सद्देगिरीची गरज आहे.

अमेरिकेचे माजी राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार एच. आर. मॅकमास्टर यांनीही भारत-अमेरिका संबंधांच्या दीर्घकालीन महत्त्वावर भर देत, भारताने रशियाविरोधात भूमिका घेण्यासाठी किंवा ब्रिक्ससारख्या समूहांपासून दूर जाण्यासाठी दबाव आणणे टाळावे, असे मत व्यक्त केले आहे. भारतासाठी खरी अडचण 'अमेरिका की रशिया' अशी निवड करण्याची नाही. भारताच्या परराष्ट्र धोरणासमोर आज अनेक केंद्रांशी एकाच वेळी संबंध ठेवण्याचे आव्हान आहे. रशियाशी संरक्षण आणि ऊर्जा संबंध आहेत. अमेरिकेशी तंत्रज्ञान, व्यापार आणि संरक्षण सहकार्य आहे. मध्यपूर्व भारतासाठी ऊर्जा सुरक्षेच्या दृष्टीने महत्त्वाची आहे, तर चीन हा मोठा व्यापारी आणि सामरिक घटक आहे. त्यामुळे कोणत्याही एका समीकरणाला सर्व काही समर्पित करणे भारताच्या हिताचे ठरणार नाही. या पार्श्वभूमीवर ऊर्जा स्रोतांचे विविधीकरण हा दीर्घकालीन उपाय आहे. भारताने मध्यपूर्वेवरील अवलंबित्व कमी करण्यासाठी रशियन तेलाचा वापर वाढवला. आता रशियावरील संभाव्य अमेरिकी दबावामुळे पुन्हा स्रोतांचे संतुलन साधावे लागेल. अमेरिकेकडून ऊर्जा आयात वाढवणे, मध्यपूर्वेतील पुरवठा सुरक्षित ठेवणे, आफ्रिका आणि लॅटिन अमेरिकेतील पर्याय शोधणे आणि देशांतर्गत अक्षय ऊर्जा क्षमता वाढवणे या उपायांचा एकत्रित विचार आवश्यक आहे. यासोबतच देशाच्या तेल शुद्धीकरण क्षमतेचा आणि धोरणात्मक पेट्रोलियम साठ्याचा विस्तारही महत्त्वाचा ठरतो. कारण जागतिक बाजारात कोणत्याही कारणाने पुरवठा कमी झाला, तर कच्च्या तेलाची किंमत वाढते आणि त्याचा परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर होतो.

एखाद्या राष्ट्राचे ऊर्जा सुरक्षा धोरण केवळ तेल कुठून खरेदी करायचे एवढ्यापुरते मर्यादीत नसते, तर संकटाच्या काळात किती काळ पुरवठा सुरक्षित ठेवता येतो, याचाही प्रश्न आहे. नव्या कायद्याने अमेरिकी अध्यक्षांना मोठे अधिकार दिले असले, तरी त्यांचा प्रत्यक्ष वापर कोणत्या देशावर, किती प्रमाणात आणि कोणत्या अटींवर केला जाईल, हे पुढील निर्णयांवर अवलंबून आहे. त्यामुळे तातडीने निष्कर्ष काढण्यापेक्षा घटनाक्रमावर बारकाईने लक्ष ठेवणे आवश्यक आहे. भारताने या परिस्थितीत दोन गोष्टी स्पष्टपणे साध्य करायला हव्यात. पहिली म्हणजे देशातील ग्राहक आणि उद्योगांना परवडणारी ऊर्जा उपलब्ध राहणे. दुसरी म्हणजे कोणत्याही बाह्य दबावामुळे भारताच्या व्यापक व्यापार आणि परराष्ट्र धोरणाच्या पर्यायांवर अनावश्यक मर्यादा येऊ नयेत. या दोन्ही उद्दिष्टांचा समतोल साधणे सोपे नाही; पण हाच मुत्सद्देगिरीचा कस आहे. रशियन तेलाचा मुद्दा हा आता केवळ भारत-रशिया किंवा भारत-अमेरिका संबंधांचा विषय राहिलेला नाही. तो जागतिक ऊर्जाबाजार, युद्धाचे अर्थशास्त्र, निर्बंधांचे राजकारण आणि बदलत्या बहुध्रुवीय जगाचा भाग बनला आहे. अमेरिकेने रशियावर आर्थिक दबाव वाढवण्याचा मार्ग निवडला आहे. भारताला मात्र आपल्या ऊर्जा गरजा आणि राष्ट्रीय हित लक्षात घेऊन पुढची पावले उचलावी लागतील. भारताने या संकटाकडे एका देशाविरुद्ध दुसऱ्या देशाची निवड म्हणून पाहण्याऐवजी ऊर्जा स्वावलंबनाच्या दिशेने आणखी एक इशारा म्हणून पाहिले पाहिजे. स्वस्त तेल मिळत असताना त्याचा लाभ घेणे आवश्यक होते; परंतु त्याच वेळी पर्यायी ऊर्जा स्रोत, अक्षय ऊर्जा, इलेक्ट्रिक वाहतूक, ऊर्जा कार्यक्षमता आणि धोरणात्मक साठे यांना वेग देणेही तितकेच आवश्यक आहे.

**चर्चा आजची**

# सागरी सुरक्षा मजबूतीसाठी पुढाकार



**प्रमोद जाधव**

सागरी सुरक्षेबाबत जनजागृती वाढविण्यासाठी आणि सुरक्षा यंत्रणांमध्ये समन्वय साधण्यासाठी रायगड पोलिसांच्या वतीने सागरी सुरक्षा चषक कबड्डी स्पर्धा आयोजित करण्यात आली. पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या संकल्पनेतून ही स्पर्धा घेण्यात आली असून या वर्षी स्पर्धेचे दुसरे पर्व होते. या स्पर्धांमधून सागरी सुरक्षा अधिक मजबूत व बळकट करण्यासाठी पोलीस दलाने पुढाकार घेतला. या उपक्रमाला रायगड जिल्ह्यातील मच्छिमार, मच्छिमार सोसायटी व कोळी बांधवांकडून उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.

खेळातून समन्वय, एकजूटीतून सागरी सुरक्षेचा संकल्प आणि सागरी सुरक्षेचा संदेश अधिक दृढ करण्यासाठी गतवर्षापासून सागरी सुरक्षा चषक कबड्डी स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. यावर्षीचे दुसरे पर्व होते. खेळासाठी चुरस, संघ भावना आणि परस्पर समन्वय निर्माण करण्यासाठी स्पर्धा घेण्यात आली. समुद्राची सुरक्षा केवळ गस्त, बोटी आणि यंत्रणांमुळे होत नाही; संकटाच्या क्षणी कोण आधी प्रतिसाद देतो, कोण माहिती पोहोचवतो आणि कोण कोणाच्या मदतीला धावून जातो, यावरही ती अवलंबून असते. याच समन्वयाचा अनोखा धडा अलिबागच्या समुद्रकिनाऱ्यावर कबड्डीच्या मैदानातून देण्यात आला. पुरुष विभागात पोयनाड पोलीस स्टेशनने प्रथम क्रमांक पटकावला. वडखळ पोलीस स्टेशनला द्वितीय तर श्रीवर्धन पोलीस स्टेशनला तृतीय क्रमांक मिळाला. महिला विभागातही पोयनाड पोलीस स्टेशनने बाजी मारत प्रथम क्रमांक पटकावला. मांडवा पोलीस स्टेशन द्वितीय तर दिघी सागरी पोलीस स्टेशन तृतीय ठरले.अलिबागच्या नगराध्यक्षा अक्षया नाईक यांची उपस्थिती यावेळी लक्षवेधी ठरली. सागरी सुरक्षा, पर्यटन आणि नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या या उपक्रमाला उपस्थित राहून त्यांनी खेळाडूंचा उत्साह वाढविला.

मांडवा सागरी, रेवदंडा, मुरूड आणि दिघी सागरी या ठिकाणी साखळी पद्धतीने झालेल्या पुरुष व महिला विभागातील सामन्यांनंतर अलिबाग मुख्य समुद्रकिनारी अंतिम दिवसाचे सामने पार पडले. कबड्डीतील झटपट निर्णय, एकमेकांना दिलेली साथ आणि प्रतिस्पर्ध्यांच्या हालचालीचा अचूक अंदाज हे गुण सागरी सुरक्षेच्या कामातही तितकेच महत्त्वाचे असल्याचा संदेश या स्पर्धेतून अधोरेखित झाला.

विशेष म्हणजे, ही स्पर्धा केवळ पोलिसांच्या क्रीडा कौशल्याची चाचणी न ठरता किनारपट्टीवरील विविध सुरक्षा यंत्रणांना एका मैदानावर आणणारा संवादाचा मंच ठरली. समुद्रात एखादी दुर्घटना घडल्यास पोलीस दल, सागरी सुरक्षा रक्षक आणि स्थानिक कोळी बांधव यांच्यातील तातडीचा समन्वय किती महत्त्वाचा आहे, याची जाणीव या उपक्रमातून अधिक ठळक झाली.

या कार्यक्रमाला रायगड जिल्हाधिकारी किशन जावळे, रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, रायगडच्या पोलीस अधीक्षक आँचल दलाल, अलिबागच्या नगराध्यक्षा प्रशांत नाईक, उपनगराध्यक्षा अॅड. मानसी म्हात्रे, बांधकाम सभापती प्रशांत नाईक व ऋषिकेश माळी यांची प्रमुख उपस्थिती होती. विजेत्या संघांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.यावेळी शाहीर शिवडीकर (पापलेटवाली फेम गायक) आणि राजेश हार्डे (वेसावकर फेम) यांनीही उपस्थित राहून खेळाडूंचा उत्साह वाढविला.समुद्राच्या लाटांशी रोज सामना करणाऱ्या रायगडमध्ये सुरक्षेची टीम किती मजबूत आहे, हे दाखवणारा हा उपक्रम ठरला. मैदानावरची एकजूट उद्या समुद्रातील संकटाच्या वेळीही तितक्याच वेगाने कामाला यावी, हाच या स्पर्धेचा खरा संदेश ठरला. रायगड जिल्ह्याला २४० किलो मीटरचा समुद्र किनारा लाभला आहे. जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्यांपैकी साधारपणे ११हूनअधिक पोलीसठाणे सागरी पोलीस ठाणे म्हणून ओळखले जातात.त्यामध्ये अलिबाग, मुरूड, श्रीवर्धन, दिघीसागरी, मांडवा सागरी, रेवदंडा आदी पोलीस ठाण्यांचा समावेश आहे.सागरी सुरक्षा अधिक मजबूत ठेवण्यासाठी रायगड पोलिसांमार्फत वेगवेगळे उपक्रम राबविले जातात. वर्षातून दोनवेळा सागरी सुरक्षा कवच अभियान राबविले जाते.३६ तास पोलिसांचा कडेकोट पहारा ठेवून समुद्रातील खाडीमधील तसेच रस्त्यांवरील संशयीत हालचालीवर लक्ष ठेवण्याचे काम केले जाते. जिल्ह्यातील मच्छिमार सहकारी संस्था व खोल समुद्रात जाणाऱ्या बोटी मालकांशी संवाद साधून मासेमारीला जाणाऱ्यांची माहिती पोलिसांकडून घेतली जाते. समुद्रातून होणाऱ्या संशयीत हालचालीवर लक्ष ठेवण्याचे आवाहन केले जाते. त्यामुळे मच्छिमार आणि सागरी सुरक्षा यंत्रणेतील समन्वय अधिक मजबूत ठेवण्याचा प्रयत्न पोलीसांमार्फत होत आहे. रायगडच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी जिल्ह्याचे पदभार स्विकारल्यानंतर सागरी सुरक्षेसाठी पाऊल उचलण्यास सुरुवात केली. सागरी किनारी राहणाऱ्या जनतेशी संवाद अधिक मजबूत व्हावा, यासाठी सागरी सुरक्षा कबड्डी चषक स्पर्धेला सुरुवात केली आहे. गतवर्षीप्रमाणे यंदाही या उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळाल्याचे चित्र दिसून आले.

**लोकसंसद**

## दुर्मिळ वनौषधी संवर्धनाकडे वनविभाग लक्ष देणार का?

सह्याद्रीच्या कुशीत वसलेल्या पन्हाळा, गगनबावडा आणि शाहुवाडी तालुक्यांच्या जंगलात केवळ मोठमोठी झाडेच नाहीत तर औषधी आणि जैवविविधतेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या असंख्य वनस्पतींचा अमूल्य ठेवा असल्याचे वृत्त वाचनात आले नरक्या, कळलावी, कंदील, सर्पगंधा, काळी मुसळी, सफेद मुसळी, रानहळद, रानआले, शतावरी, कांचन, करवंद, हिरडा, बेहडा, आवळा, अडुळसा, कुडा, कडुनिंब,अर्जुन, जांभूळ, उंबर, पांगरा आणि सोनकी यासारख्या वनस्पतींचे अस्तित्व या जंगलांच्या जैवविविधतेचे महत्त्व अधोरेखित करते मात्र या वनसंपदेच्या संवर्धनासाठी प्रत्यक्ष जंगलात किती नियोजनबद्ध काम केले जाते असा सवाल उपस्थित होतो आहे अनेक नव्याने उगवलेल्या रोपांभोवती वेली, काटेरी झुडप, गवत आणि इतर वनस्पती मोठ्या प्रमाणात वाढल्याने लहान रोपांना आवश्यक प्रकाश, हवा रोपं वाढीसाठी जागा मिळत नसल्याने औषधी वनस्पतींची वाढ खुंटण्याची शक्यता आहे त्यासाठी दुर्मिळ आणि औषधी वनस्पतींची स्वतंत्र नोंद, नियमित पहाणी, आवश्यक अधिवास व्यवस्थापन आणि नैसर्गिक पुनरुत्पादनासाठी ठोस नियोजन करणे गरजेचे आहे सद्या आपल्या देशांमध्ये आयुर्वेदाला महत्त्व आले आहे त्यामुळे जंगलातील औषधी वनस्पतींना महत्त्व देणे तितकेच गरजेचे आहे वनसंपदेच्या संवर्धनाला प्राधान्य दिले जाते का? याचाही आढावा घेणे आवश्यक आहे जंगल केवळ मोठ्या झाडांनी तयार होत नाही. जमिनीपासून उगवणाऱ्या प्रत्येक वनस्पतीपासून जंगलांची जैवविविधता तयार होते.

**राजू जाधव, मांगूर जि. बेळगांव**

**दिनविशेष**

# प्रसिद्ध पार्श्वगायक, अभिनेता किशोर कुमार



किशोर कुमार हे पार्श्वगायक, गायक, अभिनेता, गीतकार, संगीतकार, निर्माता, दिग्दर्शक आणि पटकथालेखक होते. हिंदी व्यतिरिक्त, त्यांनी बंगाली, मराठी, आसामी, गुजराती, कन्नड, भोजपुरी, मल्याळम, आणि उर्दू यासह अनेक भारतीय भाषांमध्ये गायन केले आहे. त्यांचा जन्म ४ ऑगस्ट १९२९ रोजी मध्य प्रदेशातील खांडवा या गावी झाला. त्यांचे नाव आभास कुमार ठेवण्यात आले. त्यांचे वडील कुंजलाल गांगुली हे वकील होते, आई गौरीदेवी या एका श्रीमंत घराण्यातील होत्या. किशोर कुमार आपल्या भावंडात सर्वात लहान होते. भाऊ अशोक कुमार बॉलीवुडमध्ये प्रसिद्ध झाल्यावर, गांगुली परिवाराचे मुंबई दौरे वाढत गेले. आभास कुमार यांनी याच वेळी आपले नाव किशोर कुमार ठेवून आपल्या फिल्मी कारकीर्दीला सुरुवात केली. बॉम्बे टॉकीजमध्ये ते समूहगायक म्हणून काम करीत. अभिनेता म्हणून त्यांचा पहिला चित्रपट शिकारी (इ. स. १९४६) होता. या चित्रपटात अशोक कुमार यांची प्रमुख भूमिका होती. संगीतकार खेमचंद प्रकाश यांनी किशोर कुमार यांना जिद्दी (इ. स. १९४६) या चित्रपटासाठी गाण्याची संधी दिली. हे गाणे होते मरने की दुआएँ क्यों मांगूँ. यानंतर किशोर कुमार यांना गाण्याच्या बऱ्याच संधी मिळाल्या. इ. स. १९४९ साली त्यांनी मुंबईत राहण्याचे निश्चित केले.बॉम्बे टॉकीजच्या फणी मजूमदार दिग्दर्शित आंदोलन (इ.स. १९५१) या चित्रपटात त्यांनी हिरोचे काम केले. त्यांची गायकीची कला दाखविण्याचे श्रेय संगीतकार एस. डी. बर्मन यांना जाते. पडोसन चित्रपटातील किशोर कुमार, सुनील दत्त आणि मेहमूद यांच्यातील संगीत आणि विनोदी द्वंद्व या चित्रपटाचे मुख्य आकर्षण आहे. एक चतुर नार करके सिंगार हे त्यातील गीत खूप गाजले. किशोरकुमारचा 'चलती का नाम गाडी' हा चित्रपट म्हणजे कॉमेडीची तीन तासांची नॉनस्टॉप गाडी होती. फूल टू धम्माल, असे या चित्रपटाचे वर्णन करता येईल. त्याकाळी या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर जबरदस्त कमाई केली होती. यातील गाणीही तुफान लोकप्रिय झाली होती. यातील ङ्गपाच रुपया बारा आनाफ या गाण्याचाही एक मिश्कील किस्सा आहे. किशोरकुमारचा जन्म मध्य प्रदेशमधील खांडव्यामधील तर कॉलेजमधील शिक्षण इंदूरमध्ये घेतले.

१९४६ मध्ये ङ्गशिकारीफ या चित्रपटात किशोरकुमारने गायलेले 'आके सीधी लगी दिल पे ' हे गाणे एकदम भन्नाट आहे. हे गाणे किशोरने पुरुष आणि महिलेच्या आवाजात गायले आहे. खरे तर हे गाणे लता मंगेशकार गाणार होत्या. पण किशोरकुमारनेच दोन्ही आवाजात ते गायलं. किशोरकुमार काय तयारीचा गायक होता, हे या गाण्यावरून सहज लक्षात येते. किशोरकुमारने सर्व संगीतकारांसोबत काम केले आहे. तरीही आरडी, आशा भोसले आणि किशोरकुमार हे त्रिकुट औरच होते. किशोरने बंगाली, तामीळ, आसामी, गुजराती, कन्नड, भोजपुरी, मल्याळम तसेच मराठी आणि इतर भाषांमधीलही गाणी गायली आहेत. मराठीतील ङ्गअश्विनी, तू ये नाफ आणि अगं हेमा, माझ्या प्रेमा ही गाणी आजही तुफान लोकप्रिय आहेत. किशोर कुमार यांचे १३ ऑक्टोबर १९८७ रोजी मुंबईत निधन झाले.

# अवकाळी पाऊस ठरतोय चिंतेचा विषय

## ● खरीप हंगामातील पिकांची दयनीय अवस्था ●म्हसळ्यात यंदा ३६९० मिमी पावसाची नोंद



**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

यावर्षी झालेल्या पावसाचे अनियमित प्रमाण आणि ऑक्टोबर महिना सुरू होताच वाढलेला उन्हाचा तडाख्यामुळे म्हसळा तालुक्यात चिंतेचे ढग जमा झाले आहेत. प्रचंड उकाडा, खरीप हंगामातील पिकांची दयनीय अवस्था, संभाव्य पाणीटंचाई आणि अवकाळी वादळी पावसाची भीती अशा दुहेरी-तिहेरी संकटांचा सामना सध्या स्थानिक नागरिकांना व शेतकऱ्यांना करावा लागत आहे. निसर्गाच्या या अनिश्‍चित चक्रव्यूहामुळे ग्रामीण भागातील जनजीवन पुरते विस्कळीत झाले आहे. पावसाचे अनियमित प्रमाण आणि खरीप पिकांची दयनीय अवस्थाकोकणातील पर्जन्यबहुल तालुका म्हणून ओळखल्या जाणाऱ्या म्हसळा तालुक्यात दरवर्षी सरासरी ४ ते साडेचार हजार मिमी पाऊस पडतो. यंदा ३६९० मिमी पावसाची नोंद झाली असली तरी, पावसाचे आगमन उशिरा होणे आणि ऐन हंगामात पावसाने घेतलेली विश्रांती यामुळे पावसातील सातत्य पूर्णपणे खंडित झाले. याचा थेट परिणाम भात, नाचणी, वरी यांसारख्या प्रमुख खरीप पिकांच्या वाढीवर झाला आहे. अपेक्षित उत्पादन हाताशी येईल की नाही, याबद्दल शेतकऱ्यांमध्ये मोठी साशंकता निर्माण झाली आहे.

वन्यप्राण्यांचा उपद्रव आणि आर्थिक संकटाची भीतीपिकांची घटलेली वाढ आणि शेतीचा वाढता खर्च यांमुळे शेतकरी आधीच हैराण असताना, माकडे, रानडुकरे आणि इतर वन्यप्राण्यांकडून पिकांची मोठी नासधूस केली जात आहे. ग्रामीण भागातील बहुतांश कुटुंबांचा वर्षभराचा उदरनिर्वाह खरीप हंगामावरच अवलंबून असतो. मात्र, पिकांचे होणारे नुकसान आणि घटणारे उत्पादन यामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

प्रशासकीय उपाययोजनांची तातडीने गरजबदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने संभाव्य पाणीटंचाईचा त्वरित आढावा घेणे, जलस्रोतांची पाहणी करणे आणि पिकांच्या नुकसानीची वस्तुनिष्ठ माहिती गोळा करून योग्य उपाययोजना राबवणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच हवामानाचे अधिकृत अंदाज आणि शेतीविषयक मार्गदर्शन वेळेत शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवणे आवश्यक बनले आहे.

ऑक्टोबर महिन्यात उन्हाची तीव्रता प्रचंड वाढल्यामुळे आगामी काळात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न ऐरणीवर येण्याची शक्यता आहे. पावसाळ्यात भरलेले तलाव, विहिरी आणि नैसर्गिक जलस्रोत यांची पातळी खालावल्यास पाणीटंचाई तीव्र होऊ शकते. त्यामुळे उन्हाचा कडाका असाच राहिल्यास प्रशासनाला पाणीपुरवठ्याचे नियोजन आणि जलस्रोतांचे संवर्धन यासाठी आत्तापासूनच विशेष पावले उचलावी लागतील. एकीकडे सुकत चाललेल्या पिकांना पाण्याची गरज असताना, दुसरीकडे अचानक येणारा वादळी किंवा अवकाळी पाऊस हाताशी आलेले पीक हिरावून नेईल की काय, अशी भीती शेतकऱ्यांच्या मनात आहे.

### शेतकरी चिंताग्रस्त

पाऊस पडला तरी चिंता आणि नाही पडला तरी चिंता, अशा विचित्र कात्रीत शेतकरी सापडला आहे. हवामान खात्याच्या येणाऱ्या अंदाजानुसार नियोयन करण्यातही धास्ती वाटत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

## ज्ञानांकुर स्कूलला ‘स्टार एज्युकेशन’ पुरस्कार प्रदान



**। कोलाड । प्रतिनिधी ।**

नेस्को मुंबई एक्सिबिशन सेंटर गोरेगाव मुंबई येथे घेण्यात आलेल्या शिक्षणा उपयोगी कार्यक्रम विभागात उल्लेखनिय कामगिरी केलेल्या रोहा तालुक्यातील खांब येथील ज्ञानांकुर इंग्लिश मिडीयम स्कूलला ‘स्टार एज्युकेशन’ पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. यावेळी महाराष्ट्रातील नामांकित शाळांना, प्राध्यापकाना, संस्थापकांना पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.या वेळी महाराष्ट्रातील नामवंत संस्थेचे संस्थापक, प्रिन्सिपल, शिक्षक उपस्थित होते. या स्कूलमध्ये आतापर्यंत स्काऊट गाईडमधील विद्यार्थ्यांना राज्यपुरस्कार प्राप्त झाले आहेत तसेच मैदानी खेळामध्ये तालुका,जिल्हा, राज्यस्तरावर नाव गाजवत आहेत. तरुणासाठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन, महिलासक्षमी करणासाठी विविध उपक्रम या स्कूलमध्ये राबविले जात आहे. तसेच सर्व सण उत्सव साजरे केले जातात विद्यार्थी पालकांसाठी वैदकीय तपासणी केली जाते त्याचाच एक भाग म्हणून हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला.

## नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट माणगाव यांच्यातर्फे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन बुधवार (दि.१२) ऑगस्ट रोजी सकाळी ९ ते दुपारी १ यावेळेत जुने एसटी स्टँड माणगाव जवळ पितांबर मेथा यांच्या प्रशस्त जागेत हॉलमध्ये करण्यात आले आहे. सदर शिबिराचा लाभ जास्तीत जास्त गरीब गरजू लोकांनी घ्यावा असे आवाहन माणगाव तालुक्यातील सामाजिक कार्यकर्ते विजय मेथा यांनी केले आहे. माणगाव तालुक्यातील विजय मेथा चॅरिटेबल ट्रस्टतर्फे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

## भाताच्या शेतात पाण्याअभावी पडल्या भेगा

**। पालघर । प्रतिनिधी ।**

यावर्षीही पडलेल्या दुष्काळजन्य परिस्थितीत वाडा तालुक्यातील भातशेती करणारा शेतकरी चिंतेत सापडला आहे. कागदोपत्री सरकारने पालघर जिल्ह्याला दुष्काळाच्या यादीतून हद्दपार केले असले तरी प्रत्यक्षात पालघर व सर्वाधिक भातशेती करणाऱ्या वाडा तालुक्यात परिस्थिती चिंताजनक आहे. पालघर जिल्ह्यातील वाडा तालुक्यात भातशेती जरी हिरवीगार दिसत असली तरी प्रत्यक्ष परिस्थिती अतिशय भीषण व भयावह आहे. अती पाण्याच्या जागा वगळता बहुतांश शेती कोरडी पडली असून यामुळे बहरून आलेली पिकं संकटात सापडली आहेत. तालुक्यात पावसाने पाठ फिरवून आता महिना होणार असून पूर्ण शेतीत आता भेगा फाटून कोरडी पडली आहे. हाताशी आलेले पिकं वाचविण्यासाठी शेतकऱ्यांची धडपड सुरू असून ज्यांच्याकडे पाण्याची व्यवस्था आहे ते शेतकरी कृत्रिम पाणीपुरवठा करीत आहेत. ओहोळांवर पाणी अडवून शेतीला वळविण्याचा आटापिटा करण्यात अनेक शेतकरी व्यस्त असल्याचे बघायला मिळत असून परिस्थिती अधिक गंभीर बनण्याची शक्यता निर्माण झाली आहे. वाडा तालुक्यात १४ हजार हेक्टर क्षेत्रावर भातशेती केली जात असून बहुतांश शेतकऱ्यांची आर्थिक मदार शेतीवर असते. प्रत्यक्ष दुष्काळजन्य स्थिती असतानाही प्रशासन व सरकार नेमके काय करीत आहे असा सवाल शेतकरी विचारीत आहेत.

## पनवेलमधून जवानांसाठी दिवाळीचा फराळ

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

दिवाळीच्या सणात कुटुंबापासून दूर राहून देशाच्या सीमेचे रक्षण करणाऱ्या जवानांच्या चेहऱ्यावर आनंद फुलवण्यासाठी पनवेलकरांनी पुढाकार घेतला आहे. भारत विकास परिषद, पनवेल शाखेतर्फे यंदा तब्बल १८ हजार जवानांसाठी दिवाळीचा फराळ पाठवण्यात येणार आहे. या उपक्रमाचे हे सातवे वर्ष असून, फराळाचे बॉक्स तयार करण्यासाठी स्वयंसेवक आणि नागरिकांची लगबग सुरू आहे.

मागील वर्षी १६ हजार ५०० जवानांपर्यंत फराळ पोहोचवण्यात आला होता. यंदा या उपक्रमाचा विस्तार करून १८ हजार फराळाचे बॉक्स तयार केले जात आहेत. प्रत्येक बॉक्समध्ये चार ड्रायफ्रूट लाडू, चार चकल्या, १२५ ग्रॅम चिवडा आणि शंकरपाळी यांचा समावेश आहे. फराळ सुरक्षितपणे जवानांपर्यंत पोहोचावा, यासाठी प्रत्येकी २० बॉक्स एका मोठ्या मास्टर बॉक्समध्ये पॅक केले जात आहेत.

पनवेलसह ठाणे, कल्याण आणि मुंबई येथील स्वयंसेवक या उपक्रमात सहभागी होत आहेत. दिवाळीच्या सुमारे चार आठवडे आधीच फराळ तयार करण्याचे आणि पॅकिंगचे काम सुरू केले जाते. शनिवार-रविवारी स्वयंसेवक सकाळी ९ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत एकत्र येऊन बॉक्स तयार करण्याचे काम करतात. सीमेवर देशाचे रक्षण करणाऱ्या जवानांप्रति सद्भावना व्यक्त करण्यासाठी हा उपक्रम राबवला जातो. फराळ मिळाल्यानंतर जवानांना होणारा आनंद ते छायाचित्रे, व्हिडिओ आणि पत्रांद्वारे आमच्यापर्यंत पोहोचवतात. त्यातून स्वयंसेवकांनाही पुढील वर्षी अधिक व्यापक स्वरूपात उपक्रम राबवण्याची प्रेरणा मिळते, असे भारत विकास परिषदेच्या कोकण, मुंबई व गोवा महिला विभागाच्या क्षेत्रीय अधिकारी डॉ. कीर्ती समुद्रा यांनी सांगितले आहे.

## सर्पमित्रांकडून अजगराची सुटका



**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

चिरनेर येथील रहिवासी गजानन काळू वशेणीकर यांच्या शेतात कंपाऊंडसाठी लावलेल्या जाळ्यात रविवारी (दि.११) सकाळी ९ फुटी लांबीचा इंडियन पायथॉन जातीच्या अजगर अडकून पडला होता. सर्पमित्र राजेश पाटील यांनी जाळी कापून शिताफीने पकडून सुटका केली. गजानन वशेणीकर शेतावर फेरफटका मारायला गेले होते. त्यांना शेतातील कंपाऊंडसाठी लावलेल्या जाळ्यात अजगर अडकला असल्याचे आढळून आले. सुटकेसाठी अजगराची धडपड सुरू असल्याचे पाहून गजानन वशेणीकर यांनी या घटनेची माहिती सर्पमित्राला दिली. माहिती मिळताच लागलीच सर्पमित्र राजेश पाटील यांनी शेतावर धाव घेतली. त्यांना ९ फुटी लांबीचा इंडियन पायथॉन जातीचा अजगर शेतातील कंपाऊंडसाठी लावलेल्या जाळ्यात अडकला असल्याचे आढळून आले. जाळीतुन सुटकेसाठी धडपड करीत असलेल्या अजगराची सर्पमित्र राजेश पाटील यांनी चाकू, कैचीने जाळी कापून इजा होणार नाही, याची दक्षता घेऊन शिताफीने पकडून सुटका केली. त्यानंतर त्याला बापुजी देवालयाच्या जंगलातील नैसर्गिक वातावरणात सोडून दिले.

## आरटीओ कार्यालयात ओळखपत्र तपासणीनंतरच प्रवेश




**। पनवेल । प्रतिनिधी ।**

खारघर येथे सुरू असलेल्या पनवेल उपप्रादेशिक परिवहन कार्यालयात (आरटीओ) नागरिकांचे ओळखपत्र तपासूनच प्रवेश दिला जात असल्याचे समोर आले आहे. या नव्या व्यवस्थेमुळे कार्यालयात येणाऱ्या नागरिकांच्या रांगा लागत असून, प्रवेशाच्या नियमांबाबत संभ्रम निर्माण झाला आहे.

पनवेल आरटीओ कार्यालय काही महिन्यांपूर्वी खारघर येथे स्थलांतरित झाले. गेल्या काही दिवसांपासून कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर नागरिकांची ओळखपत्रे तपासली जात आहेत. यासाठी एका व्यक्तीची नियुक्ती करण्यात आली असून, संबंधित नागरिकाचे आरटीओ कार्यालयात कोणते काम आहे, याचीही चौकशी केली जात आहे.

शासकीय कार्यालयात प्रवेशासाठी ओळखपत्र तपासणीची ही व्यवस्था कोणत्या नियमांनुसार लागू करण्यात आली आहे, असा प्रश्न उपस्थित होत आहे. दुसरीकडे, कार्यालयातील कामकाज अधिक सुव्यवस्थित व्हावे आणि अनावश्यक गर्दी टाळता यावी, या उद्देशाने ही व्यवस्था सुरू करण्यात आली असण्याची शक्यता आहे.

दरम्यान, काही महिन्यांपूर्वी आरटीओ कार्यालय परिसरात उभारण्यात आलेल्या पत्र्याच्या शेडवरून स्थानिक सोसायटी आणि आरटीओ अधिकाऱ्यांमध्ये वाद झाला होता. तसेच सप्टेंबरमध्ये विलास सनगर या एजंटला साडेचार हजार रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पकडल्याची घटनाही घडली होती. पनवेलचे उपप्रादेशिक परिवहन अधिकारी जयंत चव्हाण यांनी सांगितले की, सध्या आरटीओ कार्यालयातील सुमारे ७० टक्के कामकाज ऑनलाइन झाले आहे. नागरिकांची कामे लवकर व्हावीत, यासाठी ऑनलाइन प्रणाली सुरू करण्यात आली आहे. ज्या व्यक्तीचे कार्यालयात काम आहे, त्या व्यक्तीनेच कार्यालयात यावे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

ओळखपत्र तपासणीच्या व्यवस्थेमुळे नागरिकांची गैरसोय होऊ नये, तसेच प्रवेशासंबंधीचे नियम स्पष्टपणे जाहीर करावेत, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## विद्यानिकेतन संस्थेतर्फे पुरस्कार जाहीर

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

समाजहितासाठी निःस्वार्थ भावनेने कार्य करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींच्या कार्याचा गौरव करण्यासाठी विद्यानिकेतन सामाजिक, शैक्षणिक संस्था, महाराष्ट्र राज्याच्या वतीने राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. रविवार (दि. २५) रोजी सकाळी ११ ते १ वाजेपर्यंत कोचळेवाडी, ता. वाई, जि. सातारा येथे हा सोहळा होणार आहे.

**हिरव्या रंगाच्या पक्ष्याने वेधले पक्षीनिरीक्षकांचे लक्ष | स्थलांतराच्या मार्गावरून जाणारा पक्षी म्हणून नोंद**

## खारघरमध्ये दिसला दुर्मिळ ‘युरोपियन रोलर’!



**। खांदा कॉलनी । प्रतिनिधी ।**

खारघर सेक्टर-१ परिसरात नुकतेच ‘युरोपियन रोलर’ या आकर्षक स्थलांतरित पक्ष्याचे दर्शन झाले आहे. पक्षी अभ्यासक माधव आठवले यांच्या निरीक्षणात हा पक्षी आढळून आला असून, त्याचे छायाचित्रही टिपण्यात आले आहे. निळसर-हिरवट छटा असलेले शरीर, तपकिरी पंख आणि काळसर चोच यामुळे हा पक्षी सहज लक्ष वेधून घेतो.

युरोपियन रोलरचे शास्त्रीय नाव Coracias garrulus असून तो रोलर कुटुंबातील पक्षी आहे. भारतात हा प्रामुख्याने ‘पॅसेज मायग्रंट’, म्हणजे स्थलांतराच्या मार्गावरून जाणारा पक्षी म्हणून नोंदला जातो. विशेषतः पश्चिम आणि वायव्य भारतातून ऑगस्ट ते नोव्हेंबरदरम्यान त्याचे स्थलांतर दिसून येते.

महाराष्ट्रातही या पक्ष्याच्या नोंदी उपलब्ध आहेत.

युरोपियन रोलरचा प्रजनन प्रदेश युरोपपासून मध्य आशियापर्यंत पसरलेला आहे. भारतातील काही भागातून तो स्थलांतराच्या काळात पुढे आफ्रिकेकडे जातो. त्यामुळे सप्टेंबर महिन्यात खारघरमध्ये त्याचे दर्शन होणे पक्षीनिरीक्षकांसाठी विशेष नोंद ठरते, असे निरीक्षण पक्षी अभ्यासाच्या माहितीतून करता येते.

महाराष्ट्रासाठीच्या State of India’s Birds नोंदीनुसार युरोपियन रोलर हा Passage Migrant आणि Localized Summer Migrant म्हणून नोंदला आहे. त्याची जागतिक संवर्धन स्थिती Least Concern आहे.

खारघरमधील वाढत्या नागरीकरणाच्या परिसरातही विविध स्थलांतरित पक्ष्यांचे दर्शन होत असल्याने येथील मोकळी मैदाने, झाडे हिरवाईचे महत्त्व अधोरेखित झाले आहे.

> “पक्षीनिरीक्षकांनी अशा पक्ष्यांचे निरीक्षण करताना त्यांना त्रास होणार नाही, याची काळजी घ्यावी.”
>
> –माधव आठवले
> पक्षी अभ्यासक

### अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

१३ ऑक्टोबर

१) श्री. प्रकाश नारायण म्हात्रे चेंढरे, अलिबाग, १३-१०-१९४[illegible]
२) श्री. अशोक गणपत पाटील वेश्वी, अलिबाग, १३-१०-१९४६
३) श्री. जयंत गणपत विरकुड अलिबाग, १३-१०-१९४७
४) श्री. सुनील मुकुंद कर्वे अलिबाग, १३-१०-१९५६
५) श्री. शिवाजी सोपान वाघमोडे चेंढरे, अलिबाग, १३-१०-१९५८

### कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक,कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**कै. काशीनाथ हिरु म्हात्रे, ६ वा स्मृतीदिन, विद्यानगर अलिबाग**

**श्रीनय अजिंक्य देशमुख, अलिबाग**

# निवडक

## डॉ. मोहितकरांची प्र-कुलगुरूपदी नियुक्ती



**महाड :** महाराष्ट्र राज्याचे माजी तंत्रशिक्षण संचालक डॉ. विनोद महादेवराव मोहितकर यांची डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठाच्या प्र-कुलगुरूपदी नियुक्ती करण्यात आली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ (सुधारणा) अधिनियम, २०२६ अन्वये विद्यापीठात प्र-कुलगुरू हे पद नव्याने निर्माण करण्यात आले असून, या पदावर नियुक्त होणारे डॉ. मोहितकर हे विद्यापीठाचे पहिले प्र-कुलगुरू ठरले आहेत. विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेने कुलगुरूंशी विचारविनिमय करून ही नियुक्ती केली आहे. डॉ. मोहितकर यांना तंत्रशिक्षण क्षेत्रातील प्रशासकीय व शैक्षणिक कार्याचा पंचवीस वर्षांहून अधिक अनुभव आहे. डॉ. मोहितकर हे व्हीएनआयटी, नागपूर येथून स्थापत्य अभियांत्रिकीचे पदवीधर असून, त्यांनी एम. एस. विद्यापीठ, बडोदा येथून एम.ई. (प्रथम क्रमांक) आणि संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातून अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विद्याशाखेत पीएच.डी. प्राप्त केली आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली चार संशोधकांना पीएच. डी. प्रदान झाली असून, त्यांच्या नावावर तीन पेटंट्स व ३९ शोधनिबंध आहेत. सीओईपी तंत्रज्ञान विद्यापीठ, व्हीएनआयटी नागपूर, आयआयआयटी पुणे व नागपूर, एनआयटीटीटीआर चेन्नई यांच्या नियामक मंडळांवर, तसेच याच विद्यापीठाच्या कार्यकारी परिषदेवरही त्यांनी सदस्य म्हणून काम केले आहे.




## नारीशक्ती सन्मान सोहळ्याचे आयोजन

**पाली/बेणसे :** महिलांचे कर्तृत्व, जिद्द, संघर्ष आणि समाजाप्रती असलेले योगदान यांचा गौरव करण्याच्या उद्देशाने हॉटेल एडिशियाच्या वतीने गुरुवार,( दि. १५) ऑक्टोबर रोजी सायंकाळी ४ वाजता पाली येथे ‘नारी शक्ती सन्मान सोहळा’ आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यात महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, रायगडच्या पोलीस अधीक्षक आँचल दलाल, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या उल्का महाजन, प्रसिद्ध स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. राजश्री कटके, जगप्रसिद्ध अंकशास्त्रज्ञ श्वेता जुमानी, शेतकरी कामगार पक्षाच्या राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, शेकाप महिला आघाडी प्रमुख ॲड. मानसी म्हात्रे, स्वप्निता गिरी, अश्विनी गाडगीळ, अलिबागच्या नगराध्यक्षा अक्षया नाईक, वर्षा राजेश मोरे, शीतल गायकवाड, हर्षदा मयेकर, वनश्री शेडगे, रसिका फाटक, शर्मिका म्हात्रे सारा वर्तक यांचा सन्मान करण्यात येणार आहे.



## मुनवलीत आरोग्य शिबिराला प्रतिसाद

**सोगाव :** अलिबाग तालुक्यातील मुनवली येथे सामाजिक कार्यकर्ते सचिन घाडी यांच्या माध्यमातून गुरुवारी (दि.८) ऑक्टोबर रोजी ‘सेवा संकल्प अभियान’ अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्र धोकवडे यांच्या मापगाव उपकेंद्राच्या वतीने महिला व पुरुष ग्रामस्थांची रक्तदाब, रक्तातील साखरेची व इतर अनुषंगिक तपासण्या करण्यात आल्या. यावेळी सामाजिक कार्यकर्ते सचिन घाडी यांच्यासह मापगाव उपकेंद्राचे आरोग्य सेवक अरुण कोल्हे, आकांक्षा घाणेकर, शुभांगी पाटील, काठे, राऊत आदी उपस्थित होत्या. सदर शिबिराचा लाभ घेण्यासाठी महिला व पुरुष ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. तर शिबीर यशस्वी होण्यासाठी सचिन घाडी यांनी मेहनत घेतली.



## नवी मुंबई विमानतळावर ‘स्वर्ल’ट्रान्झिट हॉटेल सुरू

**पनवेल :** नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर प्रवाशांच्या सुविधांमध्ये भर घालत अदानी एअरपोर्ट होल्डिंग्स लिमिटेडने स्वर्ल ट्रान्झिट हॉटेल सुरू केले आहे. टर्मिनल १ च्या आगमन स्तरावर असलेल्या या हॉटेलमध्ये ८० खोल्यांची व्यवस्था असून, प्रवाशांना चार तासांपासून रात्रभर मुक्कामाची सुविधा उपलब्ध होणार आहे. विमानांच्या दरम्यान प्रतीक्षा करणारे, पहाटेच्या किंवा उशिराच्या विमानाने प्रवास करणारे प्रवासी या सुविधेचा लाभ घेऊ शकतील. हॉटेलमध्ये शॉवर, उच्च-गती इंटरनेट, कामासाठी स्वतंत्र टेबल, खोलीत भोजनसेवा तसेच विमानतळावरून आणण्या-नेण्याची सुविधा उपलब्ध आहे. हॉटेलमध्ये सहा प्रकारच्या खोल्यांसह ४० आसनक्षमतेचे चोवीस तास सुरू असलेले रेस्टॉरंट आहे. याशिवाय खोलीत भोजन, तातडीची कपडे धुलाई, गृहव्यवस्था आणि व्यावसायिक कामांसाठी आवश्यक सुविधाही देण्यात आल्या आहेत. सुचित बन्सल यांच्या मते, या सुविधेमुळे प्रवाशांना विमानतळ परिसरातच विश्रांती घेणे, ताजेतवाने होणे आणि काम करणे शक्य होणार आहे. कंपनीच्या अन्य विमानतळांवरही अशा प्रकारच्या सुविधा विस्तारण्याची योजना आहे.

## निवडक



### अखिल भारतीय उपभोक्ता उत्थानचे राष्ट्रीय अधिवेशन संपन्न

**पाली/गोमाशी :** भारत सरकारच्या विधी, न्याय आणि कंपनी व्यवहार मंत्रालयाद्वारे मान्यताप्राप्त अखिल भारतीय उपभोक्ता उत्थान संघटनेचे २६ वे राष्ट्रीय अधिवेशन भोपाळ येथील मानस भवन येथे राष्ट्रीय अध्यक्ष हरिशंकर शुक्ल यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. पहिल्या दिवसाचे उद्घाटन माजी न्यायमूर्ती सुशील कुमार पालो यांच्या हस्ते झाले, यावेळी न्यायमूर्ती अंजली पालो व माजी मंत्री पी.सी. शर्मा उपस्थित होते. दुसऱ्या दिवसाचे उद्घाटन मध्य प्रदेश काँग्रेस अध्यक्ष जितेंद्र मजीतूफ पटवारी यांच्या हस्ते झाले, यावेळी आमदार रजनीश सिंह, माजी आमदार सुखेंद्र सिंह बन्नाजी, अवनीश भार्गव व राष्ट्रीय सरचिटणीस बाळासाहेब पांडे उपस्थित होते.या अधिवेशनात राष्ट्रीय पुरस्कारांसाठी ओम भारद्वाज यांच्या अध्यक्षतेखालील समितीने पुरस्कार जाहीर केले.
यात राज्यस्तरावर छत्तीसगडला प्रथम, पंजाबला द्वितीय व तमिळनाडूला तृतीय ट्रॉफी मिळाली. प्रदेशाध्यक्षांमध्ये महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष प्रा. डॉ. विनोद गायकवाड यांच्यासह १२ जणांना, तर महिलांमध्ये कटनीच्या प्रिती सेन, झारखंडच्या पुष्पा मिश्रा व महाराष्ट्राच्या मंगला गरदे यांना गौरविण्यात आले.महाराष्ट्रासाठी विशेष अभिमानाची बाब म्हणजे नाशिकचे जिल्हाध्यक्ष दीपक भंगाळे यांना उत्कृष्ट पुरस्कार तर जळगावचे जिल्हा सचिव रवींद्र अहिरे यांना बेस्ट परफॉर्मन्स पुरस्काराने राष्ट्रीय स्तरावर सन्मानित करण्यात आले.



### शैक्षणिक साहित्याचे वाटप

**खांब :** पढवण-वाली पंचक्रोशी शिक्षण प्रसारक मंडळाच्या माध्यमिक विद्यालय पढवण येथे दूर्गवीर प्रतिष्ठान आणि सेवा सहयोग संस्था -मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांना मोफत दप्तर व अन्य शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यावेळी संस्था अध्यक्ष नानासाहेब भौड, उपाध्यक्ष मनोहर जाधव, शाळा समिती चेअरमन चंद्रकांत कोतवाल, संस्था बांधकाम सभापती जनार्दन भौड, मुख्याध्यापक संजीव शेरमकर आदींसह सर्व शिक्षक-शिक्षकेतर वृंद तसेच दुर्गवीर प्रतिष्ठानचे सुयोग पाटील आणि त्यांचे सर्व सहकारी उपस्थित होते.सरस्वती पूजन व स्वागत समारंभा नंतर प्रास्ताविकात विद्यालयाचे मुख्याध्यापक संजीव शेरमकर यांनी दुर्गवीर प्रतिष्ठानच्या सर्व सहकारी वर्गाचे सेवा सहयोग संस्था -मुंबई आणि डॅम कॅपिटल कंपनीचे धन्यवाद मानले. त्यानंतर भविष्यातील विविध योजनांची माहिती दिली. त्यानंतर दुर्गवीर प्रतिष्ठानचे सदस्य सुयोग पाटील आणि नरेंद्र पार्टे यांनी दुर्गवीर प्रतिष्ठानचे दुर्ग संवर्धनाचे कार्य, समाजसेवी विविध उपक्रम याबाबत माहिती देत असतानाच दुर्गवीर प्रतिष्ठान संस्थापक अध्यक्ष संतोष हासूरकर यांच्या बद्दल गौरवोद्गार काढले. संस्था बांधकाम सभापती जनार्दन भौड आणि शाळा समिती चेअरमन चंद्रकांत कोतवाल साहेब यांनी दुर्गवीर प्रतिष्ठान आणि सेवा सहयोग संस्थेच्या कार्याचे कौतुक करतानाच भविष्यातील कार्यासाठी अनेक शुभेच्छा दिल्या.शेवटी संस्था अध्यक्ष नानासाहेब भौड यांनी दुर्गवीर प्रतिष्ठान, सेवा सहयोग संस्था, आणि डॅम कॅपिटल यांच्या कार्याचा सन्मान करतानाच भविष्यातील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.



### सुतारवाडी येथे नवरात्र उत्सवाला प्रारंभ

**सुतारवाडी :** प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही सुतारवाडी ग्रामस्थांतर्फे तसेच श्रीदत्त क्रीडा समाजसेवा मंडळ सुतारवाडी यांच्या वतीने नवरात्र उत्सवाचे आयोजन केले जाते. गेल्या ४५ वर्षापासूनची परंपरा आजतागायत अखंडपणे सुरू आहे. श्री दत्त क्रीडा समाजसेवा मंडळ सुतारवाडीचे अध्यक्ष सुनील साळवी, उपाध्यक्ष गणेश तवटे, सचिव वैभव सुतार, खजिनदार प्रवीण पवार, विजय सावंत, सदस्य संदीप चिविलकर, संदेश नाकती, नथुराम साळवी तसेच तरुण वर्ग महिला ज्येष्ठ नागरिक नवरात्र उत्सव यशस्वी करण्यासाठी मेहनत घेत आहेत. कार्यक्रमाचे उद्घाटन श्रीफळ वाढवून करण्यात आले. यावेळी मनोहर साळवी, संजय मुंबरे, नाम देव साळवी, दिलीप नवशे, मोहन दोशी, संकेत सावंत, शांताराम महाडिक, निलेश सुतार, रामदास पवार, विलास सातांबेकर, बाब्या सातंबेकर, रामदास तवटे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत नवरात्र उत्सवाचे उद्घाटन करण्यात आले.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **सन स्टोन रीअल इस्टेट** अलिबाग ते मांडवा बंगलो+प्लॅट+रिसॉर्ट भाड्याने पाहिजे. N.A.plot + शेतजमिन खरेदी व विक्री करुन मिळेल. शेतकरी करतो. ८६६९००६९०२ साइना कॉम्प्लेक्स opp.चर्च बायपास रोड.
- **अलिबाग येथील ऑफिससाठी स्टाफ पाहिजे!** ऑफिसमध्ये काम करण्यासाठी कर्मचारी आवश्यक. आकर्षक पगार मुलाखतीसाठी संपर्क साधा! ९९२३७५०५४९, ९१०५७१७०३८
- **नागाव येथे रिसोर्टमध्ये हाऊस किपिंग** या कामासाठी मुले पाहिजे आहेत आणि ऑल राऊंडर शेफ पाहिजे आहे. (मोबा. नं. ९३७१७१४५५२)

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# खोपटा पुलाच्या दुरुस्तीला विलंब

## अवजड कंटेनर वाहतूक बंद करण्याचा इशारा



**। रसायनी । प्रतिनिधी ।**

खोपटा पुलाच्या दुरुस्ती कामाला होत असलेली दिरंगाई आणि परिसरातील रस्त्यांच्या दुरवस्थेवरून शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष व महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी आणि संबंधित ठेकेदाराला चांगलेच धारेवर धरले. दोन वेळा मुदत देऊनही पुलाचे काम पूर्ण न झाल्याने नागरिकांना वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे दिवाळीपूर्वी पुलाच्या दुरुस्तीचे काम पूर्ण करून वाहतुकीसाठी मार्ग खुला करावा, अशी ठाम मागणी यावेळी करण्यात आली. त्यावर सार्वजनिक बांधकाम विभागाने दिवाळीपूर्वी काम पूर्ण करण्याचे आश्वासन दिले.

या बैठकीला माजी आमदार मनोहर भोईर, तालुकाप्रमुख संतोष ठाकूर, उरण पंचायत समिती सदस्या कविता पाटील, सत्यवान भगत, राकेश भोईर, रूपेश पाटील, भूषण ठाकूर, रोहिदास पाटील, प्रांजल पाटील, समाधान ठाकूर, अतुल ठाकूर, नंदकुमार म्हात्रे, मयूर डाकी, वशेनीचे उपसरपंच गणेश म्हात्रे, प्रशांत म्हात्रे यांच्यासह शिवसेना व मनसेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता संदीप चव्हाण, उपकार्यकारी अभियंता डी. एम. पाटील आणि पुलाच्या दुरुस्तीचे काम करणारे ठेकेदार मिहिर आजगावकर यांच्याशी यावेळी चर्चा करण्यात आली. खोपटा पुलाच्या दुरुस्तीला होत असलेल्या विलंबामुळे उरणच्या पूर्व विभागातील वाहतुकीवर मोठा ताण निर्माण झाला आहे. पुलाची दुरवस्था आणि रस्त्यांची खराब स्थिती यामुळे नागरिकांना वारंवार वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत असून, दैनंदिन प्रवासात मोठी गैरसोय सहन करावी लागत आहे. यापूर्वीही उबाठा शिवसेनेने सार्वजनिक बांधकाम विभागासोबत बैठक घेऊन पुलाच्या कामाचा आढावा घेतला होता.

### पूल वाहतुकीसाठी खुला करण्याची मागणी

खोपटा पुलाच्या दुरुस्तीचे काम पूर्ण करून पूल वाहतुकीसाठी खुला झाला पाहिजे. अन्यथा जनतेच्या सुरक्षित आणि सुखकर प्रवासासाठी आम्हाला रस्त्यावर उतरून या मार्गावरील अवजड कंटेनर वाहतूक पूर्णपणे बंद करावी लागेल. त्यातून निर्माण होणाऱ्या परिस्थितीची संपूर्ण जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाची असेल, असा इशारा मनोहर भोईर यांनी दिला. यावेळी संतोष ठाकूर, कविता पाटील,भूषण ठाकूर आणि सत्यवान भगत यांनीही नाराजी व्यक्त केली.

प्रत्यक्ष पुलाची पाहणी करून काम लवकर पूर्ण करण्याची मागणी केली होती. मात्र, बांधकाम विभागाकडून दोन वेळा अंतिम मुदत देण्यात येऊनही काम पूर्ण झाले नाही. त्यामुळे नागरिकांच्या सहनशीलतेचा अंत होत असून, पुन्हा एकदा अधिकाऱ्यांना जाब विचारण्याची वेळ आल्याचे पदाधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

यावेळी मनोहर भोईर म्हणाले की, पुलाच्या दुरुस्ती कामात होणाऱ्या विलंबाची कारणे समजून घेऊन शिवसेनेने या प्रश्नाचे राजकारण केले नाही. पुलाचे काम लवकर पूर्ण व्हावे यासाठी प्रशासनाला सहकार्याची भूमिका घेतली. मात्र, वारंवार मुदत देऊनही काम पूर्ण होत नसल्याने जनतेची गैरसोय होत आहे. त्यामुळे आज पुन्हा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना जाब विचारावा लागला.

## रायगड विभाग डाक अधीक्षकांनी घेतली रघुजीराजे आंग्रे यांची भेट

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**



ऐतिहासिक वारशाचे वारसदार असलेल्या रघुजीराजे आंग्रे यांची सदिच्छा भेट रायगड डाक विभाग अधीक्षक राजेश रनाळकर यांनी घेतली आणि इतिहास, परंपरा व भारतीय डाक विभाग यांचा एक हृदयस्पर्शी संवाद घडून आला.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या रायगड जिल्ह्याला ऐतिहासिक वैभवाची समृद्ध परंपरा लाभली आहे. ज्या भूमीने स्वराज्याच्या शौर्याचा इतिहास अनुभवला, त्याच भूमीला सरखेल कान्होजीराजे आंग्रे यांच्या पराक्रमाची आणि सागरी वर्चस्वाचीही गौरवशाली किनार लाभली आहे. अलिबाग परिसरातील आंग्रे घराण्याचा ऐतिहासिक वारसा म्हणजे फक्त केवळ एका राजघराण्याची ओळख नसून, तो स्वाभिमान, शौर्य, निष्ठा आणि मराठी सामर्थ्याचे प्रतीक आहे.

या सदिच्छा भेटीदरम्यान जिल्हा डाक अधीक्षक राजेश रनाळकर यांनी भारतीय डाक विभागाच्या माध्यमातून ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वे, राष्ट्रीय वारसा आणि महत्त्वपूर्ण घटनांना व्यापक प्रसिद्धी मिळवून देण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या फर्स्ट डे कव्हर, फिलाटेली स्टॅम्प आणि विशेष टपाल आवरण (स्पेशल कव्हर) यांविषयी सविस्तर माहिती दिली.

## अंबामातेचा उदो.. उदो..







● अलिबागमधील श्रीबागमध्ये अंबामाता मंदिरात रविवारी संध्याकाळी ६ ते ७ वाजेपर्यंत स्लो सायकलिंग स्पर्धा घेण्यात आली. रात्री ७:३० वाजता आरती, ९ ते १० गरबा आणि दांडिया रासचे केले आयोजन

### प्रा.सागर कुंभार यांना पीएचडी प्रदान

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**



गोखले एज्युशन सोसायटीच्या श्रीवर्धन येथील महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा.सागर शिवाजी कुंभार यांना शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरयेथूनग्रंथालयवमाहितीशास्त्र विषयात पी.एच.डी प्रदान करण्यात आली आहे.त्यांच्या संशोधनाचा विषय महाराष्ट्रातील ग्रंथालय व माहितीशास्त्र व्यावसायिकांमधील कॉपीराईट व साहित्यिक चोरीविषयी धारणा: एक अभ्यास हा होता. हे संशोधन डॉ.पांडुरंग पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करण्यात आले.

### आरोपीसह जीप मुंबई पोलिसांच्या ताब्यात

**। पाताळगंगा । प्रतिनिधी ।**

मुंबईतून चोरीला गेलेली बोलेरो जीप शोधून काढण्यात खालापूर पोलिसांना यश आले. पोलिसांनी चोरीच्या या प्रकरणातील आरोपीसह बोलेरो जीप मुंबई पोलिसांच्या ताब्यात दिली असून खालापूर पोलिसांनी दाखविलेल्या तत्परतेमुळे वाहन चोरीच्या प्रकरणाचा छडा लागला आहे.

मुंबईतील साईट पार्क पोलीस स्टेशनमध्ये बोलेरो जीप चोरीला गेल्यानंतर या प्रकरणाची तक्रार १० ऑक्टोबरला दाखल झाली. याबाबत साईड पार्क पोलीस स्टेशन गुन्हा नोंद करण्यात आला होता.तपास सुरू असताना खालापूर पोलिसांनी पोलीस अधीक्षक आचल दलाल यांच्या आदेशाखाली तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.विशाल नेहुल पाटील व पोलीस निरीक्षक प्रदीप रायन्नावार मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत हाके व पोलीस अर्जुन मोरे यांनी योग्य तपास व कारवाई करत चोरीला गेलेली जीप शोधून काढली. या प्रकरणातील अतुल शिवाजी कांबळे या आरोपीला ताब्यात घेऊन पुढील कायदेशीर कारवाईसाठी मुंबई पोलिसांच्या स्वाधीन केले. खालापूर पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत हाके व पोलीस अर्जुन मोरे यांनी केलेल्या या उल्लेखनीय व धाडसी कामगिरीमुळे वाहन चोरट्यांवर पोलिसांचा वचक असल्याचे पुन्हा अधोरेखित झाले आहे.



● मुनवली ता. अलिबाग येथे नवरात्रोत्सवाच्या पहिल्या दिवशी अनमाने परिवाराच्या कुलदैवतेच्या पूजेला उपस्थित महिलावर्ग.
(छायाचित्र : अब्दुल सोगावकर)

### दागिन्यांसह रोकड लंपास

**। नागोठणे । प्रतिनिधी ।**

एमआयडीसी वसाहतीमधील चोरीच्या घटनेसह वाकण परिसरात महिलेवर हल्ला करून तिच्या अंगावरील सोन्याचे दागिने लुटण्याची थरारक घटना घडली आहे. यातील पहिला घटनेत एमआयडीसीच्या नागोठण्यातील कर्मचारी वसाहतीत पहिली चोरी झाली. त्यांच्या घरातून सुमारे नऊ तोले वजनाचे सोने आणि दहा हजाराची रोकड लंपास केली आहे. याशिवाय महिलेवर हल्ला करण्याची दुसरी घटना वाकण परिसरात घडली. जुन्या पुलावरून मॉर्निंग वॉकसाठी जात असलेल्या बिंदू संतोष वर्मा या महिलेवर जुन्या पुलाखाली दबा धरून बसलेल्या एका अज्ञाताने जीवघेणा हल्ला केला.

## गौरव नवदुर्गांचा सोहळ्यात महिलांचा होणार सन्मान

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

दांड-रसायनी रोडवरील मातोश्री संकुल, रीस मोहोपाडा येथील दुर्गामाता मंदिरात दुर्गामाता नवरात्र उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. गेल्या २६ वर्षांपासून दुधे परिवाराच्या वतीने हा उत्सव साजरा करण्यात येत असून, धार्मिक कार्यक्रमांसोबतच सामाजिक उपक्रम, अन्नदान आणि ग्रामीण भागातील कलाकारांना प्रोत्साहन देण्याची परंपरा जपली जात आहे.

नवरात्र उत्सवादरम्यान दररोज सकाळी दुर्गासप्तशती पारायण, सायंकाळी हरिपाठ, भजन आणि आरती असे धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. सोमवारी अष्टमीच्या निमित्ताने होमहवनाचा विशेष कार्यक्रम होणार आहे. नवरात्रोत्सवाच्या काळात भाविकांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे परिसरातील भाविकांनी सहकुटुंब, सहपरिवार उपस्थित राहून दुर्गामातेचे दर्शन घ्यावे आणि महाप्रसादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून दुधे बिल्डर आणि साहस फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने गौरव नवदुर्गांचा या विशेष सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

**९५० विद्यार्थ्यांची तपासणी** | **मोफत आरोग्य तपासणी व कार्डियाक इव्हॅल्युएशन शिबीर**

# १,३१२ जणांच्या आरोग्य तपासणीत ३७ जणांना हृदयविकाराचे निदान

**। पाली /बेणसे । प्रतिनिधी ।**

श्री राज एज्युकेशन सेंटरमध्ये आयोजित मोफत आरोग्य तपासणी व हृदय मूल्यांकन शिबिरातून महत्त्वपूर्ण वैद्यकीय निष्कर्ष समोर आले. दोन दिवसांत ९५० शाळकरी मुलांसह एकूण १ हजार ३१२ जणांची तपासणी करण्यात आली. यामध्ये २२ मुले आणि १५ प्रौढ व्यक्तींना जन्मजात हृदयविकार असल्याचे आढळले. संबंधितांना पुढील तपासणी आणि उपचारांचा सल्ला देण्यात आला. या शिबिरामुळे वेळेवर आरोग्य तपासणी आणि हृदयविकाराचे निदान यांचे महत्त्व अधोरेखित झाले.



### जन्मजात आजाराने त्रस्त; उपचारांचा सल्ला

शिबिरादरम्यान करण्यात आलेल्या तपासणीत २२ मुलांसह १५ प्रौढ व्यक्तींमध्ये जन्मजात हृदयविकार आढळून आला. या सर्वांना पुढील वैद्यकीय तपासणी करून आवश्यक उपचार घेण्याचा सल्ला देण्यात आला. नियमित आरोग्य तपासणी, आजारांचे वेळीच निदान आणि गरजू रुग्णांना योग्य वैद्यकीय मार्गदर्शन मिळावे, या दृष्टीने या शिबिराचे महत्त्व अधोरेखित झाले.

### वैद्यकीय पथकाचे योगदान

या दोन दिवसीय शिबिरात डॉ. हरीश गोशर, डॉ. खुशी वसा, बालरोगतज्ज्ञ डॉ. नीता जगड, अंकिता नहार, चैतन्याबेन रंभिया, हर्ष शहा, जिग्ना देसाई, पंकज ठक्कर, राजुभाई रंभिया, सीमा नागिया आणि स्वीटी लपासिया यांनी निःस्वार्थ वैद्यकीय सेवा व स्वयंसेवी योगदान दिले.

परम कृपालु देव आणि परम पूज्य पप्पाजी यांच्या दिव्य आशीर्वादाने, तसेच पूज्य निलेशभाई यांच्या निरंतर मार्गदर्शनाखाली ८ व ९ ऑक्टोबर रोजी या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. श्री राज मेडिकल अँड हेल्थ केअर सेंटरच्या वतीने परिसोह फाउंडेशन प्रा. लि. (वन हार्ट) चे प्रमुख डॉ. अनिल पोतदार आणि वनलाईफ चॅरिटेबल ट्रस्टचे प्रमुख रूपेश गांगर व जतीन फुरिया यांच्या सहकार्याने हा आरोग्य उपक्रम राबविण्यात आला.

**विविध वैद्यकीय तपासण्या मोफत**

शिबिरात एसपीओटू (रक्तातील ऑक्सिजनचे प्रमाण), रक्तदाब, रँडम ब्लडशुगर (रक्तातील साखरेचे प्रमाण), ईसीजी आणि २ डी इको यांसारख्या महत्त्वपूर्ण वैद्यकीय तपासण्या मोफत करण्यात आल्या. शाळकरी विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी, स्थानिक ग्रामस्थ आणि अन्य लाभार्थ्यांना या सुविधांचा लाभ मिळाला.

तपासणी झालेल्यांमध्ये ९५० शाळकरी मुले, ५३ शिक्षक आणि ३४ कर्मचारी यांचा समावेश होता. याशिवाय चाकरी-पूरो-अगरबत्ती, रिसर्च सेंटर, हाऊसकीपिंग आणि अन्य सुविधांशी संबंधित २२५ कर्मचारी, स्थानिक ग्रामस्थ व क्लिनिकमधील रुग्णांची तपासणी करण्यात आली. रिसर्च सेंटरमधील सुमारे ५० रहिवाशांनाही या उपक्रमाचा लाभ मिळाला.



# वसुंधरा पायी दिंडीचे दक्षिण रायगडमध्ये जंगी स्वागत

। रसायनी । प्रतिनिधी ।

जगद्गुरू श्रीमत रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या प्रेरणेतून पर्यावरण संवर्धनाचा संदेश जनमानसापर्यंत पोहोचविण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या वसुंधरा पायी दिंडीचे दक्षिण रायगडमध्ये स्वागत करण्यात आले. यावेळी परमपूज्य कानिफनाथ महाराजांचे दिंडीत आगमन झाल्याने अनुयायांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

वृक्ष वाचवा, पर्यावरण वाचवा आणि वसुंधरेचे रक्षण करा हा संदेश घेऊन हजारो धामयात्री व अनुयायी नाणीजधामच्या दिशेने पायी प्रवास करीत आहेत. अध्यात्म आणि पर्यावरण संवर्धन यांची सांगड घालण्याचा या उपक्रमाच्या माध्यमातून समाजात निसर्गाप्रति जबाबदारीची भावना निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे.

मुंबई पीठाच्या वतीने वसई तालुक्यातील शिरसाड येथून या वसुंधरा पायी दिंडीचा उत्साहात शुभारंभ झाला. वसई ते नाणीजधाम असा सुमारे ५०० किलोमीटरचा प्रवास दिंडीच्या माध्यमातून करण्यात येत आहे. या प्रवासादरम्यान विविध गावांमध्ये पर्यावरण संवर्धन, स्वच्छता, वृक्षारोपण आणि निसर्गरक्षणाविषयी जनजागृती केली जात आहे.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, माझे आशिल सौ.सविता विकास पवार यांनी खाली नमुद केलेली शेतजमीन मिळकत जमीन मिळकतीचे मालक श्री. अरुण जयराम हरपुडे, राहणार मु. पो. मौजे कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड यांचेकडून कायमस्वरूपी विकत घेणेचे निश्चित केले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| गावाचे नाव | भूमापन क्रमांक व उपविभाग | एकुण क्षेत्रफळ हे.आर.चौ.मी | विकत घ्यावयाचे क्षेत्र हे.आर.चौ.मी | आकार रू. पै |
|---|---|---|---|---|
| मौजे कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड | २०/२/क/१ | ०.७४.०० | ०.४०.०० (४० गुंठे) | ०.३७ |

वरील वर्णनाच्या शेतजमीन मिळकतींबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, विक्री, गहान, दान, लिज, बक्षीसपत्र, चार्ज, वहिवाट व इतर अन्य कोणतेही हक्क हितसंबंध असेल तर संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतींशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही आणि सदर मिळकत पुर्णपणे निर्वेध व वादमुक्त आहे असे समजून आमचे आशिल सदर जमीन खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील. मुदतीनंतर आलेली कोणतीही तक्रार किंवा हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी. याप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

ता. १३.१०.२०२६

**ॲड. यज्ञेश अनंत भागवत**
रा.फ्लॅट नं. १०१, पाल टॉवर, भिसेगाव, ता. कर्जत
जि. रायगड. मो. ९३०७८८५७११

## जाहीर नोटीस

सर्व नागरिकांना या जाहीर नोटीसीद्वारे सूचित करण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेली मिळकत तिचे मालकांकडून विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मौजे कळंब, ता. कर्जत, जि. रायगड.**

| मालकाचे नाव | स.नं./हि. नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पैसे. |
|---|---|---|---|
| शकील अब्दुल कादिर लोगडे. | १२१/८ | ००-८६-०० | ०-८७ |
| | १२२/१ | ००-१५-४० | २-५५ |
| | १२२/३/ब | लिहुन देणार यांचे मालकीचे एकुण क्षेत्र ००-९३-०० हे. आर. पॉ. पैकी विकत दिलेले क्षेत्र ००-७२-०० हे.आर.पॉ. | १-०१ |
| नाहिदा शकील लोगडे व इतर-३ | १२२/१ | ००-१६-०० | २-६४ |

तरी, वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दूसरे कोणाचा साठेकरार, कूळमूखत्यारपत्र, बयाना, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त, चार्ज, लिज, अटेचमेंट, लिन, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून सात दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पूराव्यासह लेखी हरकत कळवावी. मूदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. असे सर्वांस कळावे.

दि. १३/१०/२०२६

**ॲड. संजय हरिश्चंद्र म्हसे**
पत्ता - बी-३०१, सायली निर्माण,
निर्माण नगरी, नेरळ,
ता. कर्जत, जि. रायगड.
मो.नं. ९४०३६४७९५३

## जाहिर नोटीस

सर्व जनतेस कळविण्यांत येते की, आमचे अशिलांनी मौजे नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली बागायत मिळकत व त्यावरील घर मिळकतीचे विद्यमान मालक सत्यजित वासुदेव कवठेकर यांचेकडून खरेदीखताने विकत घेण्याची ठरविलेली आहे व तशी बोलणी ही चालू आहे. सदरची मिळकत निर्वेध व बोजा विरहीत असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी आमचे अशिलास दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार (रू. पैसे) |
|---|---|---|---|
| नागांव, ता. अलिबाग जि. रायगड | २५७५ (खाते क्र.१७०१) | क्षेत्र ०.०८.२० पो.ख. ०.०१.३० एकूण ०.०९.५० | ३.५३ |

घर मिळकत क्र.१०८ (क्षेत्र २९०.१५ चौ.मी.) व घर क्र. २६९५ (क्षेत्र २०८.२७ चौ.मी.)

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, साठेकरार, कोर्टात दावा, मृत्यूपत्र, अखत्यारपत्र, भागिदारी, वहिवाट, पोटगी, करार-मदार, विसार पावती, वारसा हक्क, वहिवाटीचा जाण्या-येण्याचा मार्ग, आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार खरेदीदारांतर्फे ॲडव्होकेट यांचेकडे लेखी कळवावे. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग.
दिनांक : १२/१०/२०२६

**मान्यतेची स्वाक्षरी**
**सत्यजित वासुदेव कवठेकर**

**ॲड. सचिन सदानंद पाटील**
मु. ७६२/ए/बी, आई बंगला,
शिवसागर वसाहत, कुरूळ
ता. अलिबाग, जि. रायगड
मो. नं. ९८८१६३७९२४
ई.मेल : sp3589166@gmail.com

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे सालपे, ता. कर्जत, जि. रायगड येथे असलेली खालील परिशिष्ठमध्ये वर्णनीलेली जमीन मिळकत आमचे अशील १. दीपक मारुती घारे, २. अरुण तुकाराम लाड, यांनी या जमीन मिळकतीचे विद्यमान मालक तानाजी रामजी पाटील यांचेकडून कायम खरेदी करायचे ठरवले आहे.

**शेतजमिनीचे वर्णन**
**मौजे सालपे, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकत**

| गाव | सर्व्हे नंबर | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| सालपे | २९/९ | ०.११.०० | ०.०९ |

सदरहू जमीन मिळकत ही त्या मिळकतीचे विद्यमान मालक यांच्या मालकीची व कब्जा वहिवाटीची आहे असे ते सांगतात आणि तसे जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावरून सुद्धा ते दिसून येत आहे. सदर जमीन मिळकत त्यांच्याकडून आमचे अशीलांनी सर्व हक्कासह कायमस्वरूपी खरेदीखत द्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी, सदर जमीन मिळकतीत कुणाचा गहाण, दान, साठेकरार, बक्षीस, फरोक्तखत, लीज, हक्क, बोजा वगैरे किंवा कुणालाही कुठल्याही प्रकारची हरकत असल्यास तशी लेखी हरकत, पुराव्यानिशी, हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खालील पत्त्यावर पोहोचवावी. वरील मुदतीत कुणाची कुठल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहू जमीन मिळकत निर्वेध असल्याचे समजून सदरहू जमिनीच्या विक्रीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर कोणतीही हरकत ऐकली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

हरकत खालील पत्त्यावर नोंदवावी
**ॲड. संदिप मारूती घरत**
ऑफिस :- श्री. साई सावली, सो.लि. दुसरा मजला, ब्लॉक नं.१०,
कर्जत दिवाणी कोर्टासमोर, ता.कर्जत, जि.रायगड, पिन-४१०२०१.
मो. ९२२०६५३३०२/८४४६७२४९८८

कर्जत दि.१३/१०/२०२६

## पनवेल महानगरपालिका
## वाहन विभाग ई-निविदा सूचना

आयुक्त, पनवेल महानगरपालिका, पनवेल हे ''पनवेल महानगरपालिकेकरीता कार, जीप, इनोव्हा, रिक्षा, बस, टेम्पो, ट्रक, रुग्णवाहिका व ईलेक्ट्रिक (कार/जीप) वाहने वाहनचालकासह भाडेतत्वावर पुरविणे'' या कामासाठी सक्षम निविदाकारांडून ई-निविदेद्वारे निविदा मागवित आहेत. ई-निविदा फॉर्म व सविस्तर माहिती www.mahatenders.gov.in. या संकेतस्थळावर दिनांक १३/१०/२०२६ ते दिनांक ०२/११/२०२६ रोजी दुपारी ०३.०० वाजेपर्यंत उपलब्ध असेल.

जा.क्र.- प.म.पा./वाहन/२८-२६/प्र.क्र.०१/जा.क्र.३२७
दिनांक - १२/१०/२०२६

स्वाक्षरीत/-
**अतिरिक्त आयुक्त,**
**पनवेल महानगरपालिका**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे पाझर, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक रविंद्र विजय कवळे यांचे कडुन कायम मालकी हक्कने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (आर.चौ.मी) | आकार (रू. पै) |
|---|---|---|---|
| पाझर, ता. अलिबाग | २९२/ब/४/२९३/३ | ३-११-०० | ३१.१० |

वर वर्णन केलेली जमिन मिळकत सदर नोटीसीचा विषय आहे.

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ (चौदा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी स्वरूपात आणून देण्यात यावे. मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे.

ठिकाण - अलिबाग
दिनांक - १२/१०/२०२६

**ॲड. राहूल रमेश नाईक**
मु. पो. नागांव, ता.अलिबाग, जि. रायगड
मोबा. क्र. ९९२२७९८५२८

## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीशीने असे कळविणेत येते की, मौजे तिघर, ता. कर्जत, जि. रायगड येथील सर्व्हे नंबर ३२/६ हि मिळकत आमचे अशिल संदीप शंकरलाल तुलशान यांचे मालकीची व ताबेकब्जा वहिवाटीची आहे.

सदरची मिळकत संदीप शंकरलाल तुलशान यांनी गुस्ताद रतनशहा दास्तूर वैगेरे यांचेकडुन नोंदणीकृत खरेदीखताने दिनांक ३१/०१/२००७ रोजी दस्त क्रमांक ६९९/२००७ ने विकत घेतलेली होती. सदर खरेदीखत दुय्यम निबंधक कार्यालय कर्जत, ता.कर्जत, जि. रायगड-४१०२०१ येथे नोंदविणेत आलेले होते.

सदर मिळकतीचे खरेदीखताचे दस्त क्रमांक ६९९/२००७ मुळ दस्त, व त्यासोबतची कागदपत्रे आमचे अशिलांकडुन गहाळ झालेले आहेत, त्याबाबतची तक्रार आमचे अशिलांनी दिनांक १९/०८/२०२६ रोजी कुरार पोलीस ठाणे, मुंबई यांचेकडे तक्रार नोंदवलेली आहे, सदरच्या तक्रारीचा नोंदणी नंबर ५१७/२०२६ असा आहे.

खरेदीखत दस्त क्रमांक ६९९/२००७ चा दस्त व सोबतची कागदपत्रे गहाळ झालेली आहेत, सदरचे दस्त कागदपत्रे कोणाकडे असल्यास अथवा त्याबाबत हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी, त्यांनी त्यांची हरकत, सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासुन ८ (आठ) दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे अशिल जबाबदार राहणार नाहीं याची नोंद घ्यावी. तसेच गहाळ झालेले दस्त कोणासही सापडल्यास खालील पत्त्यावर ८ दिवसांचे आत कळवावे.

दिनांक- १३ ऑक्टोबर २०२६

**ॲड. समीर आर. सावंत**
बी.कॉम. एल एल. बी.
पत्ता - ०९, कोर्ट व्ह्यु बिल्डींग,
दिवाणी न्यायालयासमोर, कर्जत,
ता. कर्जत, जि.रायगड ४१०२०१
मो.नं. ९१५८३१३७३३

दिनांक : ०७/०४/२०२६

## नोटीस

सर्व जनतेस या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मौजे चौल-ता.अलिबाग, जि.रायगड येथील मिळकत आमचे अशिल यांनी विद्यमान मालक प्रतिक्षा प्रविण राऊत यांचेकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी, या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण इ. स्वरूपाचे हक्क व हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहिर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास राऊत सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पूर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

**मौजे चौल, ता.अलिबाग, जि.रायगड**

| मौजे | भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ (हे.आर.) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| चौल ता.अलिबाग | १३५५/१५ | ला.यो.क्षेत्र ०-१०-०० पो.ख ०-००-८० एकूण ०-१०-८० | ४.५८ |

दिनांक : ०७/०४/२०२६
अशिलांची सही

**ॲड.आशिष अशोक बाणे**
ऑफिस नं.६ रजनी नारायण कॉम्प्लेक्स
जे.एस.एम कॉलेज जवळ अलिबाग-रायगड
मोबा. ८००७०७२६६९

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे रेवदंडा, ता. अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेल्या बागायत मिळकतीचे विद्यमान मालक वैभवी आकाश नायक, रा.१०६, पहिला मजला, सुगंधा सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या., कर्णिक हॉलजवळ, पंतनगर, चेंढरे, ता.अलिबाग, जि. रायगड यांच्या नांवे असलेली बागायत मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तशी बालणी विद्यमान मालकांबरोबर माझे अशिल यांनी केलेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | हि.नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| रेवदंडा ता.अलिबाग | १५७/१/१ब/१ब | - | ०-३४-६० | १७.३५ |
| | | पो.ख. | ०-००-५० | |
| | | एकूण | ०-३५-१० | |

वर नमूद बागायत मिळकतीपैकी वैभवी आकाश नायक यांचे मालकीहक्कातील ०-०५-५५ हे. आर. आकार रु.२.७८ पैसे या बागायत मिळकतीबाबत.

सदर मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. तरी याउपरही सदरहू मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून सात दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खाली पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. जर विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहू मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे, असे गृहीत धरुन माझे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पूर्ण करतील. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : १२/१०/२०२६

सही / -
**ॲड. धिरज जयवंत म्हात्रे**
दुय्यम निबंधक कार्यालयासमोर, अलिबाग,
ता.अलिबाग, जि.रायगड.

महाराष्ट्र शासन
महसूल व वनविभाग
**जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख रायगड क्र.१ मु. अलिबाग यांचे कार्यालय**
**मा. जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांचे कार्यालयाचे आवारात, अलिबाग-४०२२०२**
दुरध्वनी क्र. ०२१४१ २२२४२८, Email: dslrraigad@gmail.com

क्र.अपील/एस.आर.२५/२०२६ ता.अलिबाग/जि. रायगड/२०२६/१०१९ अलिबाग दिनांक ०६/१०/२०२६

**जाहिर नोटीस**

प्रति,
१. श्री.भास्कर पांडु मगर (मयत) तर्फे वारस
१/१. श्रीमती भारती भास्कर मगर १/२. निलेश भास्कर मगर **अपीलदार**
१/३. निलम बजरंग काकडे
रा. भादाणे, पो. नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड
२. वसंत पांडु मगर
३. सुनिता शिवराम मगर
४. नितेश शिवराम मगर
५. रमेश शिवराम मगर
६. विजय शिवराम मगर
७. जयवंत शिवराम मगर (मयत)
८. सुभाष चिंतामण मगर
९. श्री.रोहित मोहन पाटील
१०. गजेंद्र तुकाराम राणे
रा. भादाणे, पो. नागाव, ता.अलिबाग, जि.रायगड

**विरुद्ध**

१. सुमती दामोदर पाटील (मयत) **जाबदार**
२. राजाराम दामोदर पाटील
३. शरद दामोदर पाटील
४. अशोक दामोदर पाटील
५.प्रवीण दामोदर पाटील
रा. मु. भादाणे, पो. नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड)
६. रवींद्र दामोदर पाटील मयत तर्फे वारस
६/१. रसिका रविंद्र पाटील ६/२. अमृता रविंद्र पाटील
६/३. अवंतिका रविंद्र पाटील
रा. मु. कुणे, पो. मल्याण, ता. अलिबाग, जि. रायगड
७. प्रभाकर उर्फ काशीनाथ यशवंत पाटील
८. विजय आत्माराम माळी
९ अरुण महादेव माळी
रा.मु.भादाणे, पो. नागांव, ता.अलिबाग, जि.रायगड
१०. चिंतामण यशवंत पाटील मयत तर्फे वारस
१०/१. सुनिता चिंतामण पाटील १०/२. चंद्रकांत चिंतामण पाटील
१०/३. नंदकुमार चिंतामण पाटील १०/४. दिलीप चिंतामण पाटील
रा. मु. डावाले, पो. नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड
१०/५. रचना रामचंद्र नाईक
रा. मु. बेलकडे पो. कुरूळ, ता. अलिबाग, जि. रायगड
११. सुशीला चिंतामण पाटील (मयत)
१२. निर्मला प्रकाश कंटक
१३. मुकेश कृष्णा मगर
१४. माधव श्रीपाद गाडगीळ
१५. मानसी माधव गाडगीळ
रा. मु. भादाणे, पो. नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड
१६. उप अधीक्षक भूमि अभिलेख, अलिबाग
ता. अलिबाग, जि. रायगड

विषय :- मौजे भादाणे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट नं. ११७ या मिळकतीबाबत सादर करण्यात आलेल्या अपीलाबाबत.

संदर्भ :- १. अर्जदार श्रीमती भारती भास्कर मगर यांचा दि. २६/११/२०२५ रोजीचा अपील अर्ज.
२. इकडील नोटीस क्र. अपील/एस.आर.२५/२०२६/ता.अलिबाग/जि.रायगड/२०२६ जा.क्र. ९४७ अलिबाग दिनांक २३/०९/२०२६

उपरोक्त संदर्भान्वये विषयांकीत बाबतचा अपील अर्ज या न्यायालयात प्राप्त झाला आहे. सदर अपीलाच्या विलंब माफी अर्जावरील सुनावणीची तारीख ०८.०९.२०२६, २२.०९.२०२६ व ०६.१०,२०२६ रोजी नेमणेत आलेली होती. तथापि जाबदार हे सुनावणीस गैरहजर आहेत. तरी या जाहिर नोटीशीचे अनुषंगाने जाबदार क्र.८, ९, १४ व १५ यांना आणखी एक सुनावणीची संधी देण्यात येत असून पुढील सुनावणी दिनांक २७/१०/२०२६ रोजी नेमण्यात येत आहे. सदरचे दिवशी दुपारी १२.३० वाजता आपण पुराव्याचे मुळ कागदपत्रांसह जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख रायगड क्र. १ मु.अलिबाग, जिल्हाधिकारी कार्यालय रायगड यांचे आवार येथे हजर रहावे. आपण वरील तारखेस गैरहजर राहिलेस आपले काहीही म्हणणे नाही असे समजुन आपले गैरहजेरीत एकतर्फी सुनावणी करून आवश्यक तो निर्णय घेतला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०६/१०/२०२६

सही/-
**(सुनिल इंदलकर)**
**जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख**
**रायगड, क्र.१ अलिबाग,**

## कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड
**(भारत सरकारचा उपक्रम)**
सादर सेवा
### निविदा अधिसूचना

उप मुख्य अभियंता (कार्य), कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, रत्नागिरी, पात्र कंत्राटदारांकडून खालील कामासाठी आयआरईपीएस पोर्टलवर ई-निविदा प्रणालीद्वारे एकल लिफाफा बोली पद्धतीने खुल्या निविदा मागवित आहे:

**अनु क्र. 1, कामाचे नाव:** कोकण रेल्वेच्या रत्नागिरी क्षेत्रातील डिवायसीई/डब्ल्यू/रत्नागिरी यांच्या कार्यक्षेत्रातील एसएसई/डब्ल्यू/चिपळूण विभागांतर्गत माणगाव, कोलाड, संगमेश्वर, रत्नागिरी आणि आडवली स्थानकांवरील खुल्या विहिरींची दुरुस्ती, एईएन/चिपळूण कार्यालयाची दुरुस्ती व देखभाल तसेच कचरापेट्यांची दुरुस्ती करण्याचे काम. **निविदा सूचना क्र.: केआर-आरएन-डिवायसीईडब्ल्यू-एमआयएससी-25-2026 दिनांक: 13/10/2026**, **एकूण अंदाजित खर्च:** ₹ 32,14,161.19/- (जीएसटी वगळून) **निविदा सुरू होण्याची तारीख:** 21/10/2026, **निविदा बंद होण्याची तारीख व वेळ:** 04/11/2026 रोजी दुपारी 15:00 वाजेपर्यंत ऑनलाईन बोली/ऑफर सादर करता येतील. **काम पूर्ण करण्याची मुदत:** 4 महिने. हस्तलिखित प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत.

**अनु क्र. 2, कामाचे नाव:** महाराष्ट्र राज्यातील कोंकण रेल्वेच्या रत्नागिरी क्षेत्रातील डिवायसीई/डब्ल्यू/रत्नागिरी विभागांतर्गत अल्ट्राव्हायोलेट प्युरिफायर आणि प्रेशर सँड फिल्टर प्लांटची दुरुस्ती व देखभाल करण्याचे काम. **निविदा सूचना क्र.: केआर-आरएन-डिवायसीईडब्ल्यू-एमआयएससी-26-2026 दिनांक: 13/10/2026**, **एकूण अंदाजित खर्च:** ₹ 8,47,053.35/- (जीएसटी वगळून) **निविदा सुरू होण्याची तारीख:** 21/10/2026, **निविदा बंद होण्याची तारीख व वेळ:** 04/11/2026 रोजी दुपारी 15:00 वाजेपर्यंत ऑनलाईन बोली/ऑफर सादर करता येतील. **काम पूर्ण करण्याची मुदत:** 12 महिने. हस्तलिखित प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत.

तपशील व सहभागासाठी कृपया https://www.ireps.gov.in या संकेतस्थळास भेट द्या. सर्व सुधारणा/परिशिष्टे याच संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जातील.

**अपर तहसिलदार व शेतजमीन न्यायाधिकरण अलिबाग यांचे न्यायालयात कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ याचे कलम ३२ ग अन्वये पोट-कलम (१) या अन्वये दयावयाची नोटीस**

**नोटीस**

दावा क्रमांक ११/२०२६

१. श्री. पांडुरंग काशिनाथ पाटील
रा. मु. मुळे, पो. थळ, ता. अलिबाग, जि. रायगड
२. श्रीम. वत्सला सहदेव म्हात्रे उर्फ वादी/अर्जदार
श्रीम. शारदा सहदेव म्हात्रे
पुर्वाश्रमीची वत्सला काशिनाथ पाटील
रा. मु. गणेश मंदिरामागे, मानी,
ता. अलिबाग, जि. रायगड

विरुद्ध

श्रीम. जिजाबाई सदाशिव लोहार प्रतिवादी/ सामनेवाला
रा. मु. मुळे, ता. अलिबाग,
जि. रायगड

**विषय- मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम १९४८ व मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन नियम १९५६ चे कलम ३२ ग प्रमाणे**

**जमिनीचे वर्णन**

| गावाचे नाव | स.नं./ग.नं. | क्षेत्र हेक्टर आर | आकार रुपये पैसे |
|---|---|---|---|
| मौजे मुळे, ता. अलिबाग | १३२ | ०-०८-१० पो.ख.०-००-७० एकूण ०-०८-८० | १.५१ |

वादी/प्रतिवादी यांस या नोटीसीद्वारे कळविण्यांत येते की, वादी यांनी उपरोक्त नमुद मिळकतीची मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम १९४८ व मुंबई कुळवहिवाट नियम १९५६ चे कलम ३२ग नुसार खरेदी किंमत ठरवून मिळणेकामी या न्यायालयात दि.२४/०६/२०२६ रोजी दावा/अर्ज दाखल केला आहे.

आता तुम्हास नियोजित खरेदीविषयी काही सांगावयाचे असल्यास किंवा तिला हरकत घ्यावयाची असल्यास तारिख ०४/११/२०२६ रोजी ११-०० वाजता तहसिल कार्यालय अलिबाग येथे शेतजमीन न्यायाधिकरणा पुढे हजर होण्याविषयी तुम्हांस न्यायाधिकरण यावरुन फर्मावीत आहे जर नेमलेल्या वेळी व ठिकाणी न्यायाधिकरणापुढे हजर होण्याविषयी तुम्ही कसूर कराल तर त्या बाबतीत तुम्हांस काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरण्यात येईल आणि आवश्यक त्या चौकशीच्या कामास तुमच्या गैरहजेरीत सुरुवात करण्यात येईल. आपण सदर सुनावणीस हजर न रहिल्यास उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकाल/निर्णय देणेत येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण :- अलिबाग
दिनांक :- ०७/१०/२०२६

सही/-
**(विक्रम पाटील)**
**अपर तहसिलदार व शेतजमिन न्यायाधिकरण**
**अलिबाग-रायगड**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी दिलेल्या सुचनेवरून आम्ही मौजे कामथ, ता. अलिबाग, जि. रायगड येथील विद्यमान मालक रचना मकरंद नार्वेकर यांच्या नावे असलेल्या खालील परिशिष्टात नमूद केलेल्या जमिन मिळकतीच्या मालकी हक्कांच्या निर्वेधतेची पडताळणी करीत आहोत. विद्यमान मालकांनी असे निवेदीत केले आहे की, खाली नमूद परिशिष्टात वर्णन केलेल्या जमिन मिळकतीमध्ये त्यांस पुर्णपणे व निर्वेध मालकीहक्क आहेत व ती विकणेचा त्यांस पुर्ण हक्क अधिकार आहे.

तरी ज्या इसमांचा त्या मिळकतीमध्ये अथवा त्यांतील कोणत्याही भागावर अथवा भागामध्ये करार, संमतीज्ञापन, भागीदारी, खरेदी, भाडेपट्टा, पोटभाडेपट्टा, वारसा, बोजा, दान, गहाण, हस्तांतरण, अदलाबदल, विश्वस्त, ताबा, परवाना, वहिवाट, कसवणुक, पोटगी, मृत्यूपत्र, कौटुंबिक व्यवस्था, तडजोड, कोर्टाचा हुकुमनामा, वहिवाटीच्या रस्त्याचा करार या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असेल, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित रजिस्टर्ड पोस्ट ए.डी. द्वारे लेखी कळवावे. मुदतीत तसे कुणीही न कळविल्यास, सदर मिळकतीमध्ये कुणाचाही कोणताही हक्कहितसंबंध नाही अथवा असल्यास तो कायम स्वरूपी सोडून देण्यात आला आहे, असे समजण्यात येईल व मिळकतीचे विद्यमान मालकांचे मालकी हक्क निर्वेध, निजोखमी व बोजाविरहित आहेत असे गृहित धरून आमचे अशिल नियोजित खरेदी-विक्री व्यवहार पुर्ण करतील. नोटीस मुदतीनंतर आलेली कोणतीही तक्रार, हरकत अथवा दावा विचारात घेतला जाणार नाही.

**परिशिष्ठ**
**ता.अलिबाग, जि.रायगड येथील**

| मौजे | गट क्रमांक | क्षेत्र हेक्टर-आर. | आकार रू. पैसे |
|---|---|---|---|
| कामथ | ४७७/१ | जिरायत ०-०३-८० बागायत ०-२९-२० ०-३३-०० पो.ख.०-०३-९० **एकूण ०-३६-९०** | १७.९१ |

अलिबाग
तारीख : १३/१०/२०२६

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील**
ए/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को.ऑप.हा.सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येत आहे की, आमचे अशिलांनी खालील वर्णनाची ७/१२ सदरी नोंद असलेली, मौजे हेदवली, तालुका कर्जत, जि.रायगड येथील जमीन मिळकत ही त्यांचे पुढील नमुद उल्लेखित मालकांकडुन कायम खरेदीखताने विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे.

**शेतजमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे हेदवली, तालुका-कर्जत, जिल्हा-रायगड येथिल**

| भूमापन कमांक व उपविभाग | भुधारणा पद्धती | क्षेत्र (हे.आर.चौमी) | भोगवटदाराचे नाव | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| ९२/९ | भो.वर्ग१ | जिरायत:०-३५-०० पो.ख. ०-००-०० एकुण ०-३५-०० पैकी खाते क्र.४८२ संपुर्ण क्षेत्र :०-१८-०० हे.आर.चौमी मिळकतीचा व्यवहार | संदेश जनार्दन भगत स्वप्नाली संदेश भगत | ०.१६ |

येणेप्रमाणे वर नमुद केलेल्या शेतजमिनीस या नोटीसीमध्ये सोयीकरीता ''सदरहू मिळकत असे संबोधले आहे.

सदरहू १८ गुंठे जमिन मिळकत अधिकार अभिलेख पत्रक गाव नमुना ७/१२ सदरी वर नमुद व्यक्तीच्या नावे नोंद असलेली मिळकत आहे. सदरहू मिळकत आमचे अशिल कायम खरेदीखताने विकत घेण्याच्या विचारात आहेत. तरीही या मिळकतीसंदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा मालकीहक्क, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, गहाण, दान, बक्षिसपत्र लिन लिज, पोटगी, अटॅचमेंट, बोजा, दावा, करार, वगैरे कोणत्याही प्रकारचे हक्क व हितसंबंध असल्यास, तसेच आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबधीत व्यक्ती अथवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत आपल्या हक्क हितसंबंधाचे स्वरूप विशद करून सकृतदर्शनी लेखी कागदोपत्री पुराव्यासह खालील नमुद केलेल्या पत्त्यावर रजिस्टर्ड पोस्टाने अथवा हाती देवून कळवावी.

येणेप्रमाणे कोणाचीही, कोणतीही हरकत अगर तक्रार या नोटीसीत नमुद केलेल्या मुदतीत आली नाही, तर सदर मिळकत ही निर्वेध, बोजारहीत समजून आमचे अशिल सदर मिळकतीमधील नमुद क्षेत्राचा व्यवहार पुर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची तमाम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
तारीख : १३/१०/२०२६

सही /-
**ॲड. शांताराम चांगदेव बेडेकर**
(बी.ए.,एल.एल.बी,एल.एल.एम)
वकील उच्च न्यायालय, पनवेल रायगड
ऑफिस : शॉप नं.८२, म्युनिसीपल शॉपिंग कॉम्प्लेक्स,
पहिला मजला, बिल्डींग नं.३, छत्रपती शिवाजी महाराज
चौक जवळ, मु.पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड,
राज्य-महाराष्ट्र, पिनकोड-४१०२०६,
मो.नं. ८६९२९४४८३३

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. - मुख्य संपादक

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन
१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने नविन डिझाइन्स

मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.
२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

# निवडक

## साई सुदर्शन पुन्हा जखमी

**जयपूर :** रणजी ट्रॉफीचा सामना जयपूरमध्ये तामिळनाडू आणि राजस्थान यांच्यात खेळला जात आहे. भारतीय संघाचा स्टार फलंदाज साई सुदर्शन तामिळनाडू संघाचा भाग आहे. सामन्यादरम्यान क्षेत्ररक्षण करताना त्याला दुखापत झाली. राजस्थानच्या करण लांबाने कव्हर ड्राईव्ह मारला आणि चेंडू अडवण्याचा प्रयत्न करताना सुदर्शन जखमी झाला. साई सुदर्शनची दुखापत गंभीर वाटत नव्हती, परंतु सपोर्ट स्टाफच्या सदस्यांनी त्याला मैदानाबाहेर नेले. साई सुदर्शनने नुकतेच क्रिकेटच्या मैदानावर पुनरागमन केले आहे. ऑस्ट्रेलिया 'अ' संघाविरुद्धच्या कसोटी आणि एकदिवसीय मालिकेसाठी तो भारत 'अ' संघाचा भाग होता. २६ ऑक्टोबरपासून न्यूझीलंडमध्ये सुरू होणाऱ्या तीन कसोटी सामन्यांसाठीही त्याचा भारत 'अ' संघात समावेश करण्यात आला आहे. साई सुदर्शनची दुखापत ही एक वाईट बातमी आहे. तो नुकताच एका दुखापतीतून सावरला होता आणि आता पुन्हा दुखापतीने ग्रस्त झाल्याने त्याच्या फिटनेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. यामुळे भारतीय संघातील त्याच्या निवडीतही अडथळा येऊ शकतो. साई सुदर्शन गेल्या वर्षभरापासून टीम इंडियाचा प्रमुख तिसऱ्या क्रमांकाचा फलंदाज होता. मात्र, श्रीलंकेविरुद्धच्या कसोटी मालिकेपूर्वी सुदर्शन जखमी झाल्याने पडिक्कलला तिसऱ्या क्रमांकावर खेळण्याची संधी मिळाली. त्याने दोन्ही कसोटी सामन्यांमध्ये शतके झळकावली.



## मायाने मोडला सानिया मिर्झाचा विक्रम

**लागोस :** भारतीय टेनिसपटू माया राजेश्वरन रेवतीने सानिया मिर्झाचा २२ वर्षे जुना विक्रम मोडला आहे. तिने रविवारी पोर्तुगालमधील लागोसमध्ये आयटीएफ ३५ स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. हे विजेतेपद जिंकणारी ती सर्वात तरुण भारतीय ठरली आहे.१७ वर्षे ३ महिन्यांच्या मायाने महिला एकेरीच्या अंतिम सामन्यात स्पेनच्या सेलिया सर्विनोचा सरळ सेटमध्ये ६-४, ६-२ असा पराभव केला. सानिया मिर्झाने २००४ मध्ये १७ वर्षे १० महिन्यांची असताना विजेतेपद जिंकले होते. माया आणि सानिया यांनी वयाच्या १७व्या वर्षी लागोसमध्ये विजेतेपद पटकावले. मात्र, सानियाने १० ऑक्टोबर २००४ रोजी नायजेरियातील लागोसमध्ये विजेतेपद जिंकले होते, तर माया ११ ऑक्टोबर २०२६ रोजी पोर्तुगालमधील लागोसमध्ये विजेतेपद जिंकले आहे.जागतिक क्रमवारीत १०३८व्या स्थानावर असलेल्या माया हिने मुख्य ड्रॉच्या पहिल्या फेरीत टॉप सीड आणि जागतिक क्रमवारीत २४६व्या स्थानावर असलेल्या जुस्तिना मिकुलस्काइटचा ७-६(१), ६-१ असा पराभव केला. उपांत्यपूर्व फेरीत आठव्या मानांकित तियान जियालिनचा ६-२, ६-१ असा पराभव केला. उपांत्य फेरीत ब्रिटनच्या ब्रिट डु प्रीविरुद्ध वॉकओव्हर मिळाल्यानंतर ती अंतिम फेरीत पोहोचली.अंतिम फेरीत पहिला सेट जिंकल्यानंतर मायाला आपले पहिले व्यावसायिक विजेतेपद जिंकण्याचे दडपण जाणवू लागले. त्याच वेळी तिला सकाळी ऐकलेल्या एका गाण्याची चाल आठवली आणि तिने मनातल्या मनात ते गाणे गुणगुणायला सुरुवात केली. मायाने युक्रेनच्या येलिजवेता कोट्लियारसोबत दुहेरीचे विजेतेपदही पटकावले. त्यांनी आपल्या जोडीदारासोबत अंतिम सामन्यात मिन लियू आणि कार्लोटा मोचिया यांचा ०-६, ६-२, १०-७ असा पराभव केला.पहिला सेट ०-६ असा गमावल्यानंतर माया आणि कोट्लियार यांनी दुसऱ्या सेटमध्ये पुनरागमन केले. त्यानंतर निर्णायक सुपर टायब्रेकर १०-७ असा जिंकत त्यांनी विजेतेपदावर नाव कोरले.

## श्रेयस अय्यरची विकेट चाहतीच्या जिव्हारी!

**मुंबई :** भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील तिसऱ्या टी-२० सामन्यादरम्यान श्रेयस अय्यरच्या चाहतीने सर्वांचं लक्ष वेधलं. भारताचा कर्णधार बाद होताच एक महिला चाहती स्टेडियममध्येच रडू लागली होती. तिचा हा भावूक आणि डोळ्यांत पाणी असलेला क्षण कॅमेऱ्यात टिपला गेला. या सामन्यात भारताने १२ धावांनी विजय मिळवला असला, तरी कर्णधार श्रेयस अय्यर मात्र केवळ एक धाव काढून बाद झाला. भारतीय संघाचे चाहते आपल्या आवडत्या खेळाडूंच्या चांगल्या कामगिरीसाठी अनेकदा प्रार्थना करताना, त्यांना चिअर करताना दिसतात. अशीच एक चाहती इंदूरमध्ये भारताचा सामना पाहण्यासाठी पोहोचली होती. स्टँडसमध्ये बसलेल्या एका तरुणीला आपला आवडता क्रिकेटपटू लवकर बाद झाल्याचं पाहून ती निराश झाली आणि तिच्या गालावरून अश्रू ओघळू लागले. नवव्या षटकात इशान किशन बाद झाल्यानंतर जेव्हा अय्यर फलंदाजीसाठी मैदानात आला, तेव्हा इंदूरच्या प्रेक्षकांना त्याच्या बॅटमधून आक्रमक फटकेबाजी पाहायला मिळेल अशी पूर्ण अपेक्षा होती; मात्र, पहिल्या चेंडूवर एक धाव घेतल्यानंतर, रोस्टन चेसच्या पुढच्याच चेंडूवर श्रेयस अय्यर पायचीत होत बाद झाला. श्रेयस बाद होताच कॅमेरा चाहत्यांकडे वळताच एक चाहती निराश होत आपले डोळे पुसताना दिसली. या मुलीचे फोटो सोशल मीडियावर चांगलेच व्हायरल होत आहेत. श्रेयस अय्यरने पहिल्या सामन्यात वादळी शतक करत भारताला दणदणीत विजय मिळवून दिला होता.

## अभिषेक शर्माचे दणदणीत अर्धशतक

# भारताची मालिकेत २-१ ने आघाडी

■ विंडीजकडून पुन्हा आक्रमक फलंदाजी ■ भारतीय बॉलर्सचे दमदार कमबॅक

**। इंदौर । वृत्तसंस्था ।**

**इंदौरच्या होळकर स्टेडियममध्ये पार पडलेल्या मालिकेतील तिसऱ्या सामन्यात भारताने मागील पराभवाचा वचपा काढत वेस्ट इंडिजच्या फलंदाजांना २०९ धावांवर रोखले. अशाप्रकारे या विजयासह भारताने पाच टी-२० मालिकेत २-१ अशी आघाडी घेतली आहे.**

प्रथम फलंदाजी करताना भारताने वेस्ट इंडिजसमोर सर्वबाद २२४ धावांचे आव्हान दिले होते. मालिकेतील दुसऱ्या सामन्यात वेस्ट इंडिजने ज्याप्रकारे आक्रमक फलंदाजी करत २५० धावांचा आकडा पार केला होता, त्याकडे पाहता, या सामन्यात भारतीय गोलंदाजांची कस लागणार हे मात्र निश्‍चित झाले होते.

सुरुवातीला मागच्याच सामन्याची हाइलाइट्स बघतोय की काय? असं वातावरण निर्माण झालं होते. पण लवकरच ग्रीप पकडत भारतीय बॉलर्सने कम बॅक केले. विंडीजने याही सामन्यात चांगला लढा देत, ७ बाद २०९ धावांचा पल्ला गाठला.

सलामीला आलेल्या अभिषेक शर्माने संजू सॅमसन (३)चा विकेट झटपट पडल्यानंतरही त्याचं ओझं



आपल्या कामगिरीवर पडू दिलं नाही. त्यानं इशान किशनच्या साथीने दुसऱ्या विकेटसाठी १०८ धावांची भागीदारी रचली. यातील ६३ धावा या अभिषेकच्या होत्या. अभिषेकने ३० चेंडूंत ६ चौकार व ५ षटकारांच्या मदतीने ६९ धावांची खेळी केली. तो शतक पूर्ण करेल असे वाटत असताना, शेमर स्प्रिंगरने आपल्याच गोलंदाजीवर त्याला झेलबाद केले.

दरम्यान, या खेळीदरम्यान, अभिषेकने टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये इतिहास रचला आहे. तो टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये सर्वात जलद २,००० धावा करणारा फलंदाज ठरला आहे. अभिषेकने आपली ३३ वी धाव पूर्ण करताच हा विश्वविक्रम साधला.

भारताच्या मधल्या फळीतील इशान किशन (३७) वगळता, कोणत्याच फलंदाजाला टिकून खेळता आलं नाही. तिलक वर्माने २८ धावा केल्या, पण तोही विचित्ररित्या धावचीत झाला. कर्णधार श्रेयस अय्यर (१) असो, नमन धीर (१०) असो वा नितीशकुमार रेड्डी (२१) स्वस्तात बाद झाले.

वेस्ट इंडिजच्या गोलंदाजांनी सुरुवातीपासून भारतीय फलंदाजांवर दबावतंत्र निर्माण केले होते. रोस्टन चेजने तर अय्यर व लयात आलेल्या इशान किशनचा विकेट मिळवली. रोस्टन, शेमर जोसेफ आणि शेमर स्प्रिंगरने प्रत्येकी २ विकेट घेतल्या. तर किमो पाउल आणि गुडकेश मोती यांना प्रत्येकी १ विकेट मिळाली.

मागच्या सामन्यात टिकून खेळलेला कर्णधार शाई होप (५) ला यंदा मात्र दुसऱ्याच षटकात अर्शदीप सिंगने माघारी धाडले. पण शांत राहिल ती वेस्ट इंडिज टिम कुठली? मागच्या सामन्यात भोपळ्यावर बाद झालेल्या शिमरोन हेटमायर(४३) ने आपली कला दाखवण्यास सुरुवात केली. त्याचं वादळ घोंघावत असताना नमन धीरने त्याला क्लिन बोल्ड केले. असंच काही कॅमेल पूरन (४२) बाबतही घडले. नमनच्या एकाच षटकात ३ गगनचुंबी षटकार ठोकल्यानंतर, याच षटकात नमने त्याचा गेम केला व इशानकरवी सिमारेषेजवळ झेलबाद केले.

इतर गोलंदाज विकेट घेण्यास कमी पडले असले तरी त्यांनी धावगतीवर मात्र अंकुश लावला होता. अशाप्रकारे विंडीज या धक्क्यातून सावरू शकला नाही व भारतीय गोलंदाजांनीही त्यांना सावरू दिले नाही. भारताकडून अर्शदीपने ३, तर नमनने २ विकेट घेतल्या.

## थरारक सामन्यात बांगलादेशचा विजय

**। शारजा । वृत्तसंस्था ।**

शारजामध्ये भारत आणि बांगलादेश यांच्यात थरारक सामना दिसून आला. वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लेजेंड्समध्ये विजेतेपदाचे दावेदार मानल्या जाणाऱ्या बांगलादेश चॅम्पियन्सने इंडिया चॅम्पियन्सला ३ धावांनी पराभूत करून एक मोठा उलटफेर घडवला.

या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना बांगलादेश चॅम्पियन्सने २० षटकांत ९ गडी गमावून १४१ धावांचा डोंगर उभारला. त्यामुळे इंडिया चॅम्पियन्ससमोर १४२ धावांचे लक्ष्य होते. लक्ष्याचा पाठलाग करताना भारतीय संघाला विजयासाठी शेवटच्या षटकात १२ धावांची आवश्यकता होती. त्यावेळी पवन नेगी आणि पियुष चावला हे दोन फलंदाज मैदानावर उपस्थित होते.बांगलादेशने अखेरचे षटक टाकण्याची जबाबदारी अबू जायेदकडे सोपवली. पवन नेगीने शेवटच्या षटकाच्या पहिल्या चेंडूवर एक धाव घेतली. त्यानंतर एक वाईड चेंडू पडल्याने भारताला एक अतिरिक्त धाव मिळाली. दुसऱ्या चेंडूवर पियुष चावलाने एक धाव घेतली, यानंतर तिसऱ्या चेंडूवर नेगीने पुन्हा एक धाव घेतली. अशाप्रकारे, पहिल्या तीन चेंडूंनंतर भारताच्या खात्यात एकूण चार धावा जमा झाल्या. त्यामुळे विजयासाठी भारताला उर्वरित तीन चेंडूंमध्ये आता आठ धावा करायच्या होत्या. निकाल भारताच्या बाजूने लागण्याची आशा आणखी कायम होती. चौथ्या चेंडूवर चावलाने दोन धावा घेतल्यामुळे भारताला विजयासाठी सहा धावांची गरज होती.

## रोहित शर्माने घेतल्या ५ विकेट्स

**मुंबई :** सोमवारपासून रणजी करंडक स्पर्धेचा ९३वा हंगाम सुरू झाला. हंगामाच्या पहिल्याच दिवशी जम्मू काश्मीर संघाच्या रोहित शर्माने ५ विकेट्स पटकावल्या. कोणत्याही गोलंदाजासाठी पाच विकेट्स पटकावणं हा खास क्षण असतो. रोहित शर्मासाठी या ५ विकेटचं मोल वैयक्तिक आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. दुखापतीतून सावरत रोहितने दोन वर्षांनंतर पुनरागमन केलं. रोहितच्या टाचेला दुखापत झाली. हाडाला लागलं होतं. त्यातून सावरत पुनरागमनासाठी प्रयत्न सुरू असताना पुन्हा त्याच भागाला दुखापत झाली. यामुळे दोन वर्ष तो खेळूच शकला नाही. प्रदीर्घ कालावधीनंतर खेळायला उतरलो आणि ५ विकेट्स पटकावल्या याचं अतीव समाधान आहे. माझ्यासाठी ही नवीन सुरुवात आहे असं रोहितने सांगितलं.

## मलेशियात क्रिशव शाहची सुवर्णभरारी

# बुद्धिबळात भारताचा डंका

■ राष्ट्रकुल शालेय बुद्धिबळ स्पर्धेत अव्वल स्थान

**। पुणे । प्रतिनिधी ।**

मलेशियातील क्वालालंपूर येथे झालेल्या पहिल्या राष्ट्रकुल शालेय बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या क्रिशव कवित शाह याने चमकदार कामगिरी करत देशाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. पंधरा वर्षांखालील गटात अव्वल स्थान पटकावत त्याने सुवर्णपदकावर आपले नाव कोरले.

विशेष म्हणजे या स्पर्धेत दोन सुवर्ण, एक रौप्य आणि एक कांस्य अशी एकूण चार पदके पटकावून क्रिशवने आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ क्षेत्रात आपल्या कौशल्याची छाप उमटविली आहे. क्वालालंपूर येथील सिटिटेल मिड व्हॅली हॉटेलमध्ये ४ ते १२ ऑक्टोबर या कालावधीत या आंतरराष्ट्रीय स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. राष्ट्रकुल बुद्धिबळ संघटनेच्या वतीने आयोजित या स्पर्धेत भारतासह मलेशिया, श्रीलंका, सिंगापूर, ऑस्ट्रेलिया, न्यूझीलंड, केनिया, बांगलादेश, पाकिस्तान, कॅनडा, नामिबिया, ब्रुनेई आणि स्कॉटलंड अशा १३ देशांतील २९३ युवा बुद्धिबळपटूंनी सहभाग घेतला होता.



या स्पर्धेत क्रिशवने पंधरा वर्षांखालील गटात आपल्या बुद्धिमत्ता, एकाग्रता आणि अचूक निर्णयक्षमतेच्या जोरावर उल्लेखनीय यश मिळविले. स्पर्धेतील त्याची कामगिरी विशेष लक्षवेधी ठरली. विविध देशांतील खेळाडूंशी स्पर्धा करताना त्याने दाखविलेला आत्मविश्वास आणि संयम यामुळे त्याच्या यशाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरील या यशामुळे त्याच्या पुढील क्रीडा कारकिर्दीला नवी दिशा मिळणार आहे. या यशामुळे क्रिशवच्या कुटुंबीयांनी त्याचे अभिनंदन केले. दोन सुवर्णांसह चार पदकांची कमाई करून त्याने कुटुंबीयांसह देशाची मान उंचावली आहे. भविष्यातही त्याने अशाच प्रकारे राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये यश संपादन करून भारताचा नावलौकिक वाढवावा, अशा शुभेच्छा कुटुंबीयांनी व्यक्त केल्या आहेत.

## आंबेगावच्या अन्वी हिंगेची रशियात चमक

**। पारगाव । प्रतिनिधी ।**

आंबेगाव तालुक्यातील अवसरी बुद्रुक येथील अन्वी दीपक हिंगे हिने रशियातील तुला येथे पार पडलेल्या आशियाई शालेय बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेत दिमाखदार कामगिरी करत भारताच्या शिरपेचात दोन मानाचे तुरे रोवले आहेत. अन्वीने मुलींच्या नऊ वर्षांखालील गटात जलदगती ब्लिट्झ प्रकारात सुवर्णपदक, तर स्टँडर्ड प्रकारात रौप्यपदक पटकावले.

अन्वीने ब्लिट्झ प्रकारात नऊ फेऱ्यांमध्ये आठ गुणांची कमाई करत स्पर्धेत अव्वल स्थान मिळवले. तिच्या खात्यात आठ विजय आणि केवळ एका पराभवाची नोंद झाली. तिने नऊपैकी आठ गुण मिळवत दुसऱ्या क्रमांकावरील तुर्कमेनिस्तानच्या बागुल जुमायेवा हिला अर्ध्या



गुणाने मागे टाकले.

ब्लिट्झमधील सुवर्ण यशाबरोबरच अन्वीने स्टँडर्ड प्रकारातही सातत्यपूर्ण खेळाचे प्रदर्शन केले. मुलींच्या नऊ वर्षांखालील गटात तिने नऊ फेऱ्यांमध्ये साडेसहा गुण मिळवत दुसरे स्थान पटकावले. कझाकस्तानच्या अमालिया येद्रेसहेवाने आठ गुणांसह पहिले स्थान मिळवले, तर रशियाच्या मिया कुद्र्याशोवाने सहा गुणांसह तिसरा क्रमांक मिळवला. स्पर्धेत सहभागी होताना अन्वीचे मानांकन सर्वोच्च होते.

### ठिपसे, दीक्षित, चौधरी यांचे मार्गदर्शन

अन्वी ही चिंचवड येथील एलप्रो इंटरनॅशनल स्कूलमध्ये चौथ्या इयत्तेत शिकत आहे. लहान वयातच आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली गुणवत्ता सिद्ध करणाऱ्या अन्वीला तिचे प्रशिक्षक ग्रँडमास्टर प्रवीण ठिपसे, आंतरराष्ट्रीय मास्टर निखिल दीक्षित आणि मानसिक प्रशिक्षण मार्गदर्शक ऋतू बळ्यान चौधरी यांचे मार्गदर्शन लाभत आहे. बुद्धिबळातील तांत्रिक तयारी, डावांचे विश्लेषण, स्पर्धात्मक अनुभव आणि मानसिक कणखरता या सर्व बाबींच्या जोरावर अन्वी सातत्याने प्रगती करत आहे.

## आगरकरांच्या निवडीवर प्रश्नचिन्ह

**मुंबई :** जाफर यांनी कोहलीच्या कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीबाबत आगरकर यांच्या निवड समितीला जबाबदार धरले आहे.जाफर यांनी सांगितले की, कोहली निवड समितीच्या वागणुकीमुळे नाराज होते. कोहली इंग्लंड दौऱ्याची तयारी करत होते आणि आणखी कसोटी सामने खेळू शकले असते.कोहली आणि रोहित यांनी गेल्या वर्षी एका आठवड्याच्या आत कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतली होती. भारतीय संघाला इंग्लंडविरुद्धच्या पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी रवाना व्हायचे होते. जाफर यांनी आगरकर यांच्या नेतृत्वाखालील निवड समितीवर कोहलीसोबत चुकीची वागणूक केल्याचा आरोप केला.



## इंडियाने ऑस्ट्रेलियाला लोळवलं

■ तिसऱ्या वनडेत ४९ धावांनी धूळ चारली

■ सूर्यांश- गुरजापनीत ठरले विजयाचे हिरो

**। पुदुचेरी । वृत्तसंस्था ।**

भारत अ आणि ऑस्ट्रेलिया अ यांच्यात तिसरा अनधिकृत एकदिवसीय सामना खेळला गेला. हा सामना पुदुचेरी येथील सीचम मैदानावर खेळला गेला. या सामन्यात भारताने ऑस्ट्रेलियाला ४९ धावांनी पराभूत करून मालिकेत आपला पहिला विजय नोंदवला. ऑस्ट्रेलिया अ संघाने पहिले दोन सामने जिंकून मालिका आधीच जिंकली होती. पण भारतीय संघाने शेवटचा सामना जिंकून मालिकेचा शेवट चांगल्या प्रकारे केला. प्रथम फलंदाजी करताना, भारत अ संघ ४७.३ षटकांत २७५ धावांवर सर्वबाद झाला. प्रत्युत्तरात, ऑस्ट्रेलिया अ संघ ४६.२ षटकांत केवळ २२६ धावांवर गारद झाला. या सामन्यात सूर्यांश शेडगेने भारतासाठी ६६ धावा करून उत्कृष्ट कामगिरी केली, तर गुरजापनीत सिंगने तीन विकेट्स घेतले. मात्र, ऑस्ट्रेलियाने पहिले दोन सामने जिंकून मालिका आधीच आपल्या नावावर केली होती आणि या पराभवामुळे कांगारूंनी तीन सामन्यांची एकदिवसीय मालिका २-१ ने जिंकली

या सामन्यात ऑस्ट्रेलिया अ संघाने नाणेफेक जिंकून भारत अ संघाला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केले. सलामीवीर प्रियांश आर्य आणि प्रभसिमरन सिंग यांनी भारत अ संघाला भक्कम सुरुवात करून दिली. प्रभसिमरनने ३४ चेंडूंमध्ये ३९ धावा केल्या, तर प्रियांशने ४५ चेंडूंमध्ये ४९ धावा केल्या. मात्र, यानंतर भारताचा डाव अडखळला आणि ११८ धावांत पाच विकेट्स पडले. देवदत्त पडिक्कल २, रजत पाटीदार ३ आणि निशांत सिंधू ५ धावा करुन स्वस्तात बाद झाले.

कर्णधार ऋतुराज गायकवाडने त्यानंतर ५७ चेंडूंमध्ये ३३ धावा करून डाव सावरला. त्यानंतर सूर्यांश शेडगेने ६० चेंडूंमध्ये ६६ धावांचे शानदार अर्धशतक झळकावून भारताला २०० धावांच्या पुढे नेले. अखेरीस विप्रज निगमने ४४ चेंडूंमध्ये ४० धावा केल्या. टीम इंडिया ४७.३ षटकांत २७५ धावांवर तंबूत परतली. ऑस्ट्रेलियाकडून बेन ड्वार्शियस आणि विल सदरलँड यांनी प्रत्येकी तीन विकेट्स घेतले.

२७६ धावांचे लक्ष्य गाठताना ऑस्ट्रेलियाने चांगली सुरुवात केली. जोश फिलिप आणि लियाम स्कॉट यांनी पहिल्या विकेटसाठी ८२ धावांची सलामीची भागीदारी केली. फिलिप ४८ चेंडूंमध्ये ५६ धावा करून बाद झाला आणि त्यानंतर लगेचच स्कॉट ४२ चेंडूमध्ये २६ धावा करून बाद झाला. त्यानंतर लॅकलन शॉने ३१, नॅथन मॅकस्वीनीने ३९ आणि निखिल चौधरीने २९ धावा जोडल्या.

नंबर-१ खेळाडूशी पहिला सामना | १२ ऑक्टोबरपासून स्पर्धा

# सिंधूला डेन्मार्क ओपनमध्ये मिळाला कठीण ड्रॉ

**। ओडेन्स । वृत्तसंस्था ।**

भारताची स्टार बॅडमिंटनपटू पी. व्ही. सिंधूला डेन्मार्क ओपनमध्ये कठीण ड्रॉ मिळाला आहे. मंगळवारपासून डेन्मार्कमधील ओडेन्स येथे सुरू होणाऱ्या या स्पर्धेत सिंधूचा पहिला सामना जगातील क्रमांक-१ खेळाडू आणि विद्यमान विजेती एन से-यंगशी होणार आहे.दोन वेळची ऑलिम्पिक पदकविजेती सिंधू एनविरुद्ध मागील १० सामने हरली आहे. याशिवाय, पुरुष एकेरीत लक्ष्य सेनसमोर तिसऱ्या मानांकित चोउ तिएन चेनचे आव्हान असेल.

सिंधूने जुलैमध्ये जपान ओपन सुपर ७५०चे विजेतेपद पटकावले होते. ही स्पर्धा जिंकणारी ती



पहिली भारतीय ठरली होती. सिंधूने अंतिम सामन्यात जपानच्या अकाने यामागुचीचा २१-१७, २१-१७ असा पराभव केला. हा सामना सुमारे ५० मिनिटे चालला. आशियाई स्पर्धेतील खराब कामगिरीनंतर सेन आपला फॉर्म पुन्हा मिळवण्याचा प्रयत्न करेल.

### सात्त्विक-चिरागकडून पुनरागमनाची अपेक्षा

पुरुष दुहेरीत माजी जागतिक क्रमवारीतील अव्वल जोडी सात्त्विक साईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी पुनरागमन करण्यास उत्सुक असतील. या भारतीय जोडीने मे महिन्यात सिंगापूर ओपन सुपर ७५० चे विजेतेपद पटकावले होते. त्यामुळे दोन वर्षांपासून सुरू असलेला त्यांचा विजेतेपदाचा दुष्काळ संपला होता.यानंतर त्यांनी गेल्या महिन्यात चायना मास्टर्सचे विजेतेपदही जिंकले. पाचव्या मानांकित सात्त्विक आणि चिराग यांचा पहिल्या फेरीत चीनच्या हे जी तिंग आणि रेन शियांग यू यांच्याशी सामना होईल.

### त्रिसा-गायत्रीवरही नजर

महिला दुहेरीत त्रिसा जॉली आणि गायत्री गोपीचंद भारताच्या आव्हानाचे नेतृत्व करतील. या जोडीने ऑगस्टमध्ये जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत ऐतिहासिक कांस्यपदक जिंकले होते. आशियाई क्रीडा स्पर्धेत दोघी उपांत्यपूर्व फेरीपर्यंत पोहोचल्या होत्या.तेथे त्यांना मलेशियाच्या पिअर्ली टॅन आणि थिनाह मुरलीधरन यांनी पराभूत केले होते. डेन्मार्क ओपनमध्ये त्रिसा आणि गायत्री यांचा पहिल्या फेरीत चिनी तैपेईच्या यान फेई चेन आणि हिसिएह पेई शान यांच्याशी सामना होईल.

### आयुष आणि श्रीकांतही मैदानात

आयुष शेट्टी आपल्या शानदार कामगिरीची लय कायम ठेवू इच्छितील. त्यांनी २०२५ मध्ये यूएस ओपन सुपर ३०० चे विजेतेपद पटकावले होते. यावर्षीच्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत आयुषने त्यावेळच्या जागतिक क्रमवारीतील अव्वल खेळाडू शी यूचीचा पराभव करून प्रसिद्धी मिळवली होती.त्यांचा सामना इंडोनेशियाच्या अल्वी फरहानशी होईल. जागतिक अजिंक्यपद स्पर्धेच्या प्री-क्वार्टर फायनलमध्ये अल्वीने आयुषचा पराभव केला होता. किदांबी श्रीकांतचा सामना फ्रान्सच्या अर्नाँड मर्कलशी होईल.

### महिला एकेरीत पाच भारतीय

भारताच्या महिला एकेरीच्या आव्हानात तान्वी शर्मा, अस्मिता चालिहा, देविका सिहाग आणि उन्नती हूडा यांचाही समावेश आहे. पहिल्या फेरीत तान्वीचा सामना जपानच्या नात्सुकी निदाइराशी होईल. ऑगस्टमध्ये तिने तैपेई ओपन जिंकून आपले पहिले वर्ल्ड टूरचे विजेतेपद मिळवले होते.अस्मिताचा सामना बल्गेरियाच्या कलोयाना नलबांतवाशी होईल. ऑगस्टमध्ये कोरिया मास्टर्स सुपर ३०० जिंकून अस्मिताही टूर-स्तरीय विजेती ठरली होती. देविकासमोर थायलंडची आठवी मानांकित पोर्नपावी चोचुवोंग असेल. उन्नती चीनच्या हान चियान शीविरुद्ध खेळेल.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्‍वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)